

# गंगाजल

इरावती कर्वे

# गंगाजल

# गंगाजल

इरावती कर्वे

देशमुख आणि कंपनी (पब्लिशर्स) प्रा. लि. पुणे

पहिली आवृत्ती - १९७६
दुसरी आवृत्ती - १९७७
तिसरी आवृत्ती - २००५
चौथी आवृत्ती - २००९
पाचवी आवृत्ती - २०१५

**संस्थापक**
रा. ज. देशमुख
डॉ. सुलोचना देशमुख

**प्रकाशक**
देशमुख आणि कंपनी (पब्लिशर्स) प्रा. लि.,
पुणे ४११ ०३०.

© सर्व हक्क जाई निंबकर यांच्याकडे आहेत.

**मुखपृष्ठ**
रवी पांडे

**किंमत :**
१५०/- रुपये

**अक्षर रचना**
श्री. सुरेश माने
गोकुळनगर, कोंढवा रोड, पुणे ४८.

**मुद्रक :**
श्री जे प्रिंटर्स प्रा. लि.
१४१६, सदाशिव पेठ,
पुणे ४११ ०३०.

# अनुक्रम


| | | |
|---|---|---|
| १. | बॉय-फ्रेण्ड? | ११ |
| २. | देवळाविना गाव | १५ |
| ३. | दुसरे मामंजी | १९ |
| ४. | एक रात्र? की युगानुयुगे? | ३८ |
| ५. | आई सापडली! | ४३ |
| ६. | पाच कविता | ५३ |
| ७. | व्यक्तिस्वातंत्र्य आणि बंधमुक्तता | ६३ |
| ८. | पुनर्जन्माचा बिनतोड पुरावा | ७१ |
| ९. | जुन्याच समस्या; नवे उपाय | ७६ |
| १०. | एकाकी | ८५ |
| ११. | लोक आत्मचरित्र का लिहितात? | ९० |
| १२. | किंकाळी | ९६ |
| १३. | उकल | १०३ |
| १४. | ते सर्व तूच आहेस! | ११४ |
| | 'थोडे' मैत्रिणीसंबंधी | १२७ |
| | प्रस्तावना | १३३ |

एके ठिकाणी एक नवी वस्ती घडत होती. वसाहतीच्या एका अंगाला काही न बांधलेली अशी एक मोकळी जागा शिल्लक होती; एक दिवस तेथेही पाया खणला गेला. बाकीच्या घरांसारखा तो दिसला नाही. पाहता-पाहता एक लहानसे देऊळ उभे राहिले.

ह्या नव्या वस्तीला देऊळ!

"एक तमीळ म्हण आठवली." मी ती म्हण परत म्हणून दाखविली, आणि तिचे शब्दशः भाषांतर केले, 'देवळाविना गावात घर असू नये.' "कोण जुन्या काळचा मनुष्य होता कोण जाणे! पण त्याला वाटले की, ज्या गावात देऊळ नाही, तिथे आपली धडगत नाही. ज्या जुन्या काळी ही म्हण झाली असेल, त्या वेळीतरी देवाळाशिवाय गाव असण्याची शक्यता नव्हती.

"देऊळ हे एक श्रद्धास्थान आहे. आशा-आकांक्षांचे प्रतीक आहे. ज्या गावात ते नसेल, ते एक श्रद्धा नसलेले, कोठच्याही तऱ्हेच्या सामुदायिक आकांक्षा नसलेले ठिकाण असते. म्हणून तेथे राहू नये, असे भाष्य या म्हणीवर करावे लागेल."

"देवळामध्ये अरूपाला रूप दिलेले असते. अनादीची प्राणप्रतिष्ठा केलेली असते; प्रसंगी अनंताचे विसर्जनही करितात. आपण जे नाही, पण ज्याच्या अस्तित्वाची आपल्याला जाणीव आहे, असे काहीतरी सत म्हणून आहे. आपल्या आर्ततेत त्या सतला आपण निरनिराळे रूप देतो; तोच देव."

# भाग पहिला

एक :

# बॉय-फ्रेण्ड?

मी पंढरपुराहून येऊन विश्रांती घेत कोचावर पडले होते. शेजारीच एका खुर्चीवर लेक काही तरी वाचीत बसली होती, आणि तिचा नवरा ओसरीवरून खोलीत व खोलीतून ओसरीवर अशा येरझरा घालीत होता. निरनिराळ्या कामांची निरनिराळी माणसे त्याला भेटायला येत होती. माणसे आली की तो बाहेर जाई, माणसे गेली की घरात तो माझ्याशी बोले. असे आमचे संभाषण चालले होते.

तो आला. माझ्यासमोर खुर्ची घेऊन बसला आणि त्याने मला विचारले, "काय, भेटला का बॉय-फ्रेण्ड?"

प्रश्न ऐकून काही क्षण मी बुचकळ्यातच पडले. मग लक्षात आले की, हा मुलगा विठोबाबद्दल विचारीत आहे. मी हसून म्हटले, "हो, भेटला की."

एवढ्यात बाहेर माणसे आली. तो निघून गेला.

पण त्याच्या प्रश्नाने माझी झोप मात्र उडाली. एका दृष्टीने बॉय-फ्रेण्ड हे बिरुद नवेच होते, पण अर्थाने काही नवे नव्हते. आई, बाप, सखा, सोयरा, जिवलग अशा कितीतरी नावांनी लोकांनी विठोबाला आळविले आहे. जिवलग वगैरे नावांत जो अर्थ, तोच अर्थ बॉय-फ्रेण्डमध्ये नाही का? प्रियकर म्हणून कितीतरी भक्तांनी देवाला आळविले नाही का?

स्वारी परत घरात आली. दर प्रश्नानंतर बाहेर गेल्यानंतर निरनिराळ्या विषयांवर बोलून परत जुन्या प्रश्नाचा धागा त्याच्या मनात कसा राही, कोण जाणे! त्याने म्हटले, "तुझ्या नवऱ्याला बरा चालतो ग, बॉय-फ्रेण्ड असलेला?" मी म्हटले, "असले बॉय-फ्रेण्ड चालतात नवऱ्यांना." माझे

उत्तर पुरे व्हायच्या आतच कुणीतरी माणसे आली, म्हणून तो बाहेर गेला व माझे मन परत एकदा आमच्या प्रश्नोत्तरांभोवती घुटमळत राहिले. असे बॉय-फ्रेण्ड म्हणजे कसे? दगडाचे? छे! दगडाचा जिवलग चालतोच, असे नाही. मीरेच्या नवऱ्याला, सखूच्या नवऱ्याला, बहिणाबाईच्या नवऱ्याला नाहीच चालला की. तेव्हा जिवलग दगडाचा आहे का हाडामांसाचा आहे, हा प्रश्न नसून तो कितपत जिवलग आहे, ह्यावर नवऱ्याला चालतो की नाही, हे अवलंबून आहे. मीरेला गिरिधारीशिवाय चालतच नव्हते. तसेच बहिणाबाई किंवा सखू विठ्ठलाच्या ओढीने घरदार, नवरा टाकून पंढरीच्या वाटेला चालू लागल्या. माझे थोडेच तसे आहे? नवऱ्याची गैरसोय न करिता सुट्टीच्या दिवशी गाडी मिळते का, मी पाहणार. पंढरपूरच्या वाटेवर ओढ्यांना पूर नाही ना, ह्याची मी खात्री करून घेणार. आज काही विशेष दिवस-एकादशी, द्वादशी, गोपाळकाला वगैरे - नाही ना, देवळात गर्दी नसेल ना, थोडाच वेळ थांबून, देवाच्या पायांवर डोकं टेकून पोटभर दर्शन मिळेल ना? ह्या सर्व गोष्टींचा विचार करून मी सावकाशपणे पंढरपूरला जाणार. माझ्या नवऱ्याच्या दृष्टीने हा बॉय-फ्रेण्ड नुसता दगडाचाच नाही, तर खरोखर जिवलगही नाही. असला न चालायला काय झाले? कधीमधी आपणहूनच मला विचारतो, 'बऱ्याच दिवसांत पंढरपूरला गेली नाहीस ती?' एक दिवस तरी कटकट आणि वटवट लांब गेली! म्हणजे असला बॉय-फ्रेण्ड चालतो, एवढेच नव्हे, तर पुष्कळदा सोयीचाही पडतो.

जावईबुवा परत आत आले. परत माझ्यासमोर बसले. "काय ग, तुझा बॉय-फ्रेण्ड तुला म्हणाला काय?" मी हसले, "तो म्हणाला, झाली वाटतं आठवण?"

माझे वाक्य संपायच्या आत हे वारं खुर्चीवरून उठून बाहेर गेलं होतं. "झाली वाटतं आठवण?" ह्या वाक्याचा अर्थ काय? विठ्ठल एके ठिकाणी रात्रंदिवस उभा आहे. त्याला आठवण कायमचीच असते. तो वाट पाहत असतो. मला मात्र आठवण कधीमधी होते. आणि आठवण झाली, तरी लगोलग मी भेटीला जात नाही. काळ, वेळ, सोय बघून मी जात असते. अशा कधीमधीच्या भेटीला गेले, तर तो दुसरे काय विचारणार? 'झाली का आठवण?' ह्यामधेच आणखी एक प्रश्न आहे. तो म्हणजे 'बये, कशासाठी आली आहेस? काय हवं आहे? काय उणं पडलं आहे?' मीरा देवाच्या प्रेमाने वेडी झाली होती. तिला देव हवा होता. मी थोडीच त्यातली आहे?

सोसवेनासा काही भार शिरी पडला की मला हरी आठवतो. मी एकटी आहे, काहीतरी प्रसंगाला तोंड द्यायचे आहे, काहीतरी सहन करायचे आहे, अशी अवस्था आली की मी देवाकडे धाव घेते. आर्त आणि अर्थार्थी ह्या भक्तांच्या दोन पायऱ्यांपलीकडे मी गेलेच नाही. तेव्हा 'आता झाली का आठवण?' ह्याऐवजी खरोखर 'आता का आठवण झाली?' असा प्रश्न पाहिजे होता.

दार परत उघडले गेले. बाहेर लोक अजून उभे होते. तो आत माझ्याजवळ आला. "उद्या गेलीस, तर नाही का चालणार?"

"नाही. बरीच कामं खोळंबली आहेत. मला आजच गेलं पाहिजे."

"मी ह्या मंडळींबरोबर जरा शेतावर जाऊन येतो आहे. मला यायला उशीर होईल. मी येईन तो तू गेलेली असशील. जपून जा. फार दमलेली दिसतेस." त्याने वात्सल्याने माझ्या तोंडावरून हात फिरविला व तो गेला.

माझ्या मनात आले, भक्ताने विठोबाशी सर्व नाती जोडलेली आहेत. पण त्याला मुलगा किंवा मुलगी केलेले नाही. आई, बाप, भाऊ, बहीण - सर्व काही तो आहे. मग मुलगा का बरे नाही? एखादी जनी असे का बरे म्हणत नाही?...

पंढरीचा विठूराया । जसा पोरगा पोटीचा
मज आधार काठीचा । म्हातारीला
विठूराया पाठीवरी । हात फिरवी मायेने
पुसे लेकाच्या परीने । बये फार भागलीस

...पण छे! जनी काय, किंवा तुकाराम काय, विठूला मुलगा म्हणणे शक्यच नव्हते. मला वाटते, कोणाही भक्ताने देवाला आपले मूल कल्पिलेले नाही. कारण कुटुंबातल्या सर्व उपमा व त्या नात्यांचे कितीही दृष्टान्त दिले, तरी ज्या दृष्टांन्तात देवाकडे लहानपणा येईल, असे दृष्टान्त नाहीत. जिवलग हे नाते बरोबरीचे, पण त्या नात्यातही देव नेहमीच पुरुष असतो व भक्त बाई वा बुवा कोणीही असो, बाईचीच भूमिका पार पाडतो. वऱ्हाडच्या एका प्रसिद्ध सन्तांनी विठ्ठलाच्या नावे गळ्यात काळी पोत व हातात चुडा भरला होता 'मधुरा'- भक्ती ह्या नावाखाली जी भक्ती येते, तीत पुरुषभक्त स्वत:ला राधाच समजतात. जी जी नाती कल्पिली आहेत, त्या सर्वांत हिंदू रूढीप्रमाणे वरचढ समजली जाणारी नाती विठोबाला जडविली आहेत. बाळकृष्ण पूजेत असतो, पण विठोबाला कोणी लेक म्हणाल्याचे आठवत नाही. कृष्णाला मूल म्हणायचा अधिकार फक्त यशोदेचा, आपल्या पोटचा गोळा मारायला

देऊन त्या बदल्यात तिने हा अधिकार मिळविला. तिने देवाला जन्माला घातले नाही. पण त्याला महाप्रयासाने जगविले. मी कोण देवाला असे काही म्हणणारी? मी त्याला इतकी जवळ नाहीच. जिवलग, बॉय-फ्रेण्ड ही नुसती गंमत. त्याच्यामधले व माझ्यामधले अंतर दुर्दैवाने फार, फार -फारच दूर आहे.

१९७०

दोन :

# देवळाविना गाव

गेले काही दिवस आम्ही रोज त्या रस्त्याने जात होतो. एके ठिकाणी एक नवी वस्ती घडत होती. आमच्या डोळ्यांसमोर नवी नवी लहान घरे निर्माण होत होती. हळूहळू सर्व वसाहत बांधून झाली. बऱ्याच घरांतून कुटुंबेही राहायला आली. वसाहतीच्या एका अंगाला काही न बांधलेली अशी एक मोकळी जागा शिल्लक होती; एक दिवस तेथेही पाया खणला गेला. बाकीच्या घरांसारखा तो दिसला नाही. पाहता पाहता एक लहानसे देऊळ उभे राहिले. एक दिवस आमच्या जायच्या वेळेला देवळाच्या पटांगणात गर्दी दिसली. मारुतीची प्रतिष्ठापना चालली होती. परत आलो, तो त्या देवळात आमच्याकडे तोंड करून मारुती उभा!

''आणखी एक नवे देऊळ! पुण्यात काय देवळे कमी आहेत?''

''अग, पण ह्या नव्या वस्तीला कुठे होते देऊळ? आता इथल्या लोकांना दर्शनाला यायला, संध्याकाळचे टेकायला जागा झाली.''

''तुझे आपले काहीतरीच. कुठे लहान वस्ती झाली, तर लगेच देवळाची काय गरज? शिवाय, पहाटेच्या आणि रात्रीच्या भजनाने लोकांचे डोके उठायचे!''

मी हसले आणि पुटपुटले, ''कोइल इल्ले उरिल. कूडी इरक्क वेण्डाम्.''

''तोंडातल्या तोंडात काय म्हणतेस?''

''काही नाही, एक तामिळ म्हण आठवली.'' मी ती म्हण परत म्हणून दाखविली, आणि तिचे शब्दशः भाषांतर केले, 'देवळाविना गावात घर असू नये.' ''कोण जुन्या काळचा मनुष्य होता कोण जाणे! पण त्याला वाटले की,

ज्या गावात देऊळ नाही, तिथे आपली धडगत नाही. ज्या जुन्या काळी ही म्हण झाली असेल, त्या वेळी तरी देवळाशिवाय गाव असण्याची शक्यता नव्हती असे वाटते. जुना काळ गेला, पण जुने संस्कार मनात रुजून आहेत. इथे पुण्यामध्ये ही नवीन वस्ती बांधणाऱ्या लोकांना तमिळ म्हण काही माहीत नसणार, पण त्या म्हणीच्या मागचा संस्कार मात्र त्यांच्या मनावर खासच आहे."

"आहे तरी काय हा संस्कार? त्याचे रूप काय?" परत प्रश्न आला.

मी जरा विचारात पडले. माझी विद्वत्ता दाखवायची बरी संधी आली आहे, ह्याचीही जाणीव झाली. मी सांगू लागले :

"गेल्या वर्षी मी एक जुने पुस्तक वाचीत होते. असेल तेराव्या किंवा चौदाव्या शतकातील. संस्कृतामध्ये लिहिलेले. सर्व पुस्तक नगररचना व घराची रचना ह्यांबद्दल असल्यामुळे मला नीटसे कळले नाही. पण त्यातल्या काही गोष्टी ठळकपणे लक्षात आल्या. नगररचनेसाठी पहिल्यांदा दिशा ठरवून एक चौकोन आखला. त्या चौकोनाच्या बाजूंचे बरोबर आठ भाग करून परत चौसष्ठ चौकोन आतमध्ये आखले व एकेका चौकोनाला एकेका देवतेचे नाव दिले. सर्वांत मोठे देऊळ व त्याचे अंगण मध्यभागी होते. त्यानंतर राऊळ म्हणजे राजकुलाची राहण्याची जागा. नंतर राजाच्या सरदारांचे वगैरे मोठे वाडे असलेला रस्ता. नंतर अतिशय धनिक व्यापारी, हिऱ्या-मोत्यांचा व्यापार करणारे वगैरे गोष्टींपासून सुरूवात होऊन भाजीपाला विकणारे, मीठ-मसाला विकणारे अशा प्रकारच्या लोकांची दुकाने, मध्यमवर्गाची दुकाने, शहराच्या चौकोनाबाहेर अस्पृश्यांची घरे आणि त्यांच्यापासून दूर अंतरावर नगररचना करणाऱ्या स्थपतींची व सुतारांची घरे, असा एकंदर आराखडा दिलेला आहे.

"नगरामध्ये कुठे काय आहे, हे सांगताना त्या चौकोनातील देवाच्या देवळाचा उल्लेख होई. म्हणजे बरोबर कोठच्या जागेबद्दल वर्णन आहे, हे निश्चित समजे. देवांचा व देवळांचा स्थाननिश्चितीसाठी अशा तऱ्हेने केलेला उपयोग मला नवीनच होता. पण एक गोष्ट लक्षात आली की, देव हे स्थापत्यशास्त्राने निर्माण केलेले नसून, आधीच अस्तित्वात असलेल्या देवांचा स्थाननिश्चितीसाठी ह्या ग्रंथकाराने फार हुषारीने उपयोग करून घेतला. ह्या पुस्तकामध्ये कोणाची घरे कुठे असावी, हे तर दिलेच आहे, पण एकेका आळीतील घरांची उंची सारखी असावी, असे देऊन कोठच्या

आळीतील घरे किती उंच, म्हणजे किती मजली असावीत, हेही सांगितले आहे. गावाच्या मध्यभागी असलेले सर्वांत मोठे देऊळ ही गावातील सर्वांत उंच इमारत असावी, असे सांगितलेले आहे.

"देवळाखालोखाल देवळाच्या शिखरापेक्षा कमी उंचीचा राजवाडा असावा व राजवाड्यापेक्षा कमी उंचीची घरे ब्राह्मणांची असावीत, असा नियम घातलेला आहे. ब्राह्मण आपल्याला कितीही मोठे समजत असले, तरी विष्णूचा प्रतिनिधी जो राजा, त्याचा मान केव्हाही मोठाच होता. आणि प्रतिनिधीपेक्षा प्रत्यक्ष देवाचा मान सर्वांत मोठा होता. लांबूनही येणाऱ्या प्रवाशाला देवळाचे शिखर दिसले की गाव आले, असे समजावे. देवळाचे शिखर ही गावाच्या अस्तित्वाची, वैभवाची व अभिमानाची एक खूण होती. आपल्याकडे महाराष्ट्रात डोंगरावरची देवळे सोडली, तर गावातील सपाट भुईवर बांधलेली देवळे इतकी भव्य नाहीत. पण दक्षिणेत मात्र अजूनही अशी उंच आणि अतिभव्य देवळे दिसतात. मदुरेच्या मीनाक्षीसुंदरमच्या देवळाची उंचउंच गोपुरे पाचदहा मैलांच्या परिसरात कोठूनही दिसतात. ख्रिस्ती लोकांची देवळेही त्याच पद्धतीने बांधलेली. वरील पुस्तकात दिल्याप्रमाणे देव व देऊळ ह्यांचा स्थलनिश्चितीसाठी उपयोग होई. आपल्या पुण्यातही पूर्वी देवळांचा उपयोग तसा होई. भांग्या मारुती, पासोड्या विठोबा तर होतेच, पण वेश्यांच्या वस्तीत एक छिनाल मारुतीसुद्धा होता."

"एवढ्याचसाठी का देवळे होती?" माझ्या व्याख्यानावर औपरोधिक प्रश्न आला. "देऊळ असले म्हणजे आपल्या घराची खूण व पत्ता नीट देता येईल, असेच ना तुझे म्हणणे?"

"नाही; देऊळ हे एक श्रद्धास्थान आहे. आशा-आकांक्षांचे प्रतीक आहे. ज्या गांवात ते नसेल ते एक श्रद्धा नसलेले, कोठच्याही तऱ्हेच्या सामुदायिक आकांक्षा नसलेले ठिकाण असते. म्हणून तेथे राहू नये, असे भाष्य हा म्हणीवर करावे लागेल."

"देऊळ म्हटले, म्हणजे तुझ्या मनात आहे तरी काय? जे नाहीच, त्याच्यासाठी उभारलेली इमारत म्हणजे देऊळ ना? कसले ग प्रतीक होते ते?"

"एक प्रकारे तू म्हणतेस ते खरेच. देवळामध्ये अरूपाला रूप दिलेले असते. अनादीची प्राणप्रतिष्ठा केलेली असते; प्रसंगी अनंताचे विसर्जनही करितात. आपण जे नाही; पण ज्याच्या अस्तित्वाची आपल्याला जाणीव आहे. असे काहीतरी सत म्हणून आहे. आपल्या आर्ततेत त्या सतला आपण निरनिराळे

रूप देतो; तोच देव. जी मागणी मानवाजवळ करिता येत नाही, ती आपण देवाजवळ करितो. कायमचा आसरा मागतो, न्याय मागतो, निवारा मागतो, शांती मागतो... किंवा निरनिराळ्या प्रासंगिक मागण्या करितो. अगदी काहीच नाही, तर संसाराच्या भगभगीत क्षणभराची उसंत मिळावी, म्हणून देवळात जातो. काहींना असा आधार पसंत नाही. काहींना असा आधार घ्यावासा वाटतो. आपल्यापेक्षा सर्वस्वी श्रेष्ठ असे काही वाटते, त्याचे प्रतीक देऊळ!''

''देवळाच्या उंचीचे व भव्यतेचे तू वर्णन करीत होतीस, तर राजवाडे, ताजमहाल हे नाहीत का भव्य? तेसुद्धा नाहीत का कोठच्यातरी भव्यतेची प्रतीके?''

''नुसतीच भव्य का, सुंदरही आहेत. पण ती उपासनेची स्थाने होऊ शकत नाहीत. शिक्षणसंस्था अशा काही भव्य व दिव्य भावनेचे प्रतीक होऊ शकतील अशी वेडी कल्पना काहींनी बाळगिली होती, पण त्याही तशा होऊ शकल्या नाहीत. इतरांची देवळे फोडणारे धर्म आहेत, स्वतःच्या देवळांना छिन्नभिन्न करून स्वतःचा भूतकाळाशी संबंध पार तोडून टाकणारेही लोक आहेत. अशा काळात देवळाविना राहू नये, म्हणणारा वेडाच ठरणार. पण अजूनही पुष्कळांच्या मनात ही भावना आहे. तीत देवळाच्या भव्यपणाला वा सौंदर्याला दुय्यम स्थान आहे. आतील मूर्तीला तिच्या भोवताली गोळा झालेल्या शतकानुशतकांच्या आर्ततेच्या, कारुण्याच्या, शांतीच्या व पावित्र्याच्या भावना आहेत. ताजमहाल किंवा जयपूरचा राजवाडा पाहतो, त्या वेळच्या भावना व पंढरपूरला विठ्ठलाची मूर्ती पाहतो, त्या वेळच्या भावना अगदी निराळ्या आहेत. देऊळ नाही, तेथे भावनाही नाहीत, म्हणून तेथे राहू नये, असे त्या तमिळ माणसाचे म्हणणे दिसते.''

''ड्रेनेज, दुकाने, स्वच्छ वस्त्या, रस्ते व दवाखाना असल्या गोष्टी गावाला आवश्यक आहेत. त्या जोडीला बागा व करमणुकीची साधनेही हवीत. शाळा कॉलेजे-वाचनालयेही हवीत. पण देवळाचे काय प्रयोजन? बाकीच्या गोष्टींनी माणसाचे आयुष्य सुसह्य होते. देवळाने काय होते?''

''जगातील सर्व चांगल्या गोष्टी मिळाल्या, म्हणजे मग काही हवेसे वाटत नाही, असे नाही. सर्व मिळूनही काहीतरी हुरहूर वाटते. आपल्याला शरीरस्वास्थापलीकडे काहीतरी आहे, ह्याची जाणीव असते. अगदी सर्व माणसे सुखी झाली, तरीसुद्धा आयुष्यात काहीतरी प्रश्न उरतातच. गरीब माणसे नसली, तर त्यांची स्थिती सुधारण्यासाठी धडपड करणाऱ्या

माणसांचे काय होईल? अज्ञान माणसे नसतील तर त्यांना सज्ञान करण्यासाठी प्रयत्न करणाऱ्यांचे काय होईल? असल्या प्रकारचा हा आचरट प्रश्न नाही. माणसाला ध्येये असावीत, म्हणून देवाने जगात अपूर्णता ठेविली आहे, असेही नाही. जगात पूर्णता असली, तरी काही उणे आहे असे वाटत राहील व सारखे वाटत राहते. ते पूर्ण करायची जी इच्छा, तिचे प्रतीक देऊळ आहे."

माझ्या मनात नव्याने एक विचार आला. मी म्हटले, "आपल्या संतांनी शरीराला 'देहगाव' म्हटले आहे. ह्या गावातसुद्धा देऊळ वा देव असलाच पाहिजे, असा त्यांचा आग्रह होता. बाहेरच्या गावातून देव नसला तरी तो चालेल, पण अंतर्यामी तो असावा, अशी त्यांची भावना होती. आयुष्यात मिळण्यासारखे असेल ते मिळाले, तरी मनाची कशासाठी तरी धडपड चाललेली असते. काहीतरी अशांतता मनाला पोखरीत असते. कशामुळे तरी निराधार वाटत असते."

माझे म्हणणे मध्येच थांबवून तिने विचारले, "तू म्हणतेस हे मरणाच्या जाणिवेमुळे तर नसेल? अगदी सुखात बुडालेले असलो, तरीसुद्धा ह्या सुखाला अंत आहे, अशी बोचणी असते. कितीही जिवास जीव देणारे मित्र असले, तरी आपण एकाकीच आहोत, एकटेच राहणार व एकटेच जाणार, ह्या भीतीने माणूस ग्रासलेला असतो. मनाची धडपड, अशांतता, अगतिकता सर्व ह्यामुळेच असेल. हृदयातल्या देवाला शोधण्याची, त्याच्यासाठी लागलेल्या तहानेची ती धडपड नसेलच मुळी."

"तेही खरेच. दोन्ही तऱ्हांची माणसे आहेत. काही अंतर्यामात देव शोधीत असतात. जगण्याला काहीतरी अर्थ शोधीत असतात. आणि जीवन सर्वस्वी अर्थहीन आहे, पण ते शक्य तितके सुखावह करणे, मानाने जगणे व इतरांना जगविणे ह्या बुद्धीने काही जगत असतात. एका दृष्टीने ह्या ध्येयवाद्यांना कुठचातरी देव सापडलेला असतो. काहींना हा ध्येयवाद नसतो. ते आपले स्वतःचे, अगदी सर्वस्वी स्वतःचे असे एक जीवन जगतात. जगातले जेवढे मिळण्यासारखे असेल, ते ते घेत राहतात; आणि एक दिवस-एका क्षणी- स्वतःच्या एकाकीपणाची, असहायतेची व निष्फळतेची त्यांना इतकी तीव्र जाणीव होते की, त्याने जगणे अशक्य होऊन ते जीव देतात.

"बाळ व लहानी तुला माहीत आहेतच. काय उमदी पोरे होती! त्यांना काही कमी नव्हते. दोघांचीही परिस्थिती बाहेरून दिसायला हेवा करण्यासारखी! दोन्ही पोरे अगदी रस घेऊन सर्वतया जीवन जगत होती.

एकाने परमुलुखात जीव दिला. कुटुंबापासून दूर. एकाकी. शेवटी वडिलांना लिहिलेले एक पत्र!...

"दुसरीने भरल्या घरात एक दिवस जीव दिला. शेवटच्या पत्रातली असहायता व एकाकीपणा हृदयाला पीळ पाडणारा होता. पण सामान्याला कळण्यासारखा नव्हता. आई, भांवडे, नवरा, मुले, संपत्ती, शिक्षण, रूप, मित्रांचा परिवार सर्व होते. मग हा एकाकीपणा का? मागे राहिलेल्यांना निरंतरचे अपराधी करून हे जीव गेले. का? का? का?"

"हा प्रश्न कित्येक वर्षे मी विचारीत आहे. मला आता वाटते की, त्यांच्या गावात देव नव्हता व देऊळही नव्हते. एका क्षणी भरल्या संसारात ही निराधारपणाची जाणीव तीव्र झाली असली पाहिजे."

क्षणाची फुरसत न देता प्रश्न आला, "अग, पण ज्ञानदेव का गेले? ते तर देवाविना नव्हते ना?"

तितक्याच वेगाने मी उत्तरले, "त्यांचा देव व देऊळ एवढे मोठे झाले होते की, ते लहानशा शरीरात मावेनातसे झाले. शरीराचे बंधन त्यांना अशक्य झाले. शरीरात राहून देवाएवढे मोठे होणे शक्य नव्हते, म्हणून ते गेले."

दोघींच्या संभाषणाचा दुवा तुटला. प्रत्येकजण आपापल्या विचारात गुरफटलो. माझे मन एक कोडे सोडवीत होते.

संभाषणाच्या भरात का होईना, बाळ, लहानी आणि ज्ञानदेव अशी सर्वस्वी निराळी माणसे एकत्र गोवली गेली होती. सर्वांनी पंचविशीच्या आत जीव दिला होता, एवढेच का साम्य त्यांच्यात होते? त्या साम्यापाठीमागे जाणिवेचा तीव्रपणा व जाणीव झाल्याबरोबर त्याप्रमाणे कृती करण्याची उतावीळ, हेही होते ना? तिघांनीही धावत जाऊन मृत्यू कवटाळला होता.

...आणि आम्ही इतर? आमच्या गावात देव आहे का, ह्याचा विचार आम्ही कधी केला आहे का? रिते आहोत का भरलेले आहोत, हा प्रश्न कधी आमच्या मनाला पडला आहे का? जन्मल्यापासून जिवंतपणे वावरत आहोत. हळूहळू विचाराविना वाट चालत आहोत. मृत्यू अगदी 'उरीं आदळे'पर्यंत.

"काय होतंय तुला?" माझा सुस्कारा ऐकून तिने काळजीने विचारले.

माझ्या अथांग रितेपणातून उत्तर आले, "काही नाही, अगदीच काही नाही."

१९६८

तीन :

# दुसरे मामंजी

मी कर्व्यांची सासुरवाशीण झाले. त्या दिवशी अप्पा माझे मामेसासरे झाले. माझी मुले शकूला (अप्पांच्या मुलीला) 'आत्याबाई' म्हणतात. पण खरे म्हणजे हे नाते माझ्या लक्षातच येत नाही. कर्व्यांच्या घरच्या कोणाचीही ओळख होण्याआधीच किंबहुना ते नावही माहीत होण्याच्या आधी मी अप्पांच्या घरची झाले. माझ्या मनाच्या घडणीत त्यांचा वाटा इतका आहे की, खरे म्हणजे ते माझे दुसरे पिताजीच म्हणायला पाहिजेत.

मी त्यांच्या घरी गेले, तो प्रसंगही मोठा चमत्कारिक. मी त्या वेळेला हुजूरपागेच्या बोर्डिंगात राहून शिकत होते. कुणाबरोबर तरी दुपारची खेळायला म्हणून फर्गसन कॉलेजातल्या त्यांच्या बंगल्यावर गेले होते. तेथे सईताई भेटल्या व मला त्यांच्याबद्दल काही विलक्षण ओढ वाटली. गंमत अशी की, त्यांनाही माझ्याबद्दल काही विशेष आकर्षण वाटले असले पाहिजे. त्यांनी मला विचारिले, "आमच्याकडे रहायला येशील का?" मीही चटदिशी 'हो' म्हणून गेले. सईताईंच्या नेहमीच्या स्वभावाप्रमाणे त्यांनी माझ्या आई-वडिलांची चौकशी करून, ब्रह्मदेशात माझ्या वडिलांना पत्र लिहून मला आपल्या घरी ताबडतोब रहायला आणिले. आणि माझ्या वडिलांनी आपल्या स्वभावाप्रमाणे बोर्डिंगात पैसे पाठवायचे ते परांजप्यांकडे पाठवायला सुरुवात केली. तेव्हापासून काही वर्षे सतत व काही वर्षे येऊन-जाऊन मी त्यांच्या घरी होते.

सईताई म्हणजे सीताबाई... अप्पांचे दुसरे कुटुंब. त्यांना माणसे फार आवडत व माणसांनाही अगदी तीन-चार वर्षांच्या मुलांपासून तो

कॉलेजातील विद्यार्थी व अप्पांचे मित्र ह्यांपर्यंत सगळ्यांनाच, त्या हव्याहव्याशा वाटत. ही सगळीच चाहते-मंडळी अप्पांच्या आवडीची नसत. मला वाटते, मी जी अप्पांच्या घरी घुसले, तीसुद्धा थोडीशी त्यांच्या मनाविरुद्धच. माझे त्यांच्या घरात येणे सईताईंखेरीज इतर कुणाला फारसे रुचले असेल, असे वाटत नाही. त्यामुळे मीही कित्येक महिने सईताईंच्याच भोवतीभोवती असे. पहिले काही दिवस तर मला असा अनुभव आला की, त्यामुळे घरातल्या इतर वडील माणसांपासून शक्य तितके लांबच राहण्याचा मी प्रयत्न करू लागले.

ज्याच्याशी मनात नसताना पदोपदी संबंध येई व मनस्ताप होई, असे एक मनुष्य म्हणजे वहिनी- सईताईंच्या आई. ह्या बाई एक अपत्य झाल्याबरोबर विधवा झालेल्या होत्या. त्या पुण्यात-गावात राहत असत. पण सईताईंचे लग्न झाल्यावर काही वर्षांनी सईताई आजारी पडल्यामुळे त्या लेकीच्या घरी रहायला म्हणून ज्या आल्या, त्या मरेपर्यंत तेथेच राहिल्या. संसार करायच्या दिवसांतच विधवा होऊन बोर्डिंगमध्ये राहिल्यामुळे त्यांची संसाराची सर्वच आशा अपुरी राहिलेली होती. अचानकपणे त्या लेकीच्या संसारात आल्या होत्या आणि तो त्यांनी अतिशय नेकीने, काटकसरीने, पैशाच्या दृष्टीने अप्पांचे हित बघून केला. पण त्यांची काटकसर, रूक्षपणा, क्षुद्रपणे लोकांना घालून-पाडून बोलायची सवय ह्यांचा घरात सर्वांनाच त्रास होई. तरीही पहिल्याने अपरिहार्य म्हणून व मागून कर्तव्यबुद्धीने अप्पांनी ह्या बाईंचा सासुरवास आपल्या स्वत:च्या घरात सहन केला. ह्या बाई काही वेळेला सकारण, पण बऱ्याचदा निष्कारण मला रागावत व माझा दु:स्वास करीत आणि त्यामुळे होता-होईतो त्यांचा संबंध टाळायचा, अशी माझी प्रवृत्ती असे.

विलक्षण गोष्ट म्हणजे अप्पांच्याबद्दलही मला अतिशय भीती वाटत असे. अप्पा कधीही मला अपमानकारक बोलल्याचे किंवा जोराने रागावल्याचेसुद्धा आठवत नाही. तरी पण त्यांचा मोठा आवाज, आकडेबाज मिशा, गडगडाटी हसणे, उंच व भव्य देह ह्यांच्यामुळे की काय, मला त्यांची भयंकर भीती वाटत असे, हे मात्र खरे. इतरही लहान-लहान कारणे भीती वाटायला होती. एक म्हणजे मला गणित बिलकुल येत नसे; आणि अप्पा कधीकधी आम्हा मुलांना तोंडचे हिशेब घालीत व उत्तरे विचारीत. अशा वेळी अंग चोरून मी कितीही लहान व्हायचा प्रयत्न केला, तरी त्यांच्या

दृष्टीतून निसटत नसे. मी चुकीची उत्तरे दिली की, ते मला समजावून सांगायचा प्रयत्न करीत. पण मी इतकी भेदरलेली असे की, ते काय सांगतात, हे मला ऐकूच यायचे नाही. संध्याकाळी ते क्लबातून घरी यायच्या आत दोन घास खाऊन मी बिछान्यावर झोपेचे सोंग घेऊन पडत असे. पण ही युक्ती नेहमीच जमायची नाही. त्यांची भीती वाटायचे आणखी एक कारण म्हणजे घरातल्या मुलांना ते आळीपाळीने इंग्रजी वाचायला सांगत. ते आरशापुढे दाढी करायचे व बहुतकरून शकू व कधीमधी दुसरे कोणीतरी उभे राहून पुस्तक वाचायचे. वाचताना चूक झाली की, ते जोराने खेकसायचे व चूक सुधारून द्यायचे. मला आठवते आहे की, एकदा साळूताई (अप्पांच्या घरी असलेली आणखी एक मुलगी) त्यांच्याजवळ वाचीत असताना एका इंग्रजी शब्दाचा उच्चार करायला चुकत होती; ते परत-परत तिला बरोबर उच्चार करून दाखवीत होते व तिला ते काही कळत नव्हते. शेवटी ती बिचारी घेरी येऊन पडली. हा प्रकार पाहिल्यावर तर अप्पांच्या दाढीच्या वेळेला लांबूनसुद्धा त्यांच्या दृष्टीस न पडण्याची खबरदारी मी घेऊ लागले. तिसरे कारण म्हणजे अप्पांचा निरीश्वरवाद. संधी मिळेल तेव्हा देवपूजा व व्रतवैकल्ये ह्यांची ते चेष्टा करीत असत. कुठे मला लागले, किंवा परीक्षेत नापास झाले, तरी मला म्हणत, ‘‘आता कुठे गेला होता तुझा देव? कर की त्याला नवस!'' त्यांच्या चेष्टेला मला उत्तर देता येत नसे, पण मनाला वाईट वाटे, व त्यामुळेही मी होता... होईतो त्यांच्यापासून लांब राही.

अप्पांचे घर म्हणजे सुखवस्तू, आतिथ्यशील गृहस्थाचे घर होते. घरी गडी मनुष्य, म्हशी, घोडागाडी वगैरे होते. पण माझ्या आठवणीत, ते मिनिस्टर होईपर्यंत स्वयंपाकी नव्हता, वहिनी, साळूताई व आम्ही मुली अशा स्वयंपाकघरातली कामे करीत असू. अगदी लहानपणी भाज्या, कोशिंबिरी, जरा मोठी झाल्यावर भात, भाकरी, पोळी वगैरे जिन्नस करायला शकूच्याबरोबर मीही शिकले. निवडणे-टिपणेही सगळ्यांकडून-मुलगे व मुली मिळून होत असे. डाळ-तांदूळ, गहू-जोंधळा सर्व जिनसा सगळ्यांना वाटे घालून सारख्या निवडायला देत असत. असडी तांदूळ कांडायलाही मी त्यांच्याकडेच शिकले. शकू व सईताईही कांडप करीत. खाणे, पिणे, काम करणे, कुठच्याही बाबतीत आपली मुलगी व इतर असा भेद त्या घरात झाला नाही. फरक काय तो माझ्या आठवणीत एका बाबतीत होई. तो म्हणजे शकू आमच्यापेक्षा कितीतरी जास्त वेळा मार मात्र खात असे. तिने परवा नुकतीच

एक आठवण नव्याने सांगितली. ती शाळेतला इंग्रजीचा धडा अप्पांच्या समोर वाचीत होती. अप्पांनी तिला एका शब्दाचा अर्थ विचारिला. तो तिला काही आला नाही. मी असते, तर मुकाट्याने अप्पांचे बोलणे ऐकून घेतले असते. पण शकू कसली खट! त्यांना म्हणाली वाटते, ''तुमच्या इरावतीला विचारा. तिलासुद्धा माहीत नाही ह्या शब्दाचा अर्थ!'' अप्पांनी मला बोलाविले, आणि त्या शब्दाचा अर्थ विचारिला. माझ्या सुदैवाने मी तो धडा करिताना तो शब्द डिक्शनरीत पाहून ठेविला होता व तो मला माहीत होता. अर्थात मी तो बरोबर सांगितला. शब्दाचा अर्थ माहीत नाही म्हणून व वर तोंड करून बोलली म्हणून आणखी अशा दुहेरी अपराधाबद्दल शकूला चांगला चोप बसला. शकूला चोपणे हेच मला वाटते त्यांच्या तिच्यावरल्या मायेचे चिन्ह होते. आजतागायत त्यांची ही वृत्ती कायम आहे. त्यांची नात सई चित्रे छान काढिते, नाटके लिहिते, नाटकात स्वत: काम करिते. पण हे कधी एका शब्दाने तिला शाबासकी देतील तर शपथ. परवा मजजवळ म्हणाले, ''सईचं आजचं नाटक छान झालं होतं नाही?'' तेव्हा मी म्हटले, ''अप्पा, पोरीजवळ का नाही मग तसं म्हणत?'' तर मला म्हणतात, ''उगीच स्तुती केली तर शेफारून जाईल! आपलं न बोललेलच बरं.''

अप्पा जरी काव्याचे भोक्ते नाहीत, तरी एका ठराविक कालखंडापर्यंतच्या इंग्रजी वाङमयाचे अगदी एकनिष्ठ भक्त आहेत. भाषांतरित फ्रेंच वाङमय त्यांनी वाचलेले आहे व काही आम्हा मुलींकडून वाचूनही घेतलेले आहे. पण इंग्रजी वाङमयाशी त्यांचा संबंध अगदी जिव्हाळ्याचा आहे. नुसत्या कादंबऱ्याच त्यांनी आमच्याकडून वाचून घेतल्या असे नव्हे, तर शेरिडन, गोल्डस्मिथ थोड्या प्रमाणात शेक्सपियर ह्यांची नाटकेही वाचून घेतली.

जॅन ऑस्टेनच्या बाबतीत तर त्यांची भक्ती पराकोटीची आहे. जॅन ऑस्टेनच्या निरनिराळ्या कादंबऱ्यांतील माणसे पुस्तकांतच न राहता आमच्या घरी जणू नित्य वावरत असत. आयुष्यात प्रत्येकजण आपल्या मताने आपली स्वत:ची अशी एक भूमिका वठवीत असतो. एका मनुष्याची भूमिका सदैव व सर्वत्र एकच असत नाही. घरी, कचेरीत, मित्रमंडळींच्या घोळक्यात, क्रीडांगणावर मनुष्य आपापल्या मताप्रमाणे काही विशिष्ट कल्पना मनात ठेवून त्या आचरीत असतो. अप्पांनी घरामध्ये तरी निदान जेन ऑस्टेनच्या 'प्राइड अँड प्रेज्युडिस'मधील मिस्टर बेनेटची भूमिका वठवायचे

ठरविले होते. बेनेटच्या तोंडची वाक्येच्या वाक्ये अनुरूप प्रसंग आला की ते बोलून दाखवीत. आणि असे अनुरूप प्रसंग माझ्या लहानपणी दिवसातून निदान दहा-बारा वेळा येतच. बॅनेटच्या हुशार, फटाकड्या, मानी व उतावळ्या मुलीची भूमिका शकूकडे असे, आणि बेनेटच्या भोळसर, वेडपट व स्वत:ला आजारी समजणाऱ्या बायकोची भूमिका सईताईंना बहाल केलेली होती. आपल्या भोवतालच्या माणसांचा भोळेपणा, वेडेपणा, आढ्यता वगैरे लहानसहान दोषांवर बोचक शब्दांमध्ये समर्पक टीका करणे हे मिस्टर बेनेटचे वैशिष्ट्य होते. आणि तशा तऱ्हेची टीका अप्पा घरातील सर्वांच्यावर अधूनमधून करीत असत. ह्या टीकेचे आम्हा मुलींना त्या वेळी काही वाटत नसे व अजूनही काही वाटत नाही. सईताईंना कधीमधी ही टीका झोंबत असे, असे मला आता आठवते.

'प्राईड अँड प्रेज्युडिस'च्या जोडीला नेहमी वाचलेली दुसरी कादंबरी म्हणजे 'मॅन्सफील्ड पार्क'. तीत सर टॉमस नावाच्या सदाचरणी, कर्तव्यतत्पर मुलाच्याबद्दल महत्त्वाकांक्षा बाळगणाऱ्या एका मनुष्याचे चित्र रेखाटलेले आहे. त्याच्या घरी एक मुलगी रहायला आणलेली होती. ती आपली भित्री व रडूबाई असायची. ह्या भिऊन-भिऊन वागणाऱ्या फॅनीची भूमिका मला दिलेली असे. सर टॉमसच्या घराची व्यवस्था ही त्याची स्वत:ची बायको आळशी व भोळसट असल्यामुळे बायकोची थोरली बहीण पाहत असे. ही बाई सर टॉमसच्या पै-पैला जपणारी, सर टॉमसच्या मुलींचे लाड करणारी व फॅनीला छळणारी अशी होती. ह्या मिसेस नॉरिसचे नाव बिचाऱ्या वहिनींना बहाल केले होते. जेन ऑस्टेनच्याच जोडीला गोल्डस्मिथही अप्पांचा फार लाडका. त्याची 'व्हिकार ऑफ वेकफील्ड' ही कादंबरी आम्ही दोन-चारदा तरी वाचली असेल, तीतल्या भूमिका कोणाला बहाल झाल्या नसल्या; तरी तीतली वाक्येच्या वाक्ये प्रसंगानुसार अप्पा म्हणत असत. तरुण शाळकरी मुलींच्या निरर्थक गप्पा कधीकधी चालतात, तशा एकदा शकू व मी बोलत असता अप्पा शेजारच्या खोलीतून ('व्हिकार ऑफ वेकफील्ड' मधल्या बर्चेलप्रमाणे) नुसते जोरात 'फज्' (Fudge) असे म्हणाले. आम्ही भानावर आलो, हसलो व निरर्थक बडबड बंद केली.

अप्पांच्या घरी शब्दकोशाचा उपयोग सारखा करावा लागे. शब्दांचा अर्थ, उच्चार व कळेल तेथे ज्या लॅटिन, ग्रीक, अँग्लोसॅक्सन किंवा जर्मन धातूपासून तो बनला असेल, त्याची चिकित्सा इतका खटाटोप करावा

लागे. अप्पांचे शब्दज्ञान मोठे अचूक. शकू व मी शब्द अडला की, एकमेकींना विचारून, कधी सईताईंना विचारून, तर कधी अदमासाने ठोकून देत असू. आम्ही कोणाला शब्द विचारितो, हे अप्पांना ऐकू आले की ते ''डिक्शनरीत पहा की! त्या आहेत कशाला घरी?'' असे मोठ्याने म्हणत, शब्दार्थावरून एक प्रसंग आठवतो आहे : कॉलेजमधले संस्कृत पुस्तक चालू असता शकू मला 'नितम्ब' शब्दाचा अर्थ विचारीत होती. हाच शब्द मराठीतही माझ्या वाचनात आला होता. जो शब्द शकू विचारीत होती, तो ''प्रियानितम्बोचितसंनिवेशैर्विपाटयामास युवा नखाग्रैः।'' ह्या ओळीतला होता. मी अगदी निःशंकपणे सांगितले, ''त्या शब्दाचा अर्थ गाल.'' अप्पा तेथेच होते. ते म्हणाले, ''काहीतरी सांगू नकोस; त्या शब्दाचा अर्थ आहे ढुंगण अथवा कुल्ले.'' मीपण माझ्या संस्कृतप्रभुत्वाच्या व माझ्या वाङमयाच्या कल्पनांच्या धुंदीत होते. मी अगदी सोवळ्या घरात वाढत होते. जे वाङमय अप्पा वाचून घेत, तेही सोवळेच होते. प्रियेच्या नितंबांचा उल्लेख वाङमयात येईल, ही कल्पनाही मला नव्हती. शिवाय, अप्पांना संस्कृत फारसे समजत नाही, ह्या ऐटीतही मी होते. मी म्हटले, ''इश्श, अप्पा! काहीतरीच काय सांगता?''

ते म्हणाले, ''मी काहीतरी सांगत नाही; बरोबर तेच सांगतो आहे.''

मी म्हटले, ''माझेच अगदी पैजेनं बरोबर आहे.''

अप्पा म्हणाले, ''बरं, बरं, हजार रुपयांची पैज! पण आता तेवढा आपट्यांचा कोश आण आणि तो शब्द बघ.''

...अजून मी अप्पांचे देणे फेडले नाही.

अप्पांच्या घरचा कार्यक्रम संथ. एका ठराविक मार्गाने जाई. मोठ्याने वाचन करण्यात खंड बहुधा पडत नसे. मोठ्याने नाट्यवाचन करणे हे दुसरे इतर वाचन करण्याइतकेच अप्पांना फार आवडत असे. वर सांगितलेल्या इंग्रजी नाटकांखेरीज 'शारदा', 'संशयकल्लोळ' व 'सौभद्र' ही त्यांची आवडती नाटके. एखाद्या शनिवार, रविवारी दुपारची जेवणे लवकर आटोपून एकेकाच्या हातात एकेक पुस्तक ह्याप्रमाणे सईताई, अप्पा, शकू व मी वाटून दिलेल्या भूमिकांप्रमाणे तासा-दोन-तासांच्या बैठकीत सबंध नाटक वाचून काढीत असू. सर्व कुटुंब एकत्र बसून. अशा तऱ्हेने इंग्रजी भाषेतील कित्येक पुस्तके आम्ही वाचली. त्यामध्ये स्विफ्टच्या लिलिपुट-ब्रॉबडिंगनॅगच्या सफरी होत्या, डिकन्सचे 'पिक्किक पेपर्स' होते, थॅकरेचे 'व्हॅनिटी फेअर'

होते, जॉर्ज एलियटचे 'सायलस मार्नर' होते. 'सायलस मार्नर' ही आम्हा सगळ्यांनाच आवडणारी कथा होती. आम्ही दोन-तीनदा तरी ती वाचली असेल. माझ्या आयुष्यात ज्या काही अत्यंत सुखाच्या आठवणी आहेत, त्यांमध्ये ह्या एकत्र कौटुंबिक वाचनाच्या आठवणी आहेत.

अप्पांनी आम्हाला आधुनिक ललितलेखक मॅट्रिक पास होईपर्यंत वाचू दिले नाहीत. शॉ तर त्यांना बिलकुल आवडत नसे. पण आम्ही तो भांडून वाचलाच. पण शॉ किंवा बॅरी ह्यांची नाटके व वेल्स, बेनेट किंवा गॉल्सवर्दी यांच्या कादंबऱ्या कौटुंबिक वाचनात कधी आल्या नाहीत. अप्पांच्या मते पूर्वी झालेल्या ब्रिटिश लेखकांच्या तोडीचे हे नवे लेखक नाहीत.

अप्पांची वाङमयीन आवड त्यांच्या मनाच्या ठेवणीची निदर्शक म्हणावी की ह्या लेखकांनी ती ठेवण तशी बनविली, हे काही मला नीटसे सांगता येत नाही. मूल आपले गुण घेऊन जन्माला येते, ही गोष्ट तर खरीच, पण संस्कारक्षम वयामध्ये झालेल्या वाचनाचाही परिणाम मनावर होत असला पाहिजे. मिल, स्पेन्सर, बेंथम ही मंडळी बुद्धिवादी, सुधारणावादी व व्यक्तिस्वातंत्र्याची भोक्ती अशी होती. ह्या सर्वांच्या नीतिमत्तेबद्दलच्या कल्पना त्या वेळच्या काळाप्रमाणे ठाम अशा होत्या. नवीन मानसशास्त्राचा विकास त्या वेळी झालेला नव्हता. त्याचप्रमाणे समाजशास्त्राचाही प्रसार त्या वेळी इतका झालेला नव्हता. मनुष्य आडवाटेने जातो, त्याला कारणे म्हणून लहानपणी घडलेले संस्कार, वैफल्य, समाजरचनेचे दोष वगैरे दाखवून त्याच्या कृतीचे आकलन आणि त्याचबरोबर थोडेबहुत समर्थन हल्लीच्या वाङमयात जितके होते, तसे अप्पांना आवडणाऱ्या लेखकांत मुळीच दिसून येत नाही. बनियनच्या 'पिल्ग्रिम्स प्रोग्रेस' मध्ये म्हटल्याप्रमाणे सदाचरणाची वाट अगदी सरळ व अरुंद अशी होती. त्या वाटेने जाणाऱ्याला कुठे फाटा भेटायचा नाही, किंवा वाटेवरच्या वाटेवरच जरा पाऊल इकडचे तिकडे करायला जागा नव्हती. जेन ऑस्टेनच्या सगळ्या कादंबऱ्यांतही हीच वृत्ती दिसून येते. तिने रंगविलेले काही खलनायक किंवा तिच्या मताने कसोटीस न उतरलेल्या स्त्रिया तिच्या नायक-नायिकांपेक्षा एक दोन उदाहरणांत तरी जास्त आकर्षक वाटतात. पण कुठे तरी चूक घडल्यामुळे जेन ऑस्टेनने त्यांना भरपूर प्रायश्चित्त दिलेले आहे.

सईताई आणि अप्पा ह्यांच्याबद्दलच्या माझ्या सुरुवातीच्या भावना हळूहळू बदलत गेल्या. मी मोठी होत होते, माझी समज वाढत होती, हे जसे

त्याचे एक कारण, तसेच त्या दोघांचा स्वभाव हेही दुसरे कारण. सईताई सुरेख होत्या, प्रेमळ होत्या, त्यांना काव्याची गोडी होती, पण त्यांचे मन लहान मुलाचे, अविकसित असे राहिले. संसारातील अनुभवांनी त्यात जी खोली यायची, ती आलीच नाही. इतकेच नाही, तर मानसिक विकृतीला बळी पडून त्यांची सगळीच मानसिक वाढ एक प्रकारे खुंटली होती. शकू त्यांची पहिली मुलगी. तिच्या पाठोपाठच दीड वर्षात त्यांना मुलगा झाला आणि तो वर्षाच्या आतच गेलाही. त्या दुःखाने त्यांच्या मनावर काही विलक्षण परिणाम झाला असला पाहिजे. माझ्या लहानपणी मला ह्या गोष्टी कळत नसत, पण आता मात्र त्यांची संगती लागते. आपल्याभोवती कोणी तरी लहान मूल असल्याखेरीज त्यांना जेवणच जात नसे. आम्ही सगळी मुले जेवून शाळेत गेलो, म्हणजे त्या शेजारच्या लिमयांच्या घरची मुलं तरी आणीत, नाही तर गुण्यांच्या मधूला तरी घेऊन येत व आपल्या समोर बसवून जेवत. सईताईंच्या बरोबर बाजारात जायला मोठी गंमत असे. त्या नेहमी मला आणि शकूला काही तरी खाण्याची, खेळण्याची किंवा लेण्याची वस्तू घेऊन देत. स्वतः इतके जिन्नस खरेदी करीत की, त्यांची मागाहून येणारी बिले भागवता-भागवता बिचाऱ्या अप्पांच्या अगदी नाकी नऊ येत. त्यांना खेळायच्या वस्तू विकत घ्यायचा फार नाद. हटकून एखादी तरी बाहुली त्या दर महिन्याला विकत आणीत असत. मी लहान असताना सर्वच गोष्टींबद्दल त्यांचे ऊतू जाणारे औत्सुक्य व आनंद एवढ्यापुरतीच ही विकृती होती. पुढे मात्र रोग फारच बळावला, तो थेट त्यांच्या मृत्यूपर्यंत. त्यांचे वर्षाचे काही महिने पहाटेपासून रात्रीपर्यंत अतिशय धांदल, समारंभ, हालचाल ह्यांत जात; व काही महिने अगदी स्वस्थ बसून, नाही जेवण, नाही खाणे, नाही आंघोळ, केवळ उदासीनता- असे जात. त्यांच्या प्रेमळपणाने मी त्यांच्याकडे आकर्षित झाले खरी, पण पुढे ह्या आकर्षणाचे रूपांतर करुणेत झाले.

अप्पांच्याबद्दल मात्र पहिल्याने भिऊन वागणारी मी हळूहळू त्यांच्याकडे ओढली गेले. त्यांचे मोठ्याने हसणे किंवा बोलणे, किंवा त्यांच्या वागण्यातील खडबडीतपणा ह्यांच्या मागचे वात्सल्य मला जाणवू लागले. इंग्रजी वाङमयाची गोडी त्यांनीच मला लाविली. पहिल्यांदा मुलांच्या अदभुत-कथांपासून सुरुवात झाली. हळूहळू प्रसिद्ध-प्रसिद्ध कादंबऱ्या वाचून झाल्या. त्यामागून स्पेन्सर, मोर्ले, मिल वगैरेंचे ग्रंथ मी त्यांच्याजवळ वाचले. ग्रंथ वाचताना मोठेपणी अधूनमधून त्यावर संभाषणही

होई व अशा तऱ्हेने माझ्या मनाची एक विशिष्ट घडण बनण्याला ते कारणीभूत झाले. मी त्यांच्याइतकी बुद्धिवादी कधीही झाले नाही व निरीश्वरवादीही झाले नाही. पण त्यांच्याजवळ केलेल्या वाचनामुळे ह्या विचारसरणीमागील मनोभूमिका व ध्येयवाद मला समजू शकला. अलीकडे-अलीकडे तर मी बरोबरीच्या नात्याने त्यांच्याशी वाद घालू शकते. तेही कधी वादाला कंटाळत नाहीत. ह्याप्रमाणे मला नकळत मी एका व्यक्तीपासून दुरावत होते व एका व्यक्तीच्या जवळ येत होते.

अप्पा विलायतेहून आले, तेव्हा त्यांची पहिली बायको वारली होती व त्यांनी त्या वेळच्या मानाने सुशिक्षित (म्हणजे मॅट्रिक झालेल्या), सुस्वरूप व सुधारक घराण्यातील एका मुलीशी लग्न केले. सईताई लग्न झाल्यावरही काही दिवस कॉलेजात जात असत. पण पुढे काही शिकल्या नाहीत. मागे सांगितलेल्या कारणामुळे वाचन, शिक्षण, एवढेच काय, पण जीवनाचा अनुभव या दृष्टीनेही त्या कधी अप्पांची बरोबरी करू शकल्या नाहीत. मला राहून-राहून प्रश्न पडतो तो असा की, अप्पांनीसुद्धा जाणूनबुजून मन:पूर्वक असा प्रयत्न कधी केला होता का? अगदी अशिक्षित बायकोसुद्धा शिकलेल्या नवऱ्याबरोबर संसार करून रोजच्या घरगुती व्यवहारात त्याची बरोबरी करू शकते, हे मी पाहिले आहे. अप्पांना ते काही जमले नाही, किंवा तशी त्यांची दृष्टीच नव्हती, असे मला वाटते. लहानपणी सईताई आम्हांला सांगत ती एक गोष्ट मी विसरू शकत नाही. त्यांनी सांगितले की, लग्न झाल्यावर अप्पा रोज हिराबागेत टेनिस व मागून पत्ते खेळायला जात असत. ते पाचाला जायचे ते चांगले साडेआठपर्यंत परत येत नसत. एवढा वेळ प्रिन्सिपॉलच्या बंगल्यामध्ये बायकोला एकटे ठेविले, म्हणजे कंटाळा येईल; म्हणून ते सईताईंना गाडीतून घेऊन जाऊन वहिनींकडे पोहोचवीत, व येताना बरोबर आणीत. येताना त्या दोघांचा एकी का-बेकीच्या धर्तीवर एक मोठा मजेदार खेळ चाले. त्या वेळी म्युनिसिपालिटीचे दिवे रॉकेलचे असत. प्रत्येक दिव्याच्या भोवती खूपसे किडे जमत व ते खायला पाली येत. प्रत्येक दिव्यात किती पाली असतील, त्यांचा अंदाज बांधीत व कुणाचा अंदाज बरोबर हे पाहत पाहत हे जोडपे घरी पोहोचत असे. मला वाटते, दररोज पालींचा हिशेब करून बहुतेक अप्पा एक आलेख तयार करीत असले पहिजेत.

अप्पांचा कॉलेजातील सहकाऱ्यांशी काही मतभेद झाला, किंवा

दुसऱ्या काही अडचणींना तोंड द्यावे लागले, तर ते कधीही बायकोबरोबर विचारविनिमय करीत नसत. अप्पांच्या निवडणुकीच्या वेळेला सईताईंनी मोठ्या उत्साहाने काम केले. पण त्यांच्यात तात्त्विक विषयांवर चर्चा झालेली मी कधी ऐकली नाही. अप्पा सईताईंना कधी रागावलेलेही मला आठवत नाहीत. त्यांच्या खर्चापायी, त्यांच्या निरनिराळ्या छंदांपायी ते टेकीस येत. पण बेनेटचे एखादे वाक्य बोलून मनाचे समाधान करून घेत. बायकोशी वागण्यामध्ये 'प्रेयो मित्रम' ह्या भवभूतीच्या व्याख्येपर्यंत ते कधी पोहोचलेच नाहीत, असे मला वाटते. ह्या वागण्यामध्ये प्रेमळपणा होता, पण त्याचबरोबर एक तऱ्हेचे अंतर कायम राहिले. ज्ञानाने, वयाने, अनुभवाने कमी असणाऱ्या माणसाशी जे वागणे राहते, तसेच ते शेवटपर्यंत राहिले. अप्पांनी सईताईंना मिसेस बेनेटची भूमिका बहाल केली, तेव्हा एखादे वेळेला तरी सईताईंनी जेन ऑस्टेनच्याच एखाद्या कादंबरीतील पढतमूर्खाची भूमिका अप्पांना दिली असती, तर ती बरोबरी झाली असती. पण तशी बरोबरी करणे सईताईंच्या कधी स्वप्नातही आले नसणार. अप्पांचे बायकोशी हे वर्तन बऱ्याच दृष्टीने प्रातिनिधिक स्वरूपाचे होते. महादेव गोविंद रानडे, अण्णासाहेब कर्वे वगैरे मंडळींची आपल्या कुटुंबाशी वागणूक अशाच तऱ्हेची होती. बायकांना आपल्याबरोबर एखाद्या सभेला घेऊन जाणे, त्यांना शिकविणे वगैरे हे लोक करीत असत, पण जुन्या काळच्या कर्त्या पुरुषाची बायकोच्या बाबतीत जी भूमिका होती, तीच त्या सर्वांची होती. समाजकारण, राजकारण वगैरे विषय खास पुरुषांचे आहेत; त्यांची चर्चा पुरुषा-पुरुषांमध्ये होईल, पण घरात पोरीबाळी व बायको वगैरेंपुढे नाही, हा अप्पांच्या जीवनाचा आणखी एक विशेषही त्या वेळच्या पुण्याच्या सार्वजनिक जीवनाचेच प्रतीक मानला पाहिजे. अप्पांनी आपल्या बायकोशीच काय, पण कोणाही स्त्रीजवळ आपले मन कधी उघडे केले नाही. कोणीही बाई त्यांना तितकी जवळची वाटली नाही; पण कालिदासाच्या म्हणण्याप्रमाणे 'दयितास्वनवस्थित' असे मात्र ते कधीच झाले नाहीत. अंतःकरण उघडे करून बोलावे, किंवा दुसऱ्याने आपल्याजवळ ते तसे करावे, अशी कल्पना त्या वेळच्या पुरुषांना नसावीच.

अप्पा राजकारणी व्यक्ती होते, पण सार्वजनिक जीवन ते घराच्या उंबरठ्याबाहेर ठेवीत असत. त्यामुळे घरात त्याचे पडसाद क्वचितच उमटत. 'प्रासाद शिखरस्थोऽपि काको न गरुडायते' किंवा 'पशुपाल की शिशुपाल?'

अशांसारखी वर्मी लागणारी लिखाणे 'केसरी'त प्रसिद्ध झाली, तरी त्याबद्दलची बातमी आम्हांला बाहेरून लागायची. हे घरात आपले नेहमीसारखेच. अशा सरळ ध्येयवादी माणसाविरुद्ध त्याच गावातला दुसरा मनुष्य असे कसे लिहू शके, ह्याचे मला अजूनही आश्चर्य वाटते. एकदा प्रतिस्पर्धी म्हटला, म्हणजे तो राज्यकर्ता इंग्रज आहे, की कुटिल दुष्टबुद्धी मनुष्य आहे, की केवळ आपल्याहून निराळी मते धारण करणारा एखादा सज्जन आहे, ह्याबद्दलचा काहीही विवेक न करिता त्याला नामोहरम करायचे, ही पुण्याची बरीच जुनी परंपरा आहे. तीतलाच हा प्रकार. एवढे खरे की, अप्पांच्यावर असल्या टीकेचा काहीच परिणाम होत नसे; आणि घराचे वातावरण ह्या दिवसापासून त्या दिवसापर्यंत कधी बदलत नसे. बाहेर काहीही टीका झाली असली, सहकाऱ्यांशी सभेत कितीही कटकटी झाल्या असल्या, तरी नाट्यवाचनाचा दिवस आमचा एकदा ठरला, म्हणजे त्यात खंड पडत नसे. ह्या प्रकारामुळे ते प्रिन्सिपॉलकी संपवून मिनिस्टर झाले, तरी ते बाहेर काय करतात, ह्याची आम्हांला- निदान मला तरी- बिलकुल दाद नव्हती. आमच्या मते ते मिनिस्टर झाले ह्याचा अर्थ एवढाच की, आम्ही मुंबईला मोठ्या बंगल्यात रहायला गेलो, महाबळेश्वरला महिनेच्या-महिने त्यांच्या बंगल्यात राहिलो, भटक-भटक भटकलो, आणि स्ट्रॉबेरींवर दुधाची दाट साय घालून त्या खाल्या!

अप्पा सईताईंच्या कधी जवळ आले नाहीत. त्यांच्या नातेवाइकांच्या परिवारातही त्यांनी कधी आपले अंत:करण उघडे केले नाही. शकू त्यांना सगळ्यांत जवळची. ती स्वत: आयुष्यात बऱ्याच प्रसंगांतून गेलेली. पण त्याबद्दल कधी बापलेकींत मोकळी चर्चा झाली असेल, असे वाटत नाही. एक अशी व्यक्ती होती की, तिच्या जवळ अप्पा आपले खाजगी व सार्वजनिक आयुष्य ह्याबद्दल चर्चा करीत असत. ती व्यक्ती म्हणजे सेंट जॉन कॉलेजमध्ये ज्यांच्याशी अप्पांची मैत्री झाली, ते श्रीयुत बालकराम. बालकरामांच्या मनाची घडण कितीतरी जास्त गुंतागुंतीची, भावनाप्रधान व हळवी अशी होती. आणि अप्पा व ते एकमेकांना पूरक असावे, असे वाटते. ते पुण्याला येत, तेव्हा घरात सगळ्यांनाच उत्साह वाटे. अप्पांचे नि त्यांचे पुष्कळ वेळ बोलणे चाले. अप्पाही त्यांच्याकडे कधीमधी रहायला जात असत. ते दुर्दैवाने तीस-बत्तीस वर्षांपूर्वी वारले. तेव्हापासून बरोबरीचे, जिवलग असे मनुष्य अप्पांना नाहीसे झाले. एखादे वेळेला, एखादे वाक्य

किंवा दोन वाक्ये आयुष्याबद्दल अप्पा बोलतात. तेही इतक्या झटपट इंग्रजीत बोलून जातात की, कधी एकदा वाक्याचा शेवट गाठतो, असे त्यांना होते. सईताईंच्याबद्दल माझ्याशी बोलताना नुकतीच मी त्यांच्या तोंडून दोन इंग्रजी वाक्ये ऐकिली. त्यांतले एक : "You know-she never grew up." जरा थांबून दुसरे वाक्य : "She was ill" ह्यांपेक्षा जास्ती बोलणे त्यांना शक्यच नव्हते. त्यांनी चटदिशी विषय बदलला. मलाही हायसे वाटले. गेलेल्या मुलाबद्दल सईताईंच्या तोंडून मी कितीतरी ऐकिले होते. एक कवितासुद्धा त्यांनी मला दाखविली होती. पण अप्पा त्याबद्दल कधी एक अक्षरही बोलले नाहीत. एकदा सहज बोलताना म्हणून गेले, -तेही नुकतेनुकतेच- ''मला मुलांची फार आवड. मला खूप मुलं हवी होती.'' संपले. त्यांच्या एकेका वाक्यात त्यांच्या आयुष्यातील घटनांबद्दल इतका अर्थ मला आढळतो की, कधीतरी असे एखादे वाक्य जरी ऐकले, तरी माझे मन अगदी अस्वस्थ होऊन जाते. त्यांचे निकटवर्तीयांशी संबंध अतिशय प्रेमळपणाचे; पण आम्ही कोणीच त्यांच्या बरोबरीची नसल्यामुळे की काय कोण जाणे, अंतःकरण उघडे करून ते दाखवायचे नाहीत, हे मात्र खास.

आयुष्यासंबंधी त्यांचे काही सरळसोट आडाखे आहेत. भावनेची काय, वागण्याची काय, किंवा बोलण्याची काय, तेढी वाट त्यांना मुळी माहीतच नाही. आपले नाकासमोर जायचे, असा त्यांचा व्यवहार अव्याहत चाललेला आहे. थोडे वळणाचे बोलणे किंवा विचार ह्यांचे त्यांना वावडे आहे. त्यांच्याशी ज्यांचा संबंध आला आहे, त्यांना हे पदोपदी आढळले असेल. मला लहानपणची एक गोष्ट आठवते; आम्ही एकदा गाडीतून फिरायला जात होतो. अप्पा-सईताई बसायची मोठ्या बैठकीवर व त्यांच्या समोरच्या लहान बैठकीवर त्यांच्याकडे तोंड करून शकू व मी बसत असू. गाडी फर्गसन कॉलेजच्या रस्त्याने चालली होती. शकूला व मला बसल्या जागेवरून पर्वती व पर्वतीमागच्या टेकड्या दिसत होत्या. टेकड्यांचा रंग त्या दिवशी विशेष निळा दिसत होता आणि शकू व मी दोघीही ''किती बाई आज गडद-निळे डोंगर आहेत!'' असे म्हणत होतो. अप्पा आमच्या अंगावर खेकसून म्हणाले, ''काहीतरी कविता वाचायच्या, नि काहीतरी बोलायचं! टेकड्या कुठं निळ्या असतात का?'' आम्ही किती जीव तोडून सांगितलं की, खरोखरच त्या निळ्या आहेत, तरी अप्पांना काही ते पटले नाही! माझी दुसरी आठवण म्हणजे नुकतेच त्यांचे आत्मचरित्र वाचीत

असताना त्यांनी पोटसडामबद्दल लिहिलेले शब्द वाचले त्या वेळची. पोटसडाम बर्लिनशेजारी आहे. तेथे फ्रेडरिक द ग्रेट ह्या राजाने पॅरिस जवळच्या फ्रेंच राजांनी बांधलेल्या व्हर्साय ह्या राजवाड्याची नक्कल करून एक गचाळ राजवाडा व बाग उठविली आहे. अप्पांनी आपल्या आत्मचरित्रात गंभीरपणे एक असे वाक्य ठेवून दिले आहे की, ''पोटसडामचा राजवाडा सौंदर्याच्या बाबतीत काही व्हर्सायच्या राजवाड्याच्या तोडीचा नाही.'' औरंगाबादचा बिबीचा मकबरा ही दगडाचुन्यात बांधलेली ताजमहालची प्रतिकृती ताजमहालइतकी चांगली नाही, असा गंभीर शेरा देण्याचाच हा प्रकार! बारकावे त्यांना समजत नाहीत, ह्याचे एक उदाहरण म्हणजे शकूने त्यांच्या मनाविरुद्ध लग्न करायचे ठरविल्यावर ते रागावले होते व लग्न झाल्याचे तिने कळविल्यावर तिला त्यांनी लग्नाची भेट म्हणून दोनशे रुपये पाठविले! दुसऱ्या कोणी हे केले असते, तर ह्या कृतीत किती अर्थ-की अनर्थ दिसला असता! अजून ह्या प्रसंगाची आठवण झाली की, शकू चिडते. पण त्याचे मूल्य तिच्याच शब्दांत द्यायचे म्हणजे ''अप्पा फार पारंपरिक (traditional) आहेत. अमक्या वेळी एखादी गोष्ट करायची, म्हणून ते करितात. तीतील अर्थच मनात घेत नाहीत.'' हे मूल्यमापन मला सर्वस्वी पटत नाही, पण ह्या विचित्र देणगीचा(!) अर्थ मलासुद्धा दुसरा लाविता येत नाही.

अप्पांचे जिवलग मित्र एक बालकराम. त्यांच्यानंतर अप्पांची इतकी अंत:करणापासून कोणाशीच मैत्री झाली नाही. पण त्यांच्याजवळ वात्सल्याचे भांडवल मात्र कधी न संपणारे असे आहे. त्यांच्या आयुष्यात एका दृष्टीने त्यांनी आपल्या बायको-मुलीला सहभागी केले नाही. पण तसे करणे त्यांना अवघड जाते म्हणून, स्वत:च्या मोठेपणामुळे नव्हे. अप्पांवर अतोनात प्रेम करणारी माणसे खूप आहेत. स्वत:च्या मुली-नातींखेरीज भाऊ-भावजया, त्यांची मुले, मुलांची मुले अशा सर्वांवर, माझ्या कुटुंबावर, त्यांची फार माया आहे. शकू व सई ह्यांचे मित्रमंडळ घरी येते व अप्पांच्या आकर्षणात सापडून ती सर्व मंडळी त्यांची होतात. पण व्यक्तिपूजा व तीमागची आंधळी भक्ती किंवा तीमागे असणारी पुढेपुढे करण्याची वृत्ती ही त्यांच्यात किंवा त्यांच्या आसपास चुकूनही दिसली नाही.

मला वाटते, तेही अप्पांच्या स्वभावविशेषामुळेच. मी लहान असताना अप्पांच्या घरी त्या वेळी भारतात प्रसिद्ध असलेल्या बहुतेक सर्व व्यक्ती येऊन

गेल्या होत्या. गृहस्थाच्या घरी त्यांचे जे आदरातिथ्य व्हायचे ते होत असे, व ते अगदी मनापासून होई. पण अप्पांनी कधी कोणाचा मोठा बडेजाव केला नाही व कोणाला आपला करू दिला नाही. त्यांच्या सान्निध्याचा असाच प्रभाव पुणे विद्यापीठावरही पडला. डॉ.जयकर अतिशय बुद्धिमान, पण स्वभावाने तर्ककर्कश व हुकमत गाजविणारे. ते सभापती होते, तेव्हा सारखे खटके उडत व तीव्र असंतोष असे. एखाद्याला खाली बसवीत तेही इतक्या हुकमतीने व तुच्छतेने की, ते मनुष्य कायम दुखावले जाई व इतर सभासदांच्या मनातही भीती व असंतोष निर्माण होई. अप्पा आल्यावर हे सर्व बदलले. सर्व सभागृहातील वातावरणच बदलून गेले. एक वयस्क प्रोफेसर मला म्हणाले, ''काय गोड माणूस हो! त्यानं आम्हांला आमचं स्वत्व: परत दिलं.'' विशेषत:, तरुण माणसांना आणि आता सर्वच त्यांच्यापेक्षा लहान आहेत, ह्या वागणुकीमुळे फारच आनंद होतो.

हे सर्व होत असता त्यांच्या कर्तव्यात काडीमात्र कसूर होत नाही. बायबलमध्ये एक वाक्य आहे... ''जो प्रेम करतो, तोच शिक्षाही करू शकतो.'' (He chastiseth best who loveth best.) ते मला नेहमी त्यांना लावावेसे वाटते. एका बाबतीत मात्र त्यांच्या मायेला कर्तव्यनिष्ठुरतेचा बंध नाही. त्यांना अगदी लहान मुले कमालीची आवडतात. अगदी एका दिवसाचे तान्हे मूलसुद्धा ते हौसेने मांडीवर घेतात, व तोंडाने चाक-चूक असे आवाज काढीत त्याच्याशी बोलतात. एखादे तान्हे मूल त्यांच्या मांडीवर मुतले म्हणजे तर त्यांना धन्य वाटते. जाई, गौरी, सई वगैरे सर्व नातींना ते बजावून सांगतात, ''नसता मोठेपणा सांगू नकोस; लहानपणी माझी मांडी भिजवली आहेस!''

मुले जरा मोठी झाली, म्हणजे मात्र अप्पांच्या जवळून पळून जातात; कारण ते हळूच तपकीर त्यांच्या नाकात कोंबतात, नाही तर दंड दाबून बेटकुळी काढतात. मूल भेदरले, म्हणजे मोठमोठ्याने हसतात. 'मुलांचे मानसशास्त्र' हे शब्द त्यांनी ऐकिलेले दिसत नाहीत. एक प्रकारे ते ठीकच आहे. कारण त्यांच्या ह्या रानटी वागणुकीमुळे कुणी मूल त्यांना कायम दुरावलेले मला माहीत नाही. मुले परत जरा मोठी झाली की, त्यांच्याकडे ओढली जातातच.

अप्पांच्यात विरोधी वाटणाऱ्या दोन गुणांचा मिलाफ मजेदार रीतीने झालेला आहे. पहिला, त्यांची समता किंवा न्यायबुद्धी; आणि दुसरा, त्यांचे

वात्सल्य. त्यामुळे त्यांना कितीही माया वाटली, तरी त्यांची समतोल कर्तव्यतत्पर वृत्ती ढळत नाही, व ते कितीही कर्तव्यनिष्ठुर असले, तरी त्यांची माया कमी होत नाही. हा अनुभव घरच्या माणसांचाच आहे असे नव्हे, तर विद्यार्थ्यांचाही आहे.. ते रागावतील, शिक्षा करितील, नापसंती कडक शब्दात व्यक्त करितील. पण कर्तव्यामुळे त्यांची प्रेमाची आर्द्रता कधीही नाहीशी होत नाही. त्यांच्या हातून खाल्लेल्या माराच्या आठवणी शकू रसभरितपणे सांगते. त्यांच्याशी तिची कितीतरी भांडणे झाली आहेत, पण कडवटपणा मुळीच नाही. मला ते पुष्कळच रागावले असणार, पण मला आठवते आहे ती त्यांची माया. माझे लग्न झाले, तेव्हा मला एका हाती हजार रुपयांचा आहेर त्यांनी केला. आमच्या संसाराच्या त्या वेळेच्या परिस्थितीत ते दहा हजारांच्या मोलाचे होते. मी अमेरिकेत होते, तेव्हा मला अंजायना नावाचा हृदयाचा विकार होऊन मी निजून आहे, हे ऐकिल्याबरोबर स्वत:ची प्रकृती बरी नसताही भारतसेवक समाजाच्या पुण्यातील निवासस्थानी जाऊन त्यांनी कैलासवासी श्रीनिवास शास्त्री अंजायनासाठी काय औषध घेत होते, त्याची माहिती काढून आणून त्यांनी मला पाठविली! अमेरिकेत सर्व आधुनिक उपचार मजवर होत असणार, पंचवीस वर्षांपूर्वी पुण्याला श्री. शास्त्री जे औषध घेत असत, ते एव्हाना जुने झालेले असणार, हा विचारही ते विसरून गेले होते. अजूनही पंधरा दिवसांनी, महिन्याने माझे कसे काय चालले आहे हे पहायला दोन मैल चालत येतात. 'फार काम करू नको; विश्रांती घे,' म्हणून मला बजावितात.

अप्पा विलायतेमध्ये किंवा ऑस्ट्रेलियामध्ये दिवस-न-दिवस आणि वर्ष-न वर्ष केवळ विलायती पोषाखात वावरत असत. अजूनही विलायती पोषाख त्यांच्या चांगला अंगवळणी आहे. पण पुण्याला असले की, घरात धोतर आणि शर्ट आणि बाहेर पडताना त्यावर कोट, उपरणे आणि पगडी हा त्यांचा सर्वांना माहीत असलेला पोषाख, हे त्यांच्या पारंपरिकपणाचे आणखी एक लक्षण. त्यांच्या खाण्यात, बोलण्यात अशा कितीतरी गोष्टी आहेत की, त्यांत त्यांचे लहानपणचे संस्कार दिसून येतात. पण तेच अप्पा आयुष्यातील महत्त्वाच्या प्रसंगी आपले वर्तन व विचार बदलू शकतात, ह्याचे एकच घरगुती उदाहरण देते.

शकू लहानपणापासून हुशार. शाळेत तर तिचा पहिला-दुसरा नंबर असेच, पण कॉलेजातही तिने कधी पहिला वर्ग सोडला नाही. तिने सायन्स

आणि गणित हे विषय घेतलेले होते आणि ह्या दोहोतही तिची बुद्धी फार छान चाले. अप्पांना ती मुलाच्या जागी. लहानपणापासून नाना तऱ्हांनी अप्पांनी तिचे लाडही केले होते, व शिस्तीत शिक्षणही केले होते. आपल्याप्रमाणेच तिने केंब्रिजला जावे, तेथे गणिताच्या परिक्षेत असामान्य यश मिळवावे, अशी त्यांची फार इच्छा होती. पण ह्या मुलीने इंटरमध्ये असतानाच आपले लग्न ठरविले. ज्याच्याशी ठरविले, तो मुलगा मध्यम स्थितीतील खाऊन-पिऊन सुखी अशा घराण्यातील, पण अतिशय हुशार नव्हे. मुलाच्या घरच्या परिस्थितीपेक्षाही शकूने लग्न ठरवावे व आपल्या भावी बौद्धिक जीवनाला हरताळ फासावा, ह्याचे त्यांना वाईट वाटले. पण त्यांच्या नेहमीच्या सरळ स्वभावामुळे व सुधारकी तत्त्वांना धरून त्यांनी त्या लग्नाला मोडता घातला नाही. हे लग्न काही दिवसांत शकूनेच मोडले. लग्न मोडून शकू परत अभ्यास करण्यास मोकळी झाली ह्याबद्दल अप्पांना आनंदच झाला असला पाहिजे. हा आनंद काही त्यांनी बाहेर दर्शविला नाही; तरी तिला विलायतेला पाठविण्याची सर्व तयारी केली आणि बी.एससी.त पहिल्या वर्गात येऊन शकू विलायतेला गेली. पण अप्पांच्या मनाप्रमाणे गणितात मोठे यश संपादन न करिता फ्रेंच, शिक्षणाची तत्त्वे वगैरे इतरच विषयांवर लक्ष केंद्रित करून जेमतेम ती परीक्षा पास झाली. अप्पा विलायतेहून आल्यानंतर तिने त्यांच्या मनाविरुद्ध तिकडेच लग्न केले. काही वर्षांनी शकू परत आली व शकूची मुलगी सई जन्मापासूनच अप्पांकडेच वाढली.

ह्या सर्व गोष्टींचा अन्वयार्थ अप्पांनी काही लावला असेल, ह्याचा सुगावा मला नुकताच लागला. ती कथा अशी : सई अतिशय गोड पोरगी. अभ्यासात शकूइतकी हुशार नाही, पण लहानपणापासूनच निरनिराळ्या कला ती चटदिशी आत्मसात करी. ती कशीबशी बी.ए. पास झाली. पण तोपर्यंत शकूच्या प्रोत्साहनाने म्हणा, किंवा शकू मागे लागल्यामुळे म्हणा, तिने काही चित्रे काढली, काही गोष्टी व काही लहान नाटके लिहिली. सई म्हणजे कमालीची आळशी व सुखासीन. एखादी कल्पना आली, म्हणून मांड घालून लिहायला बसली, किंवा मानेवर खडा ठेवून आपण होऊन तिने चित्र काढिले, असे कधी व्हायचे नाही. सईला बसवायचे नि तिच्याकडून काम करून घ्यायचे, हा उद्योग शकूचा. एकदा मी एम.ए.चा वर्ग शिकवून येताना मला सई भेटली. मी तिला जरा आश्चर्यानेच विचारिले, "बाई, तू इकडे कुठे

आज?'' तिने वाईट तोंड करून, गाल फुगवून मला सांगितले, ''काय करायचं? हे अप्पा आहेत ना! मुळीच ऐकत नाहीत. मला म्हणतात, एम.ए. हो. रोज पाठीमागं लागतात. शेवटी घातलं एकदा नाव. त्यांना एकदा कळलं की, माझ्याच्यानं अभ्यास होत नाही, की देतील नाद सोडून!'' सईचा हा प्रयत्न फारच लवकर यशस्वी झाला व परत काही मला ती विद्यापीठाच्या आवारात भेटली नाही! अप्पांनी कंटाळून नाद सोडून दिला असावा. ह्याही पोरीने आईप्रमाणेच आपले लग्न जमविले. तेही आईप्रमाणेच एका कलाकाराशी. आणि जसे तिच्या आईचे लग्न अप्पांना पसंत नव्हते, तसे हिचे लग्न आईला पसंत नव्हते. शकूने हे लग्न आपण लावणार नाही, असे साफ सांगितले व अप्पांनी नातीचे कन्यादान केले. अगदी वैदिक पद्धतीने व ब्राह्मणांच्या मंत्रघोषांत! ह्या सर्व प्रसंगाचा त्यांच्या स्वतःच्या आयुष्याशी काय संबंध आला, हे नेहमीप्रमाणे दोन मोजक्या वाक्यांत त्यांच्या तोंडून ऐकायला मिळाले... ''मुलांच्याबद्दल नसत्या महत्त्वाकांक्षा ठेवू नयेत. मी नाही का शकूबद्दल उगीचच मनाच्या कल्पना केल्या होत्या?'' वाक्ये दोनच. पण त्यांत सबंध आयुष्याचा अनुभव भरलेला होता. आपल्या महत्त्वाकांक्षेपायी मुलीला मनात नको तो अभ्यास करायला लाविले, त्याची पुनरावृत्ती त्यांनी नातीच्या बाबतीत होऊ दिली नाही. शकू रागावली, म्हणून त्यांच्या हृदयाची कोण कालवाकालव झा़ली; पण म्हणून ते आपल्या कर्तव्यापासून ढळले नाहीत. ह्या सर्व गोष्टी नेहमीच्या सहजपणे आणि प्रसन्नपणे त्यांनी केल्या. त्यात नातीबद्दलचा जिव्हाळा जसा होता, तसाच आयुष्यातील काही प्रसंगांवरून धडा घेण्याचीही वृत्ती त्यात होती. सईच्या लग्नाच्या दिवशी माझ्या राहून-राहून मनात येत होते की, मिस्टर बेनेटची भूमिका वठवू बघणाऱ्या अप्पांनी शेवटी सर टॉमसचीच भूमिका पार पाडली.

वयाच्या ऐंशीव्या वर्षापुढे अशा तऱ्हेने बुद्धीचा असामान्य समतोलपणा व लवचिकपणा दाखविणे अप्पांना शक्य झाले, पण त्याचबरोबर मी ज्याला प्रातिनिधिकपणा व पारंपरिकपणा म्हणते, तोही दुसऱ्या एका घटनेमुळे मला नुकताच परत एकदा कळला. एखाद्या संस्थेमध्ये, विशेषतः शिक्षणसंस्थेमध्ये कमी पगाराची नोकरी धरून ती वीस वर्षे करीत राहणे हे अप्पांच्या मते ध्येयवादाचे लक्षण आहे. त्याचप्रमाणे आपल्या द्रव्यापैकी देववेल तितके द्रव्य एखाद्या शिक्षणसंस्थेला देणे हे आपले कर्तव्य आहे, ही त्यांची त्यांच्या वेळेच्या परंपरेप्रमाणे ठाम झालेली

एक समजूत आहे. शकू हल्ली आपला बहुतेक वेळ कुटुंबनियोजनाच्या प्रचारात घालविते. गेली कित्येक वर्षे ती हे काम करीत आहे. हे काम पगारी नाही. त्यात तिला द्रव्यप्राप्ती होत नाही. रहावयाला अप्पांचे घर नसते, तर तिला हे कार्य करणे जड गेले असते, व पुढेही जड जाईल. तिच्या ह्या आयुष्यक्रमात मोठा ध्येयवाद आहे, हे अप्पांनासुद्धा पटेल. पण तिचे कार्य सतत चालू राहण्यासाठी आपण तिच्यासाठी काही केले पाहिजे, ह्याची जाणीव मात्र त्यांना नाही. जी गोष्ट शकूची, तीच दुसऱ्या अर्थाने सईची. सई कलावंत आहे, तिने एका कलावंताशीच लग्न केले आहे, कलावंताचे जीवन बरेच खडतर असते, थोडासा का होईना, पण ठरलेला पगार महिन्याच्या महिन्याला मिळण्याची त्यात फारशी शक्यता नसते. मग रहायला स्वतःच्या मालकीच्या दोन खोल्या ही कल्पनाच नको. कलेच्या मागे लागणे हाही एक प्रकारचा ध्येयवाद आहे. दोन्ही मुली दोन तऱ्हांनी अशा परिस्थितीत असताना आपले राहते घर त्यांनी मृत्युपत्रान्वये एका संस्थेला दिल्याचे ऐकून मला तर धक्काच बसला. अप्पांच्याजवळ गडगंज संपत्ती नाही. घरी मोटार नाही. दोन मुलींना पोटापुरते व डोक्यावर निवारा एवढे ठेविले, तर अप्पा आपल्या सार्वजनिक कर्तव्याला चुकले, असे मला मुळीच वाटत नाही. पण ह्या बाबतीत अप्पा आपल्या पिढीतील काही देशभक्तांचे व सुधारकांचे प्रतिनिधी आहेत.

मला पुष्कळ वाटते की, एकदा त्यांच्याशी ह्या बाबतीत रागारागाने वाद घालावा. पण माझ्या आजपर्यंतच्या भूमिकेमुळे अजूनपर्यंत तरी मला ते तितकेसे जमले नाही. आणि मुलीबाळींनी विरोध केला, म्हणून हा मोठा पुरुष आपला विचार बदलील असेही वाटत नाही.

एका दृष्टीने त्यांचा स्वभाव, वागणूक जीवनाचा प्रवाह सर्व काही एका विशिष्ट कालखंडाचे द्योतक वाटतात. पण दुसऱ्या बाजूने पाहिले, तर त्यांची असाधारण बुद्धी, अपार वात्सल्य व बालसुलभ ऋजुता ह्यांचा मिलाफ अनन्यसाधारण आहे. त्यामुळे कोठल्याही रेखीव चौकटीत त्यांचे आयुष्य बसविताच येत नाही.

१९६१

हे लिखाण लिहून झाल्यावर अप्पांकडे पाठविले व त्यांना विचारले, ''तुमची हरकत नसली, तर छापून काढायचे म्हणते आहे!'' त्यांचे उत्तर

त्यांच्याच शब्दांत देते.

१ माझी हरकत नाही. तुला काय हवे ते कर.

२ 'ही' इंटर पास होऊन बी.ए.त गेली होती.

मी सध्या व्हर्जिल वाचतो आहे.

ज्याबद्दल मला विशेष औत्सुक्य, त्या त्यांच्या मृत्युपत्राबद्दल एकही शब्द नाही!

चार :

# एक रात्र? की युगानुयुगे?

दिवसभर प्रवास करून मी थकले होते रात्री तिने निजण्याची खोली दाखविली, तेव्हा वाटले की, पाठ टेकली की झोप येईल.

प्रत्येक घराचे आणि भोवतालच्या जागेचे स्वत:चे असे काही एक स्वरूप असते. नेहमी रहायची जागा बदलली की नव्या जागेच्या परकेपणामुळेच मन भांबावते. तसे माझे झाले. खिडक्यांतून भिंतीवर उजेड पडत होता. नेहमी ज्या बाजूला उजेड पडायची सवय, तेथे तो नव्हता. मनात विचार करावा लागला. ह्या खोलीच्या बाहेरचा रस्ता पूर्वेला आहे. रस्त्यावरचे दिवे पुण्यामध्ये घराच्या उंचीवर नाहीत. त्यांचा प्रकाश अगदी निराळ्या भिंतीवर दिसतो. एवढेच नव्हे, तर निराळ्या उंचीवर काही एका कोनाने तो दिसतो आहे. ही गोष्ट समजून घ्यायला थोडा वेळ लागला. एवढ्यात एक गाडी धडधडत गेली. रस्ता निराळ्या दिशेला म्हणून आवाजही निराळ्या दिशेला. भिंतीवर दिव्याच्या प्रकाशात पानांच्या सावल्या नाचत होत्या. ते चित्रही सर्वस्वी अनोळखी! काही पाने लांब, रुंद, मोठी होती. काही लांब, चिंचोळी होती. काही इवलीशीच वाटोळी होती. अमकी सावली अमक्या पानाची किंवा अमक्या फांदीची, हे समजायला रात्री काही मार्ग नव्हता. मी उशिरा आले होते. त्यामुळे बागही पाहिलेली नव्हती. 'कुठचे बरे झाड असावे?' असा विचार करीत पडले होते.

एवढ्यात झांजा वाजल्या. भजनाचे शब्द नाही, तरी सूर ऐकू येऊ लागले. लक्षात आले की, शेजारी एक देऊळ आहे. भजन चालू असेपर्यंत काही केल्या झोप येईना. भजन जोराने चालले होते असे नव्हे, पण निजताना

भजन ऐकू येणे हा अनुभवच नवा होता. म्हणून इतर नव्या अनुभवांच्या जोडीला झोप येऊ न देण्यास त्यानेही मदत केली.

भजन थांबले. सगळीकडे सामसूम होती. एवढ्यात खोलीच्या खालीच कसलातरी खुळखुळण्याचा आवाज ऐकू आला. मी ताडदिशी उभी राहिले, आणि खिडकीतून डोकावून पाहिले, तर घरचा कुत्रा बागेत हिंडत होता; त्याच्या गळ्यातल्या पितळी बिल्ल्याचा आवाज ऐकू येत होता. थोड्या वेळाने परत शांतता पसरली. पण त्या शांततेतही कुठेतरी काहीतरी लहानसहान आवाज येत होते. कौलांवरून काहीतरी सरपटत गेले. वाऱ्याने बाहेरचा पाचोळा उडाला. ही शांततासुद्धा काहीतरी नवीन होती. तिचा स्तब्धपणा किंवा तिचा आवाज हे दोन्ही माझ्या ओळखीचे नव्हते. आणि ते काय असावे बरे?- असे नसते प्रश्न मन विचारीत होते.

लांब एका विचित्र आवाजाला सुरुवात झाली. आवाज एकदम मोठा झाला आणि दीर्घ हाळी देऊन थांबला. आवाज मानवी नव्हता; बऱ्याच जणांनी मिळून केला होता. थोड्या वेळाने परत तोच आवाज झाला. आणि माझ्या लक्षात आले की, ती कोल्हेकुई होती. येथे शेजारी उसाची शेते पुष्कळ अन रात्री कोल्ह्यांची धाड उसावर पडायची. हा आवाज कसला, हे ओळखून त्याला नाव दिल्याचे मला समाधान वाटतेय, इतक्यात बाहेरच्या झाडावरून हूऽ हूऽ हूऽऽ असे ऐकिले. मी पुटपुटले, 'हे हुमण!' ही जागा म्हणजे बाहेरून येणारा प्रत्येक संदेश ग्रहण करण्याची इंद्रियांची तत्परता आणि थकलेपणा यांचे द्वन्द्व. किती वेळ चालले असते, कोण जाणे! पण शेजारच्या खोलीतून आवाज आला... ठणऽ ठणऽ ठणऽऽ. हा नेहमीचा व्यवहारातला, दाट ओळखीचा घड्याळाचा आवाज. मनावरचा ताण एकदम गेला. कितीचे ठोके पडणार, हे मी मोजणार होते. पण ते बंद पडायच्या आतच मला झोप लागली. मी स्वप्नात वावरत होते आणि कालपरवाच्या अनुभवापासून तो जागत्या मनाला अज्ञात असलेल्या भूतकाळात आणि निरनिराळ्या स्थळांतून मी भटकत होते.

दगडांच्या वाटोळ्या गडग्यात मी उभी होते. जिकडे पाहावे तिकडे काही दूर, काही जवळ अशी दगडाची वाटोळी कुंपणे पसरलेली होती. खाली नदी दिसत होती. काहीतरी मासेमारीच्या गोष्टी चालल्या होत्या. एवढ्यात मला एकदम गणपतीचे देऊळ दिसायला लागले. सभामंडपात पेशवे शेवटच्या घटका मोजीत पडले होते. भोवताली कोणकोण म्हणून

बघते, तो गणपती नाही नि मंदिर नाही. काही बुद्ध भिक्षू(थेर) भिक्षा मागून परतत होते. त्यांना सामोरी जाईन म्हटले, तर परत दगडांच्या भिंतीआडून मी वाटेने चाललेल्या शेजाऱ्याशी बोलू लागले. गुरे सगळी नीट गडग्याच्या आत आसऱ्यासाठी आणिली होती. मावळत्या सूर्याचे किरण माझ्या मोटारीच्या पत्र्यावरून परावर्तित होऊन एकदम डोळ्यांत घुसले...

निर्वृक्ष, बरड माळ. वारा झोंबतो आहे- बर्फ पडणारसे वाटत आहे. आम्ही माळ तुडवतो आहो. बरोबर जनावरे आहेत, माणसे आहेत. श्टिलऽनाख्ट! हायलिगऽनाख्ट! (शांत, पवित्र रात्र) बर्लिनचा किल्ला. खिसमसच्या संध्याकाळी म्हटली जाणारी गाणी! कसली आली आहे शांत आणि पवित्र रात्र! वारा घोंघावतो आहे. रात्रीपुरता निवारा पाहिजे आहे. उघड्यावर लांडगी, कोल्हे, तरसे फन्ना पाडतील. एखाद्या दरडीआड जागा बघतो आहोत- कुईऽ कुईऽ कुई! उसाच्या मळ्यातले कोल्हे वाटते? आर्यांच्या टोळ्यांचे मध्य-आशियातील भ्रमण मला जाणवत होते. मध्येच जर्मनीत ऐकिलेली ख्रिस्तजन्माची गाणी आठवली. नंतर निजण्यापूर्वीची कोल्हेकुई आठवली.

वाटोळी पानं, चिंचोळी पानं. कुठची बरं ही झाडं? ओळखीची वाटतात. वाट तरी किती चिंचोळी? एकामागं एक चालावं लागतं आहे, तरीदेखील बिनधोक पुढे जाता येत नाही. सगळी थबकली. कोण बरं जनावर?- दिसत नाही; खसखस ऐकू येते आहे. आम्ही त्याला भ्यालो, ते आम्हाला भ्याले. जोराचा पळण्याचा आवाज आला. आम्ही पुन्हा चालू लागलो. ही चिंचोळी पानं वेळूची का? कुर्गचा का हा प्रदेश?- छे! हे काही निराळेच आहे. इथे वेळूची बेटे नाहीत. जाता-जाता अंग ओरखडतं आहे, इतक्या काटेरी जाळ्या आहेत. जीपमधून चाललो आहोत आणि काटेरी फांद्यांनी दंडातून रक्त निघाले आहे. हूऽ हूऽ! घुबड वाटतं? अश्मयुगात कधीतरी माणसं शिकारीवर निघाली होती. प्रदेश उष्ण कटिबंधात असावा. त्यातच कुर्गच्या रानात भटकले होते, त्याची आठवण झाली. नंतर परत एकदा हिन्दुस्थानात कोठेतरी कामासाठी जीपमधून दोन्ही बाजूला काटेरी झाडे असलेल्या एका अरुंद रस्त्यातून गेलो होतो. त्याची आठवण मिसळली व त्यातच निजण्यापूर्वीचे अनुभव!

कोठचेतरी डोळे माझ्याकडे बघत आहेत. त्यामुळे मी जागी झाले. लख्ख उजाडले होते. उन्हे पसरली होती. ज्यामुळे मी जागी झाले, ती माझ्या

लेकीची स्नेहाळ दृष्टी माझ्यावर लागली होती. मी अजून का बरे उठले नाही, म्हणून पाहायला ती आली होती.

झोपेतील अनुभवांत मी अजून बुडून गेले होते. अवकाश आणि काळ ह्यांत काही धरबंधच राहिला नव्हता, इतके ते कालवले गेले होते. मागचं पुढे, पुढचं मागे. ह्या आयुष्यात अनुभविलेले, कधी न पाहिलेले असा सगळ्यांचा काला झाला होता. पाषाणयुगातून, ताम्रयुगातून, पेशवाईतून... कालपर्यंत माझे मन भटकत होते; असंख्य मैल तुडवून पाय दमले होते; अगणित जन्म अनुभवून मन थकले होते.

युंग म्हणतो की, कधीतरी काही प्रसंगाने आपल्या पूर्वजांचे संस्कार

---

काल का परवा, का आठवड्यापूर्वी थेऊरला चाललेले उत्खनन पहायला मी एकटीच मोटारीने गेले होते. गणपतीचे देऊळ डावीकडे टाकल्यावर हा एक खडबडीत रस्ता जातो, त्याने सुमारे अर्धा-पाऊण मैल गेल्यावर उत्खननापाशी मी पोहोचले. ख्रिस्तपूर्व १००० वर्षांची वस्ती असावी, असे सांगतात. एकमेकांवर लहान-मोठे दगड रचून वर्तुळाकार भिंती (-कोकणात ज्याला गडगा म्हणतात-) पूर्वी रचिलेल्या होत्या. (भिंती जाऊन फक्त पायाच्या दगडांची वर्तुळे मात्र शिल्लक राहिली होती) अशी एकाशेजारी एक ५०-५०, १००-१०० फूट अंतरावर कितीतरी वर्तुळे त्या माळावर होती. उत्खननात एका घराचे अवशेष एका वर्तुळात सापडले होते. घर कसले छप्पर म्हणायचे! त्याच वर्तुळात मासेमारीत वापरायचा एक तांब्याचा गळ सापडला होता, वर्तुळात उभे राहिले की, खाली मुळा-मुठा नदी दिसत होती. गडगे उभे असते, तर २५-४० गडगे दिसले असते. एका बाजूने गणपतीचे देऊळ दिसत होते. 'थेऊर' हे ग्रामनाम थर-पुर ह्या पाली नावावरून आले असावे, अशी माझी कल्पना. म्हणजे थेऊरात एके काळी बुद्धमठ असावा. दगडी वर्तुळे ख्रिस्तपूर्व हजार वर्षांची (सुमारे महाभारतकालीन)- बुद्धमठ (?) ख्रिस्तशकाच्या अलीकडेपलीकडे कार्ले-भाजे लेण्यांच्या वेळचा- नंतर पेशवे-

आपल्या मनात उसळी मारून उठतात. कालिदास म्हणतो, जन्मांतरांचे संस्कार 'भावस्थिर' असतात, व एखादे वेळी डिवचले जाऊन उठतात. हे संस्कार माझ्या पूर्वजन्मीचे होते की आजची मी माझ्या सर्व पूर्वजांचे संस्कार घेऊन जन्माला आले होते, कोण जाणे! एवढे मात्र खचित की, त्या रात्री कित्येक लाखांपासून काही शतकांपूर्वींच्या माझ्या पूर्वजांबरोबर मी पृथ्वी पालथी घातली होती. रात्रीच्या काही तासांत मी युगे जगले होते. वेळेची अशी गल्लत होते कशी? काळ वा वेळ हा एक अनुभव आहे. तो काय घड्याळाच्या काट्यात बसविता येणार आहे? का घड्याळाच्या काट्यांनी मोजता येणार आहे?

१९७०

पाच :

# आई सापडली!

१ :-

आई गेल्याला वर्ष झालं होतं, पण अजून ती कायमची गेल्यासारखी वाटत नव्हतं. एकतर तिच्या व माझ्या आजारामुळे आम्ही पूर्वीसारखी वारंवार भेटत नव्हतो, आणि दुसरं म्हणजे कित्येक महिने ती माझ्याकडे रहायला अशी आलीच नव्हती. पण अगदी खरं आतलं कारण म्हणजे अजूनही ती मला भेटायला यायची. ती येताना मला खिडकीतून दिसायची, 'माई' म्हणून तिच्या हलक्या मंजुळ आवाजात मारलेली हाक मला ऐकू यायची. मी दार उघडी. ती आली, म्हणजे आम्ही काय करीत असू, काय बोलत असू, ह्यातलं काही माझ्या लक्षात रहायचं नाही. फक्त ती येत असतानाची पांढऱ्या पातळातली, डोक्यावरून पदर घेतलेली तिची आकृती आज स्पष्ट दिसते व तिनं हळूच मारलेली हाकही अगदी स्पष्टपणे ऐकू येते. आम्ही दोघी काय बोलत असू, वा काय करीत असू, ते बहुधा फार समाधानाचं असावं, कारण त्या नंतरचा माझा सबंध दिवस अगदी आनंदाच्या धुंदीत जाई.

नव्या घरी आले, आणि हे सर्व बदललं. इथं आल्यापासून आई भेटली नाही. तिनं नवं घर पाहिलं नाही, म्हणून मी मनातून खट्टू होतेच, आणि त्यातच तिच्या न येण्याची भर पडली. नवीन घरी आल्यावर घर लावण्यात, घराची सवय होण्यात एक-दोन महिने गेले. काहीतरी चुकल्या-चुकल्यासारखं वाटे, पण ते घराच्या नवीनपणामुळे असेल, असं म्हणून मी झटकून टाकी. जुन्या घरचा कोपरा-न-कोपरा कोणा-ना-कोणाच्या

आठवणीनं भरलेला होता. मामंजी जाऊन इतकी वर्षं झाली, पण एका खोलीला मुलं अजूनही 'आजोबांची खोली' म्हणतात. ताई सासरी गेली. तिची मुलगी कॉलेजात जायची वेळ आली, तरी त्या घरातील एक खोली 'ताईची खोली' म्हणून राहिली आहे. स्वयंपाकघर व कोठी आईनं दर वेळी लावायची. सासूबाई कधी मधी येत, पण आठवण मागे ठेवून जात. त्या घरी माझीच नाही, पण इतरही मुलं वाढली होती. प्रत्येकजण काहीतरी आठवण ठेवून गेलं होतं. खालच्या जमिनीपासून वरच्या छातापर्यंत घर आठवणींनी कसं गच्च भरलं होतं. बाहेर अंगणात यावं, तरी तोच प्रकार. प्रत्येक झाडाचा खड्डा कधी खणला, व झाड कुठून आणून कधी लावलं, ते माहीत होतं. गुलाबाची बाग नाहीशी झाली होती, पण आमच्या बोलण्यात व मनात ती अजून ताजी टवटवीत होती.

एक वेळ अशी आली की, त्या घरात मला कोंडून बांधल्यासारखं वाटायला लागलं. सगळीकडून मला काहीतरी दडपून टाकीत आहे, असा भार माझ्यावर पडला होता. भूतकाळ माझी मान दाबून राहिला होता. त्यानं माझे हात-पाय-मन जखडलं होतं. तो मला खुलेपणानं, मोकळेपणानं वावरू देत नव्हता. नुसतं घर आणि अंगण झपाटलेलं होतं असं नाही, तर सर्व परिसरच झपाटलेला होता. शेजारी मैलभरात सर्व माणसं ओळखीची. एरव्ही जी दोन हात दूर, तीही आजारीपणामुळं भेटायला यायची आणि डोकं खायची. कोणीही रस्त्यावरून जाता-जाता डोकावावं व विचारावं, ''ठीक आहे ना?'' सगळ्यांनाच फार आपुलकी. सर्व काही-माझ्याखेरीज - पूर्वीसारखं. मी मात्र पार बदलले होते. ही आपुलीक माझा जीव घाबरा करीत होती. चांगुलपणानं मी कासावीस झाले होते. त्या आठवणी व ती आपुलीक ह्यांतून सुटण्यासाठी तर इतक्या वर्षांचं घर सोडून मी नवं घर मांडलं होतं.

नव्या घराच्या आसपास कोणी ओळखीचं नव्हतं. दिवसादिवसांत कोणी घरी डोकावलं नाही. भेटायला लांब असलं, तरी अधूनमधून आपली माणसं एकेकदा तरी येऊन गेली. फक्त तीच आली नाही. आज पडल्या-पडल्या मी तोच विचार करीत होते. तिचा फोटो समोरच भिंतीवर होता. मी विचारलं, ''बये, येत का नाहीस? मला विसरलीस का?'' ती काय उत्तर देणार? पण तिचे डोळे मला विसरल्यासारखे दिसत नव्हते.

जुन्या घरी काही काम निघालं. मला तिकडे दोन दिवस रहावं लागणार होतं. ठरल्याप्रमाणे मी गेले. माझ्या पूर्वीच्याच अंगणाशेजारच्या खोलीत

अंथरूण घातलं होतं. आणि काय आश्चर्य! ती अगदी नेहमी यायची तशी आली. तिची हाक मला ऐकू आली. मी दार उघडलं. आम्ही दोघी त्यादिवशी फिरायला गेलो, एवढं आठवतं. पण कुठं गेलो, कशा गेलो, काय बोललो, हे नेहमीप्रमाणेच आठवत नाही. परत दुसऱ्या दिवशीही ती येईल, ह्या समजुतीत मी होते. पण ती आली नाही. मला परत नव्या घरी जाणं भाग होतं. इथलं काम संपलं होतं. राहण्यातही अर्थ नव्हता. ती परत कधी येईल, हे सांगता येत नव्हतं. मी कधी नव्हतं इतक्या अनिच्छेनं जुनं घर सोडलं, आणि परत नव्या घरी आले.

त्या रात्री आणखी एक आश्चर्य घडलं. आई मला माझ्या खोलीच्या दारात दिसली. नेहमी दिसे तशीच. तिने हाक मारिली, ''माई!'' मी खडबडून उठले व ''आई!'' म्हणत दाराकडे धावले. कुठली आई न कुठलं काय! माझ्या जागं होण्यानं, उतावीळपणानं आपल्या पायी आलेल्या आईला मी घालवून बसले होते. तरीही मी हिरमुसले नाही. माझ्या मनात आनंद भरून राहिला होता. आई नव्या घरी आली होती. आजच कशी आली? इतके दिवस का आली नव्हती?- मी आठवयाला लागले. दोन दिवसांपूर्वी मी जुन्या घरी गेले होते. ती भेटली. तेव्हा आपण फिरायला गेलो होतो. मी तिला इकडं आणलं होतं का? मला काही-म्हटल्या-काही आठवत नव्हतं. मी झोपेत असताना जाग्या असलेल्या मनानं ही युक्ती केलेली दिसते. तिला नवीन घर माहीत नव्हतं रस्ता सापडत नव्हता, ही साधी गोष्ट माझ्या जागेपणाच्या तार्किक व्यवहारी मनाला कळली नव्हती. पण कोणाला तरी माझी काळजी होती खास! मी जुन्या घरी गेल्यावर भेटायला आलेल्या आईला त्यानं इकडे आणलं असणार.

काही का असेना, आईला घर सापडलं होतं, आणि मला आई सापडली होती.

२ :-

आज ती मला काही महिन्यांनी भेटली होती. ह्या दोन महिन्यांत तिचं कसं चाललं होतं, ती कुठं राहिली होती, वगैरे मी विचारीत होते व ती नेहमीप्रमाणे भराभर उत्तेजित स्वरात मला निरनिराळ्या हकीकती सांगत होती. सांगतासांगता ती एकदम थांबली. तिचे डोळे विस्फारले. ती मला हलवून मोठ्यानं म्हणाली,

"तुला एक विलक्षण प्रकार सांगू का? अग, मला माझी आई सापडली!"

ही पोर मला सात-आठ वर्षं माहीत आहे. तिची थोरली बहीण त्या वेळी माझ्या चांगली ओळखीची होती. हिचं नाव मी ऐकायची. प्रत्यक्ष पाच-सहादा पाहिली असेल, इतकंच. हिला पहिल्या वेळी पाहिलं, तेव्हा ती अठरा-एकोणीस वर्षांची असावी. जरा लठ्ठ; तोंडावर विशेष कोणताच भाव नाही; जरा अंगानं आडवी आणि तोंडावर बालमुखाची गोलाई, अशी ती मला दिसली. तिची थोरली बहीण अक्का फार हुशार, फार शांत, विचारी, वयाच्या मानानं जास्तच प्रौढ अशी होती. ह्यात काही नवल नव्हतं. ती आपल्या बापाचा आईनं अर्धवट टाकिलेला संसार संभाळीत होती.

धाकटी पाच का सहा वर्षांची असताना, तिची आई नवऱ्याला व लहान मुलांना सोडून गेली होती. तेव्हापासून बाप, भाऊ व बहीण ह्यांना अक्कानंच संभाळलं होतं. घर मोठं स्वच्छ व व्यवस्थित ठेविलं होतं. वडिलांचं ऑफिस, लहान भावांच्या शाळा ह्या वेळा साधून सगळ्यांचं जेवणखाण व्यवस्थित ठेविलं होतं. धाकटीची तर ती आईच झाली होती. न्हाणं-माखणं, कपडेलत्ते सर्वच तिनं केलं. आपली आई नाही, असं धाकटीला कधी वाटलं असेल, असं दिसत नव्हतं. थोरली जितकी शांत, तितकी ही अवखळ आणि धसमुसळी. थोरली विचारी, तर ही अजून विचार करायला शिकली नव्हती. थोरलीसारखीच हुशार मात्र होती. शाळेत वरचा नंबर सुटला नाही, तसा कॉलेजात वरचा सुटला नाही, अक्कामुळं आईची वाण अशी भासली नाही, पण आई मला टाकून गेली, म्हणून तिच्याबद्दल तिरस्कार व राग मात्र मनात भरून राहिला होता. पण आयुष्यक्रम सपाट्यानं पालटला. अक्काचं लग्न झालं. एवढंच नव्हे, पण ती सातासमुद्रापलीकडं गेली. तिच्या मागोमाग दादाही अभ्यासाच्या निमित्तानं गेला. इतके दिवस अक्काच्या मायेत वाढलेली छोटी आता घरातली मोठी झाली. वडिलांना संभाळण्याची जबाबदारी तिच्यावर आली.

अक्कानं तिला स्वैंपाकपाणी सर्व शिकविलं होतं. घरकाम तिला अवघड वाटलं नाही. पण वडिलांची ओळख मात्र नव्यानं होत होती. अक्काच्या राज्यात तिला वडिलांशी बोलण्याचा कधी प्रसंगच आला नव्हता. वडिलांनी तिला कधी जवळ घेतलं आहे, कधी तिच्याशी, लहानसं का होईना, संभाषण केलं आहे, असं तिला आठवत नव्हतं. सर्व काही

अक्का-अक्का, त्यापलीकडे कधीमधी दादा, पण वडील म्हणजे घरी असणारी, जेवणारी, अक्काला कुरकुरत-कुरकुरत घरकामासाठी पैसे देणारी एक व्यक्ती, ह्यापलीकडे वडिलांबद्दल तिला काहीच माहीत नव्हतं. घरात खुर्च्या-टेबलं होती,-ती एका जागी असत,-वडील ही वस्तू तशाच तऱ्हेची पण हलणारी, चालणारी, बोलणारी होती. त्यांची कामं वेळच्या वेळी व्हावी, ह्यासाठी अक्का जपत असे, हेही तिला माहीत होतं. पण मुलं व वडील कधी बसून गप्पा मारलेल्या तिला आठवत नव्हत्या.

घरात आईबद्दल कुणीच बोलत नसे. पण ह्या मुलांना चार दिवस मोकळेपणे जाऊन रहायला जी घरं होती, ती सर्व आजोळची, -आईचे भाऊ व आईचे आईवडील यांची! मुलं गावाला गेली की हटकून आजीकडे, नाहीतर मामाकडे जात,-शक्य तर वडिलांना न कळविता. किंवा त्यांना कळवून, -त्यांच्या कुरकुरीला न जुमानता! छोटी मातृमुखी आहे, असं आजोळी बोलत. त्यामुळे छोटीला आईबद्दल जास्तच राग येई.

अक्का लग्न होऊन गेली, त्या वेळी छोटी अठरा वर्षांची असावी. ह्यानंतर ती मला अधूनमधून भेटायची. अठरा वर्षांची मुलं सर्वज्ञ असतात, ह्या रुबाबात तिनं मला सांगितलं होतं, "माझे बाबा म्हणजे संशोधन करणारं एक यंत्र आहे. ठरलेल्या वेळी उशीर न करिता खाणं, चहा, आंघोळीला गरम पाणी दिलं की झालं." पण जसजसा वडिलांशी जास्त संबंध येत गेला, तसंतसं हे मूळचं वर्णन फारच बदलावं लागलं. 'मी तुझ्यासाठी किती खस्ता खाल्ल्या, किती पैसे खर्च केले व करतो,' हे ते यंत्र बोलून दाखवू लागलं. छोटीला विचार पडे, अक्काही हेच ऐकत होती का? का हे एक नवीनच सुरू झालं आहे? 'मी तुझ्यासाठी खस्ता खाल्ल्या,' हे वाक्य मात्र ती गप्प बसून ऐकायची नाही-", "अक्का म्हणजे तुम्ही नव्हे-", "माहीत आहे कुणी माझं केलं ते?", "बोलून दाखविणारं असतं एक, करणारं असतं निराळंच!" अशी वाक्यं ती वडिलांना ऐकवी. कधी वडील उत्तर देत नसत, कधीकधी शब्दावरून शब्द वाढे व कडाक्याचं भांडण होई. "अगदी थेट आईसारखी दिसतेस, आणि वागतेस पण आईसारखीच!" असं काही वडिलांनी म्हणावं व हिनं जवळजवळ वेड लागल्यासारखं ते नाकारावं, असं चालायचं. आईशी तुलना केली, आईचं नाव काढलं, की छोटी रागानं वेडी होते, हे लक्षात आल्यापासून वडिलांना तसे प्रसंग वारंवार आणण्याचा एक चाळाच लागला. लहानसहान बाबींवरून खटके उडत. पण मुख्य खटके

छोटीकडे मित्रमंडळी आली म्हणजे उडत. चहा, कॉफी, विनोद चालला, तर हे शब्दही न बोलता आपल्या खोलीत जात. सर्वजणं गेली, म्हणजे छोटीवर राग निघे. ''अशी तरुण मित्रमंडळी गोळा करतेस, त्यांच्याबरोबर हिंडतेस, मला खपायचं नाही!'' वगैरे म्हणून शेवटी ''आईच्या वळणावर गेली आहेस!'' असं म्हणावं. छोटीची परीक्षा आली की ऐन गर्दीत ह्यांच्याकडे पाहुणे यायचे. म्हणजे स्वैंपाक करून परीक्षेच्या वेळी हजर राहणं छोटीला भारी अवघड व्हायचं. खटका उडे. स्वैंपाकच नीट झाला नाही, कॉफीच नीट नव्हती, वगैरे. छोटी रागावली, म्हणजे परत एकदा लहानपणापासूनचा पाढा वाचला जाई व शेवटी तिचा व तिनं न पाहिलेल्या आईचा उद्धार होई. छोटी किती तरी वेळा रडून-रडून डोळे सुजवून घेऊन, न जेवता, न खाता माझ्याकडे आलेली होती. थोड्या वेळानं शांत होऊन घरी जाई. कुठं जाणार? दुसरा मार्गच नव्हता!

काही दिवसांपूर्वी छोटी अशीच दुपारी चार-पाचच्या सुमाराला आली. ''मी आता परत घरी जाणार नाही. बाबा कुठं बाहेरगावी गेले आहेत. ते संध्याकाळी यायच्या आत मी निघून जाणार आहे!''

''अग, तुझी परीक्षा दोन आठवड्यांवर आली आहे, चाललीस कुठं? परीक्षा होईपर्यंत तरी रहा.''

''तोच तर बाबांचा अंदाज आहे. किती बोललो, तरी ह्यावेळी चालेल, असं त्यांना वाटतं. मला परीक्षा नको. मी जाणार.''

''पण कुठं?''

''मी मामाला निरोप पाठविला आहे. तो मला न्यायला येतो आहे. मी त्याच्याबरोबर गावी आजीकडे जाणार आहे.''

पुष्कळ सांगितलं, पण ती ऐकण्याच्या मन:स्थितीत नव्हती व शेवटी ती मामाबरोबर गेली, असं मला कळलं.

आज जवळजवळ दोन महिन्यांनी ती मला भेटली. अगदी घाईघाईनं. तिच्या अक्काकडे दूरदूर ती चालली होती. बोलता-बोलता मला हलवून म्हणते, ''अग, माझी आई मला सापडली!'' मी ऐकतच राहिले.

''मी गावी गेले होते ना आजीकडे, तिकडे दोन-तीन आठवडे राहिले. अशीच एक दिवस दुपारी दिवाणखान्यात वाचीत बसले होते, ती एक लहान सहा-सात वर्षांची मुलगी डुलत-डुलत आत आली. मी कधी त्या मुलीला पाहिलं नव्हतं; पण चेहरा ओळखीचासा वाटला. मी तिच्याकडे

पाहाते आहे, हे पाहून ती थेट माझ्याकडे आली व मला आपल्या हातातलं ती काढीत असलेलं चित्र दाखवीत म्हणाली, ''छान आहे नाही?'' तिच्या रेघोट्या पाहून मी म्हटलं, ''छान आहे. कसलं आहे?'' ''एवढंसुद्धा कळत नाही का?'' असं म्हणून स्वारी माझ्या मांडीवर चढली व ते चित्र कसलं आहे, हे समजावून देऊ लागली. तिचा लाघवीपणा, धीटपणा, गोडपणा ह्यांनी मी अगदी जिंकले गेले होते. एवढ्यात आजी आत आली. तिच्या तोंडावर आश्चर्य व थोडी भीती होती. ''आजी, कोणाची ग ही? किती गोड आहे नाही?'' एवढा वेळपर्यंत तिचा एक हात माझ्या मानेभोवती पडला होता. आजी उद्गारली, ''तुझ्या आईची धाकटी मुलगी आहे ती. आईसारखीच दिसते.'' ओळखीची का वाटली, ते कळलं. ती व मी दिसायला सारख्या होतो. बिंब-प्रतिबिंब एक झालं. माझी आई, हरवलेली आई मला सापडली!

१९७०

# भाग दुसरा

सहा :

# पाच कविता

१.
लाडके, हे चार दिवस
फक्त तुझे-माझे आहेत.

पदराखालून तुला पाजीत होतें,
भोवताली किती माणसें होतीं,
पण तूं आणि मी
एवढेच एकत्र होतों.
अगदी तशीच आपण आज असूं ये.

भोवताली तिऱ्हाईत आहेत,
पण त्यांची जाणीव नाही,
त्यांची अडचण नाहीच.

आज तूं पांघरूण घेतलें आहेस
झाकण लावून घट्ट बंद केले आहेस
दरवाजा लावून टाकला आहेस
ठोठावलें म्हणजे उघडतें म्हणतात
मी केव्हाची ठोठावतें आहें, -
तुला ऐकूं येतें आहे ना?

२.
तांबडी माती
माझा ओरबाडलेला अहंकार
शेवाळांतून वर आलेलीं
कोवळीं पानें
म्हाताऱ्या मनाच्या
हिरव्या आशा
निरभ्र निळें आकाश
जें व्हावे म्हणून मनाची
धडपड आहे तें.

३
सूर्य गेला
पण वर उजेड आहे,
रात्र झाली नाही
पण खाली अंधार आहे,
डोळ्यांत प्रकाश
हृदयांत काळोख
अशा ह्या मधल्या वेळेला
जीव टांगणीस लागला आहे.

उजेड गेला
वर-खाली, बाजूला सगळा अंधार
अंगाला घट्ट लपेटलेला
थंडीने गारठलेला
पुढे न सरकणारा
अढळ, अटळ
उद्या उजाडणार का?

४

नरभक्षक असतात ना,
ते पुरुषच नाही खात
बायकांनासुद्धा खातात.
नरभक्षक फक्त पशूच नसतात
माणसेंसुद्धा असतात.
ते लहान असतात, मोठे असतात,
तरुण असतात, म्हातारे असतात.
ते एकएकटे नाही शिकार करीत
टोळी करून हेरतात
तुटून पडतात
फाडून खातात
ढेकर दिली की परत हेरू लागतात,
आता कोणाला बरं घेरावं?
बाहेरचं कोणी सुचलं नाही
तर डोळे चुकवीत एकमेकांकडे पाहतात,
कोण बरं गाफील आहे?
कोण बरं सावध नाही?
सावध डोळे एकमेकांना भेटतात,
कोण गाफील ते सांगतात
मिळाली शिकार! मिळाली शिकार!

५

बरं का, माई-
अरे, ह्याला इतक्या वर्षांत
आजच कां आठवण झाली?
माई-
ही तर आईची हाक
बये, आजच कां बरं आलीस?
उत्तर कां देत नाही तुम्ही?
आणखी कोण बरं ही पलीकडे
डोक्यावरून पदर ओढलेली?
बाई नाही, बुवाच दिसतसो आहे,
कपाळावर टोपी किती ओढली आहे -
ओळखूंच येत नाही.
मी जवळ आलें आहें, वाकून पाहतें आहें.
हात धरले आहेत, पण तोंडच दिसत नाही,
पण हातांत हात आहेत
आणि त्या हातांतून दुःखाचे लोट
माझ्यात येऊन थडकताहेत,
मला हें दुःख सोसवत नाही,
त्याची कळ माझ्या छातींत येऊन
मला जागी करते.

आजच कां बरं ही सर्वजणं आठवलीं?
माझ्या हाकेला ओ देऊन आलींदेखील?
पण निघून गेलीं,
बोललीं नाहींत.
तोंड लपवून, टोपी घालून
मी मलाच कां दडवीत होतें?
माझ्या दुःखानें शेवटीं मला दुखावलेंच
सर्व नाटक
सर्व स्वप्नांतला खेळ
पण नीटसा साधला नाहीच.

अरे, वाढलंस का?
उशीर होतो आहे,
कामाचा ढीग पडला आहे.
आलें एकदाची वेळेवर
आहांत का सगळे?
दोघेदोघेजण या,
काम समजावून सांगतें
आज जायच्या आधी अर्धं झालं पाहिजे.
एक समाधानाचा सुस्कारा
एक अभिमानाचं हसूं

... मग नेहमीची जाणीव.
मला लौकर यायला
घाईने जेवायला
वेळेवर पोचायला
हवंच होतं का?
दुसऱ्यानं हे काम केलं असतं
असंच केलं असतं,
दुसरा ह्या खुर्चीवर बसला असता
असाच बसला असता,
हेंपण एक नाटक खेळतें आहे
तें स्वप्न, हेंहि स्वप्नच.
खरी जाग कधी येईल का?
आली तर सोसेल का?

१९७०

# भाग तिसरा

सात :

# व्यक्तिस्वातंत्र्य आणि बंधमुक्तता

‘‘अश्लीलता हा कोणत्याही लेखाचा, चित्राचा किंवा इतर वस्तूचा गुण नसून तो फक्त तसा आरोप करणारांच्या मेंदूचा गुण होय,’’ हे वाक्य कै. रघुनाथ धोंडो कर्वे आपल्या ‘समाजस्वास्थ्य’ मासिकाच्या पहिल्या पृष्ठावर ठळकपणे छापीत असत. त्यांचा उद्देश असा दिसतो की, हिरवा, पिवळा, तांबडा, लांब-रुंद, उंच-ठेंगणा, कडू-आंबट-गोड वगैरे गुण वस्तुनिष्ठ असतात, त्याप्रमाणे अश्लीलता हा गुण नसून तो केवळ अनुभवणाऱ्या मनाचा विकार आहे. त्यांना असे म्हणावयाचे आहे की, अमकी एक कृती अश्लील आहे असे जो म्हणतो, त्याचे मनच अश्लील आहे. ह्या म्हणण्यात एका दृष्टीने तथ्य नाही, आणि एका दृष्टीने आहे- कोणत्याही गोष्टीच्या गुणधर्मांचा विचार करताना अगदी पूर्णतया शास्त्रीय दृष्टीने विचार केला तर परिणाम कदाचित वस्तूचाच गुण म्हणून म्हणता येईल. पण रंग, चव वगैरे अगदी वस्तुनिष्ठ भासणारे गुणसुद्धा वस्तुनिष्ठ नसून व्यक्तिनिष्ठ असतात. निदान व्यक्ती ज्या जीवनकोटीतील असते, त्या कोटीच्या शरीररचनेवर व मेंदूच्या ग्रहणशक्तीवर ते अवलंबून असतात. माझ्या बागेतील अमक्या-एका फुलाचा रंग तांबडा आहे असे जेव्हा मी म्हणते, तेव्हा त्याचा अर्थ इतकाच की, त्या फुलावरून परावर्तित होणाऱ्या काही लांबीच्या प्रकाशलहरी माझ्या (मनुष्याच्या) डोळ्यांना तांबड्या भासतात. पण त्याच वेळी त्याच बागेत भ्रमण करणाऱ्या मधमाशीला तेच फूल मुळीच तांबडे दिसणार नाही. ही झाली अगदी वस्तुनिष्ठ समजल्या जाणाऱ्या गुणांची गोष्ट. इतर गुण तर बहुतेक अंशी व्यक्तिनिष्ठ किंवा समाजनिष्ठच असतात. चांगले-वाईट, सुंदर-

कुरूप, इष्ट-अनिष्ट हे गुण वस्तूंना आपण सारा वेळ चिकटवीत असतो. ते वस्तूंत नसून व्यक्तींच्या मनाचेच असतात. आणि व्यक्तीचे मन बहुतेक अंशी समाजाने घडविलेले असते.

ह्या गोष्टींना 'गुण' याऐवजी 'मूल्य' हा शब्द बरोबर ठरेल. प्रत्येक व्यक्ती सारा वेळ मूल्यांच्या जगात वावरत असते. ही मूल्ये व्यक्तिनिष्ठ किंवा समाजनिष्ठ आहेत, म्हणून ती खरी मूल्येच नव्हेत, किंवा ती मुळी खरोखरीची अस्तित्वातच नाहीत, हे म्हणणे अतिशय चूक आहे. बाहेरील जगात असलेल्या वस्तूंच्या गुणधर्मांवर मनुष्याचे व्यवहार ज्याप्रमाणे आधारलेले असतात, त्याप्रमाणे सामाजिक मूल्येही मानवी व्यवहाराला जरूर आहेत. ती असल्याशिवाय समाज राहू शकत नाही: आणि समाजाशिवाय व्यक्ती ही कल्पनासुद्धा अशक्य कोटीतील आहे. अगदी साध्यासाध्या व्यवहारातसुद्धा समाजाचे अलिखित नियम मनुष्य पाळीत असतो. जीवनोपयोगी वस्तूंची देवाणघेवाण, एकत्र राहणे, शेजारी-शेजारी राहणे, खेळणे, कुटुंब या नावाखाली येणारे अनंत व गुंतागुंतीचे व्यवहार करणे, यांशिवाय राजसंस्था, शासनसंस्था, धर्मसंस्था ह्यांच्यात भागीदार असल्यामुळे करावे लागणारे व्यवहार ह्या सर्वांनाच बंधने व नियम लागू आहेत. ह्या बंधनांमुळे आणि नियमांमुळे काही तऱ्हेचे व्यवहार योग्य समजले जातात व काही अयोग्य समजले जातात. योग्य असलेल्या व्यवहारांची यादी फार करून आढळत नाही. पण अयोग्य व्यवहारांची यादी बहुतेक साक्षर समाजांतून कायद्याच्या नावाखाली केलेली आढळते. अयोग्य व्यवहार कायद्याच्या कक्षेत झाल्यास त्याबद्दल शासन काय असावे, हेही बहुतेक साक्षर समाजांत नमूद केलेले असते. पण कायद्यात न सांगितलेले किंवा ज्यांच्याबद्दल शासन स्पष्ट तऱ्हेने दिलेले नाही, असेही अयोग्य व्यवहार पुष्कळच असतात व त्याबद्दल समाज किंवा त्याचा काही भाग आपली नापसंती निरनिराळ्या तऱ्हांनी व्यक्त करीत असतो.

व्यवहारातील योग्यायोग्यता ही जीवनातील काही विशिष्ट महत्त्वाच्या विभागालाच लागू आहे, असे नाही. अगदी क्षुल्लक बाबतीतसुद्धा वागण्याच्या मर्यादा असतात. किती खावे, किती वेळा खावे, काय ल्यावे, कसे ल्यावे, काय बोलावे, कसे बोलावे, चालणे कसे असावे, दृष्टी कशी असावी, येथपासून तो लग्नाच्या बायका किती असाव्या, लग्नाबाहेरचे संबंध असावे किंवा नसावे, असल्यास कुठच्या प्रमाणात, सुंदर बायकोच्या

सौंदर्याचा उपयोग नोकरीत बढती मिळण्याकरिता कितपत करावा, की मुळीच करू नये, देवभक्ती करीत असतानाही आचारातील कडवटपणा किती ठेवावा, स्वत:च्या आचारावर कितपत बंधने घालावीत, कुटुंबियांच्या आवडी-निवडी, शरीरस्वास्थ्य व मन:स्वास्थ्य यांना कितपत किंमत द्यावी, या सर्व गोष्टींना लिखित व त्यापेक्षा अधिक प्रमाणाने अलिखित मर्यादा असतात. ह्या मर्यादा समाजातील निरनिराळ्या व्यक्तींना, निरनिराळ्या असू शकतात. कुमारिकेच्या वागण्याचे नियम, सौभाग्यवतीच्या वागण्याचे नियम व विधवेच्या वागण्याचे नियम हे बऱ्याच वेळा निरनिराळे असतात. एवढेच नव्हे, तर एकाच तऱ्हेच्या नियमांची तीव्रताही निरनिराळी असू शकते. त्याचप्रमाणे निरनिराळ्या वयांप्रमाणेही वागणुकीचे नियम निरनिराळे असतात व त्यांच्या अंमलबजावणीच्या कडकपणातही फरक पडतो.

निरनिराळ्या वर्गांतील जातींतील लोकांबद्दलचे नियम निरनिराळे असतात. सर्व तऱ्हेच्या लहानमोठ्या नियमांचे उल्लंघन निरनिराळ्या व्यक्तींकडून होत असते, व त्या व्यक्तींना बऱ्याचदा ह्या-नाही-त्या रूपात समाजाकडून धिक्कार, उपहास किंवा प्रत्यक्ष दंड अशा निरनिराळ्या प्रकारच्या शिक्षा भोगाव्या लागतात. व्यवहारातील सर्वच नियम व त्यांबद्दल वाटणारी आस्था हा एका दृष्टीने संस्कृतीचा पाया आहे व दुसऱ्या दृष्टीने संस्कृतीचे कार्य आहे. समाज रचनेच्या मुळाशी असलेल्या सर्वच लहानमोठ्या नियमांना 'धर्म' ही संज्ञा देणे अयोग्य नाही. समाजधारणेचा पाया म्हणून, आणि समाजधारणा अव्याहत चालावी म्हणून जे काही लिखित आणि अलिखित नियम आहेत, त्या सर्वांना व्यापक अर्थाने 'धर्म' म्हणता येईल. त्याच व्यापक अर्थाने लग्नाच्या बायकोशी वागताना 'मी कोणत्याही समाजधर्माचे उल्लंघन करणार नाही,' अशी शपथ 'धर्मे च अर्थे च कामे च नातिचरामि' ह्या वाक्याने केलेली दिसते. ह्या वाक्यात 'धर्म' याचा अर्थ वरील व्याख्येइतका व्यापक नसून आपण नेहमी 'धर्म' हा शब्द जसा वापरतो, तसा संकुचित आहे. पण 'अतिचर' म्हणजे काय, हा वादाचा विषय होतो; व समाज सारखा बदलत असल्याने समाजाची मूल्ये बदलत असतात; आणि आचार व अतिचार यांच्या मर्यादाही मागेपुढे होत असतात.

समाजाच्या काही अवस्थांमध्ये आचार व अनाचार यांच्या मर्यादा

स्पष्ट असतात. काही अवस्थांमध्ये त्या बऱ्याच अस्पष्ट होतात. एका समाजाचा परकीय समाजाशी कोणत्याही तऱ्हेने निकट संबंध आला, म्हणजे आचारविचारभिन्नतेची तीव्र जाणीव होऊन ह्या मर्यादा पुसट व्हायला लागतात. उदाहरणेच द्यावयाची, तर आपल्या स्वतःच्या समाजातील देता येतील. ''जाईन उभ्या बिदी। न दिसे उजवी बूज। राखील कुळ तुझं.'' ह्या ओवीत मर्यादशील स्त्रीने पदर कसा घ्यावा, हे सूचित केले आहे. आजकाल कित्येक कुलवानांच्या मुली व वधू ह्यांचा पदर मुळी एकाच खांद्यावर असतो. तेव्हा ही मर्यादा बदलण्याचे कारण ज्या समाजात स्त्रिया दोन्ही खांदे उघडे टाकितात अशा समाजाशी संबंध आला, हेच आहे. पूर्वीच्या काळी लग्नाच्या दोन बायका असणे हे अप्रतिष्ठेचे लक्षण नव्हते. आता ती गोष्ट गुन्ह्याच्या सदरात जाऊन बसली आहे. हाही परिणाम संस्कृतिसंगमाचाच आहे.

प्रत्येक समाजामध्ये आचाराचे जे नियम असतात, ते सर्वच्या-सर्वच अगदी निरपवाद नसतात. काही प्रसंगी ते नियम सैल होतात, किंवा काही वेळेपुरते अजिबात नाहीतसे होतात. उदा.- होळीच्या दिवसांत गोवरी-लाकडाची चोरी करणे पूर्वी क्षम्य मानिले जाई. तसेच, एरव्ही सभ्य वागणारे लोक त्या दिवसांत मन मानेल तसा गलिच्छपणा व शिवीगाळही करीत असत. काही प्रसंगी एरव्ही कानाला न रुचणारा विनोद आणि थट्टा क्षम्य समजली जाई. बहुतेक सर्व समाजांतून सर्वसाधारणपणे न खपणारे वर्तन काही विशिष्ट प्रसंगी करण्याची मुभा असे, आणि ही मुभाही सर्वांना नसून काही विशिष्ट वयाच्या व तऱ्हेच्या व्यक्तींना असे. हिंदू समाजातील शिमगा किंवा ख्रिस्ती समाजातील कार्निव्हल हे अशा प्रकारची बंधने शिथिल करावयाचे सण आहेत. ही बंधनांची शिथिलतासुद्धा काही तरी नियमांत बसलेली असते. ज्या वेळी कुठच्याच तऱ्हेचे नियम राहत नाहीत, कुठचे योग्य, कुठचे अयोग्य, कुठचे कर्म, कुठचे अकर्म हे समाजातील बहुसंख्य व्यक्तींना कळेनासे होते, तेव्हा व्यक्तींच्या जीवनात भयंकर क्रांती होते. सर्व तऱ्हांची जीवनमूल्ये विस्कटून गेली आहेत, कशाला प्रमाण म्हणून राहिले नाही, अशा अवस्थेत समाज किंवा व्यक्ती दोन्ही जगू शकत नाहीत. जुनी प्रमाणे नष्ट होऊन नवीन प्रमाणे सर्वमान्य होईपर्यंत जो वेळ जातो, तो व्यक्तीला किंवा समाजाला अतिशय कष्टाचा असतो.

ह्याच अनुषंगाने वाङ्मय, कला व संप्रदाय ह्यांचा विचार होणे

आवश्यक आहे. वाङमयाच्या इतर कार्याबरोबरच एक महत्त्वाचे कार्य म्हणजे जे साधारणपणे मिळत नाही, ते मिळाल्याचा भास उत्पन्न करणे. ''बोलाचीच कढी, बोलाचाच भात खाऊनिया तृप्त होई कोण?'' असे जरी तुकारामबोवा म्हणाले तरी थोड्याबहुत प्रमाणात तेच कार्य वाङमय, कला आणि धर्म करीत असतात. त्याशिवाय भिकाऱ्याला राजपद मिळाल्याच्या गोष्टी सर्व जगातील वाङमयातून दिसल्याच नसत्या. जातिनिष्ठ समाजामध्ये चोखामेळ्यासारख्याला प्रत्यक्ष लाथाच बसतात. पण धर्माने त्याला मरणानंतर संतपद दिले व वैकुंठाची प्राप्ती करून दिली. बायबलमध्ये बरोबर असेच सांगितले आहे की, देवाच्या राज्यात पृथ्वीवरील उपेक्षितांना खास जागा राखून ठेविलेली असते. प्रत्येक कादंबरी, कथा किंवा काव्य हे वाचताना साधारण मनुष्य त्यांतील कलामूल्यांचा विचार करीत नाही. वाचक त्या वेळेपुरते स्वत:ला त्या-त्या प्रसंगातील नायक किंवा नायिका करतो. जितका कलेचा दर्जा खालचा तितक्या प्रमाणात अशा तऱ्हेने स्वत:चे समाधान करणे जास्त सोपे जाते. विशेष म्हणजे हे समाधान, हे सौख्य वीट येणारे नसते. इतकेच काय, अशा तऱ्हेचे सौख्य लाभायला व कंटाळा टाकावयाला उपाय म्हणून कलाकृती जास्त-जास्त भडक व्हावी लागते. मनुष्य खाऊन-खाऊन तात्पुरता का हाईना, तृप्त होतो. कामेच्छा कितीही प्रबळ असली, तरी तृप्तीचा क्षण प्रत्यक्ष कामपूर्तीनंतरच येतो. कितीही ताकदवान असला तरी स्वत: खेळत असताना मनुष्य दमतोच. पण चविष्ट जेवणाची वर्णने वाचून किंवा शृंगाराची वर्णने वाचून किंवा प्रत्यक्ष डोळ्यांनी बघून सौख्य झाले, तरी तृप्ती मिळत नाही. आणि ब्रेबर्न स्टेडियमवर खेळणाऱ्याने कितीही श्रमाने धावा काढिल्या, तरी पाहणाऱ्याचे पाय दुखत नाहीत. ह्यासाठी शृंगार जास्त-जास्त भडक करण्याकडे वाङमय किंवा चित्रपट यांची प्रवृत्ती होऊ लागते. कलेचे सर्वच क्षेत्र वासनेचा सौदा करावयालाही फार सोयीचे ठरते.

योग्यायोग्यतेचे नियम कलेला लागू झाले, तर कलावंताच्या स्वातंत्र्यावर गदा येते. कलेत प्रकट होणाऱ्या सर्जनशक्तीला बाध येतो, असे काहींचे म्हणणे आहे. आणि खरोखरच अश्लील काय व काय नाही, हे ठरविण्याची अडचण खरी हीच आहे. कलावंत-मग तो लेखक, चित्रकार, शिल्पी किंवा चित्रपटनिर्माता-कोणीही असो, नवनिर्मिती करण्याचे त्याचे

कार्य एका दृष्टीने जग निर्माण करणाऱ्या परमेश्वराच्या कार्यासारखेच आहे. ज्याप्रमाणे विश्वाचा विचार करितांना त्याला मानवी मूल्यांची कसोटी लावणे वेडगळपणाचे ठरेल, त्याप्रमाणे थोड्या अंशाने रोजच्या व्यवहारातील योग्यायोग्यतेची कसोटी कलेला लावणेही सर्वस्वी योग्य होणार नाही. "थोड्या अंशाने सर्वस्वी योग्य होणार नाही," ही शब्दयोजना मी सहेतुक केलेली आहे. कला हा जरी व्यक्तीच्या भावनांचा, बुद्धीचा व कल्पनाशक्तीचा आविष्कार असला, व कलावंताला स्वत:ला तो अगदी सर्वस्वी व्यक्तिनिष्ठ वाटला, तरी कलेचे रूप, कलेची मूल्ये, कलावंताचे जीवन ही सर्वत्र समाजाने घडविलेली अशी असतात. शिवाय, कलेचे पांघरूण घेऊन कलावंत नसलेल्या लोकांना कलेप्रमाणे भासणारे असे काहीतरी बनवून त्यापासून लोकांकडून पैसेही काढिता येतात. अश्लील वाङ्मयाबद्दल काही वर्षांपूर्वी बोलताना एक पोलिस अधिकारी म्हणत होते की, असे वाङ्मय निर्माण करणारी पुण्यातील काही मंडळी थोड्या अवधीत इतका पैसा मिळवितात की, मोठमोठे दंड भरूनही वर्षानुवर्षे त्यांना आपला धंदा चालविता येतो. ह्यासाठी कलेच्या स्वातंत्र्याचा पुकारा करून अश्लीलतेला उत्तेजन दिल्यामुळे लोकांच्याबरोबर कलेचीही हानी होते, असे मला वाटते.

अश्लीलता नेमकी कशात आहे, हे ठामपणाने बोट ठेवून सांगता येत नसले, तरी तो वस्तूचा गुणधर्मच नाही, म्हणून अशी काही गोष्टच नाही, असे म्हणणे म्हणजे वस्तुस्थितीचा विपर्यास करणे आहे. अश्लीलतेचा विचार करिताना ती निर्माण करणाऱ्यांचा हेतू, ती ज्यांच्यापर्यंत पोहोचते त्यांची संख्या व जितका वेळ पोहोचत राहते तो काळ ह्या तिन्ही गोष्टी लक्षात घ्याव्याच लागतात. संस्कृत ग्रंथांतून उत्तान शृंगारिक वर्णने असली, तरी एक तर ती आनुषंगिक असतात, इतर दुसऱ्या गोष्टींबरोबर ओघाओघाने आलेली असतात, व दुसरे- सामान्य मनुष्याला ती मिळत वा समजत नाहीत. फारच थोड्या लोकांपर्यंत ती पोहोचतात. अशा एखाद्या ग्रंथाचे भाषांतर करिताना त्यातील इतर सृष्टी बाजूला ठेवून फक्त उत्तान शृंगाराचाच भाग चवीचवीने भाषांतरित करून पैसे मिळविण्याच्या हेतूने लोकांच्या हातात पडेल असे केले, तर हा आचार गर्ह्य व दंडनीयच समजला पाहिजे. दंड करणारी व्यक्ती किंवा संस्था कोणती असावी, व दंड किती असावा हे ठरविणे कठीण आहे. केवळ शिष्ट लोकांना किंवा खऱ्या रसिकांना असंमत म्हणून अशा गोष्टीचा

खाजगी रीत्या किंवा सार्वजनिक-रीत्या धिक्कार करून भागत नाही. कारण ह्या-ना-त्या उद्योगाने पैसा मिळविणाऱ्या लोकांवर सार्वजनिक धिक्काराचा परिणाम होत नाही. त्यांच्याविरुद्ध शासनसंस्थेचीच मदत घ्यावयास पाहिजे. ह्याउलट एखादा कलाकार आपल्या कलानिर्मितीत उत्कटतेच्या भरात- ती उत्कटता नुसती उपभोगाच्या आनंदाची नसून धिक्काराचीही असू शकेल, लोकांना अश्लील वाटणारी निर्मिती करून गेला. तर धिक्कार हे प्रभावी शस्त्र ठरू शकेल, किंवा त्याची निर्मिती पहिल्या दर्जाची कलाकृती असली, तर लोकांचा धिक्कार हास्यास्पद ठरेल.

काही झाले, तरी ज्या युगात लोक हजारोंनी, स्त्री, पुरुष, तरुण, मुले-मुली अशी सरसकट-चित्रपटासारखी एखादी गोष्ट नेहमी पाहू शकतात, किंवा रेडिओवरची गाणी ऐकू शकतात. किंवा १-२ आण्यांला उत्तान भडक वर्णने वाचू शकतात अशा युगात सर्वांनी मिळून वाचणे, ऐकणे, पाहणे, ह्या कुठच्याच गोष्टीत अतिचार न होण्याची खबरदारी घेतली पाहिजे.

व्यक्तिस्वातंत्र्य हे मूल्य ऐकावयाला किंवा उच्चारावयाला जितके गोड आणि सोपे. तितकेच आचरणात उतरावयाला दुष्कर आहे. हे स्वातंत्र्य कशाचे? चोरी करायचे, एखाद्याला ठार मारायचे, बायकोचा खून करायचे किंवा तिला चोप द्यावयाचे? ह्या बाबतीत स्वातंत्र्य असावे असे म्हटले, तर सर्वच त्या माणसाला वेड्यात काढतील. लहान मुलांना चोरी करावयाला शिकविणे किंवा इतर तऱ्हांनी कुमार्गाला लावणे हेही स्वातंत्र्य कोणी कबूल करणार नाही. काही वर्षांपूर्वीपर्यंत अगदी हीच गोष्ट धनसंचय करण्याच्या बाबतीत होती; पण आता कोठचीही राज्यसंस्था व्यक्तीला अनिर्बंध धनसंचय करू देत नाही. ह्या गोष्टीमध्ये जितक्या उघडपणे समाजाची बंधने प्रतीत होतात, तितक्या उघडपणे जरी ती इतर गोष्टींत प्रतीत झाली नाहीत, तरी ती असतातच. समाजाला नवी दृष्टी देणाऱ्या कलाकाराला ही बंधने मोडण्याची इच्छा असली, तर त्याबद्दल होणाऱ्या दंडालाही त्याने तयार असले पाहिजे व उत्कृष्ट कलाकार ह्याप्रमाणे दंड सहनही करतात. व्यक्तिस्वातंत्र्य म्हणजे मूल्यहीनता व सार्वत्रिक बंधमुक्तता खासच नाही. व्यक्तीच्या व्यवहारावर अति-दडपण नको, ह्यासाठी व्यक्तीची धडपड सदैव चाललेली असते. दुसऱ्या बाजूने व्यक्तीला कह्यात ठेवून समाजाचे नुकसान होऊ नये, अशी समाजाची धडपड चाललेली असते. समाज म्हणजे काही हातात शस्त्र घेऊन भांडणारा विराटपुरुष नव्हे, तर समाजाच्या मूल्यांना

जपणाऱ्या व्यक्तीच समाजाच्या वतीने भांडत असतात. ह्या झगड्यात जुने बदलत असते. व नव्याची स्थापना होत असते. तेव्हा व्यक्ती-स्वातंत्र्याच्या नावाने वासनांच्या अमर्याद परिपोषाशिवाय ज्यात कसलाही दुसरा उद्देश नाही, अशा तऱ्हेच्या निर्मितीला मोकळीक देणे कधीही रास्त ठरणार नाही.

१९६९

आठ :

# पुनर्जन्माचा बिनतोड पुरावा

किती हजार वर्षे झाली कोण जाणे, अयोध्येत दिलीप नावाचा राजा राज्य करीत होता. त्याला मूल होईना, म्हणून तो व त्याची राणी सुदक्षिणा रानात गुरुंगृही वसिष्ठाश्रमाजवळ जाऊन राहिली. ऋषीच्या जवळ नंदिनी नावाची एक गाय होती. रोज रानात जाऊन ती चरत असता राजाने तिचे संरक्षण करावे व राणीने तिची सकाळ-संध्याकाळ पूजा करावी, असे व्रत गुरूने सांगितले.

राजा रोज गायीपाठीमागे रानात जाई. एकदा राजा भोवतालची वनश्री पाहात असताना एका सिंहाने नंदिनीवर झडप घातली. राजा धनुष्याला बाण लावून सिंहाला मारावयाला निघाला, पण त्याच्या हातापायांतली सर्व हालचाल जाऊन एखाद्या पुतळ्याचे जडत्व त्याच्या अंगी आले. मनातल्या मनात तो रागाने जळू लागला. एवढ्यात सिंह त्याला मनुष्यवाणीने संस्कृतात म्हणाला-

'बाबा राजा, उगीच श्रम घेऊ नकोस. अस्त्राचासुद्धा येथे पाडाव लागणार नाही. वारा जोराने वाहून झाड पाडू शकेल, पण मोठमोठ्या शिळा तो कशा उलथवील?'

'ढवळ्या नंदीच्या पाठीवर बसणाऱ्या साक्षात शंकराचा मी कुम्भोदर नावाचा अनुचर आहे.

'हे तुझ्या पुढ्यात देवदारूचे झाड दिसते आहे ना, ते पार्वतीमाईने सोन्याच्या घड्याने पाणी घालून स्वतःच्या मुलांप्रमाणे वाढविले आहे.

'एकदा कोणा तरी रानपशूच्या अंग घासण्यामुळे ह्या झाडाची साल

निघाली. तेव्हा आपला मुलगा जो स्कंद त्याला शत्रूच्या बाणाने जणू जखम केली, इतके दु:ख पार्वतीमाईंना झाले.

'तेव्हा वन्यपशूंपासून ह्या झाडाचे संरक्षण करण्यासाठी शंकराने माझी योजना केली. त्याने मला सिंहाचे रूप दिले व येणाऱ्या-जाणाऱ्या पशूंवर उपजीविका करण्यास सांगितले.

'ह्या कामात मला कधीचा उपास पडला आहे; भूक लागली आहे. बरी ही गाय आली आहे. आता हिच्या मांसाने पारणे करून मी आपला उपवास फेडणार आहे.

'तेव्हा तू आता परत जा. मनात खंत करू नकोस. तू गुरूची पुरेशी भक्ती केली आहेस. ज्याचे शस्त्राने रक्षण करणे अशक्य आहे, त्याचे रक्षण केले नाही, म्हणून क्षत्रियाला कमीपणा येण्याचे कारण नाही.'

सिंहाचे बोलणे ऐकून राजा म्हणाला,

'माझी हालचाल खुंटली आहे. तेव्हा मी काय बोलतो, त्याचे तुला हसू येईल. पण तुला माझ्या अंत:करणाचा ठाव घेण्याची शक्ती आहे. मी जे बोलतो, ते मनापासून हे तुला उमगेलच.

'जगाच्या उत्पत्ति-स्थिति-लयाला कारणीभूत अशा ईश्वराने तुला नियम घातला आहे; तो मी मान्य केलाच पाहिजे. पण आहिताग्नी गुरूचे माझ्या ताब्यात दिलेले धन डोळ्यांदेखत नष्ट झालेले पाहणेही मला अशक्य आहे.

'तेव्हा मला खाऊन तू आपली भूक भागव. आणि संध्याकाळच्या वेळी वासराकडे ओढ घेणाऱ्या ह्या गायीला सोडून दे.'

हे बोलणे ऐकून, हसत-हसत किंचित औपरोधिक स्वराने सिंह म्हणाला,

'तू जगाचा एकमेव राजा आहेस; तरुण आहेस; रूपाने देखणा आहेस. अशा थोडक्यासाठी पुष्कळाची हानी करणारा तू मला विचारशून्य मूर्खच दिसतोस.

'जीवदयेमुळे ह्या एका गायीचे काय- ते कल्याण होईल, पण तू जिवंत असलास, तर समस्त प्रजाजनांना बापाप्रमाणे निरनिराळ्या संकटांपासून वाचविशील.

'एकुलती-एक गाय असलेल्या आगजाळ कोपिष्ट गुरूच्या रागाची तुला जर भीती वाटत असेल, तर दुसऱ्या कोट्यवधी दुभत्या गायी देऊन त्याचा राग तू शमवू शकतोस.

'तुझ्या जिवंत राहण्यामुळे होणाऱ्या कल्याण-परंपरेचे जतन कर व इन्द्रपदाहून काकणभरही वैभवाने कमी नसलेल्या राज्याचा उपभोग घे.'

हा व्यवहारिक उपदेश राजाने मानिला नाही. त्याने सिंहाला उत्तर दिले; सिंहाचा अनुनय केला.

'क्षतापासून रक्षण करतो तो 'क्षत्रिय' समजतात. मी जर ते केले नाही, व कोणाचा तळतळाट घेऊन आपला जीव वाचविला, तर ते योग्य होईल का?

'ही अशी-तशी साधी गाय नाही. प्रत्यक्ष कामधेनूची ती मुलगी आहे. तेव्हा मला खा, आणि हिला सोड. तुझा उपवास फिटेल. गुरूंचेही हित साधेल.

'तूही चाकर आहेस. तुझ्यावर नेमलेले काम तू महायत्नाने करितो आहेस. मग माझ्यावर सोपविलेले काम न करिता मी आपल्या नियोजकापुढे कसा उभा राहू?

'क्षणभंगुर नाशवंत शरीराविषयी मला आस्था वाटत नाही. मला काळजी आहे ती माझ्या यशाबद्दल. ते यशोरूपी शरीर राखण्यासाठी तू मला मदत कर.

'ह्या इथे रानात आपण भेटलो, एकमेकांशी बोललो, त्यामुळे आपला मित्रसंबंध जडला आहे. आता, हे भूतनाथानुचरा, माझी एवढी प्रेमाची विनंती ऐक, गायीला सोड व मला खा.'

आपण जीव तोडून सांगितले, तरी राजा 'मरून कीर्तिरूपे उरण्या'च्याच गोष्टी बोलतो आहे, हे ऐकून सिंहाला नवलच वाटले. 'जिवंत राहून कल्याणपरंपरा जतन करण्याऐवजी कीर्तीच्या हावेने केवढी अनर्थ परंपरा हा राजा ओढवून घेणार आहे, हे त्याला कसे कळत नाही? राजा निपुत्रिक मेला, तर केवढे अराजक माजेल, हे त्याला कळत नाही का?' वगैरे विचार सिंहाच्या मनात आले असणार. 'पण जाऊ दे, आपल्याला काय करावयाचे? हा स्वप्नाळू माणूस म्हणतो आहे तसे करावे,' असा सिंहाने विचार केला.

भोळ्या सिंहाने गायीला सोडले. राजावर देवांनी पुष्पवृष्टी केली व तोही सुटला. राजावर ऋषी प्रसन्न झाले. गाय प्रसन्न झाली व त्यांच्या प्रसादाने त्याला मुलगा झाला, वगैरे पुढचा कथाभाग कालिदासाने सांगितला आहे. पण त्या बिचाऱ्या सिंहाबद्दल एक शब्दही नाही. ही सर्व

बनवाबनवी आहे. सत्त्वपरीक्षा का काय म्हणतात, तसला हा लुटूपुटीचा खेळ आहे, हे त्या बिचाऱ्या सिंहाला उमगले नाही. देवदारु-वृक्षाचे रक्षण करीत-करीत एक दिवस भुकावलेल्या स्थितीत म्हातारपणामुळे तो मेलेला असणार.

जितके राजाचे जीवन सफल झाले, तितकेच सिंहाचे असफल झाले होते. त्याने किती व्यावहारिक उपदेश राजाला केला होता, -अगदी जीव तोडून केला होता. पण राजाने तो ऐकिला नाही. एवढेच नव्हे, तर उपदेश न ऐकिल्यामुळे त्याचा प्राण तर नाहीच गेला, पण एका कवीने गावे एवढे यश त्याला मिळाले. देवांनी जयजयकार केला; पुत्रप्राप्ती झाली. म्हणजे पर्यायाने सिंहाचा उपदेश हीन दर्जाचा ठरला. ह्या सगळ्या खटाटोपात गाय हातची गेली, ती गेलीच. सर्व प्रकारे सिंह नागविला गेला. मरताना तो मनाच्या अतृप्त अवस्थेत, वासनामय परिस्थितीत मेला. ज्ञानदेव म्हणतात त्याप्रमाणे 'देहास्तमानीं' त्याचे सर्व 'संकल्पविहंगम' नव्या जन्माची, वासनापूर्तीची वाट पाहत शतकानुशतके बसलेले होते.

शेवटी तो दिवस एकदाचा उजाडला. सन १७४८ मध्ये आपल्या भारतीय सिंहाचा बेंथम नावाच्या एका ब्रिटिश कुटुंबात जेरेमी नावाने जन्म झाला. हा मुलगा फार हुषार निपजला. बापाच्या मनात त्याने वकील व्हावे असे होते, पण त्याने वकिली न करिता कायदा व कायद्याची तत्त्वे ह्यांचा अभ्यास केला. तो तर्कशास्त्रात फार पारंगत झाला. आपला भारतीय सिंहही तसाच होता, हे वाचकांना ठाऊक आहेच. त्याने नीतितत्त्वांचा व आचरणशुद्धतेचा फार खोल व तार्किक विचार केला. त्याच्या मते सत व असत हे क्रियेचे गुण परिणामानेच पारखता येतात. जे परिणामी चांगले, ते चांगले. सदगुणासाठी सदगुण (कोणाच्या फायद्यासाठी, कोणाचे बरे होण्यासाठी नव्हे), हे तत्त्व तो मूर्खपणाचे मानीत असे. ज्या आचरणाने पुष्कळांना पुष्कळ सुख मिळेल, ते आचरण नीतिदृष्ट्या श्रेष्ठ, असा सिद्धान्त त्याने प्रतिपादिला. 'अल्पस्य हेतोर्बहु हातुमिच्छन विचारमूढः प्रातिभासि मे त्वम्' (थोड्यासाठी पुष्कळांच्या कल्याणाचा नाश करणारा तू मला मूर्खच दिसतोस), ह्या सिंहाच्याच उक्तीचे रूपांतर म्हणजे बेंथमचा सिद्धान्त आहे, हे कोणाच्याही लक्षात येईल. बेंथमने पैसे व्याजी देण्याच्या पद्धतीचा वरील तत्त्वानेच पुरस्कार केला. कायदे करावयाचे, ते बहुतांच्या बहुत कल्याणासाठी करावे, उगीच अमक्या एका सदगुणाच्या पालनासाठी नव्हे,

असे त्याचे स्पष्ट मत होते. नीतितत्त्वाची ही मीमांसा पाश्चात्त्य जगास फारच पसंत पडली. दोनशे वर्षे ती आपला अंमल जगभर गाजवून आहे. भारतातील सिंहाचे एका राजाने जे ऐकले नाही, ते ह्या ब्रिटिश नरसिंहाचे म्हणणे जगाने शिरोधार्य मानले. शिवाय, गाय खायला मिळाली नाही, वचपाही गायखाऊ राष्ट्रात जन्मल्यामुळे निघाला. जन्मल्यापासून मरेपर्यंत बेंथम नरसिंहाने कितीतरी गुरे खाल्ली असणार. बेंथम १८३२ मध्ये मेला. कृतार्थ, सुफलित जीवन जगून गेला. परत जन्म घेण्याची त्याला आवश्यकता राहिली नाही.

१९७०

हा लेख कालिदासीय रघुवंशाच्या दुसऱ्या सर्गावर आधारलेला आहे. भाषांतर गोळाबेरीज आहे; शब्दशः नाही.

नऊ :

# जुन्याच समस्या; नवे उपाय

विद्यार्थी उठून गेला होता. पण ज्या विषयावर आम्ही बोलत होतो, तो माझ्या मनात अजून घोळत होता. कुटुंबसंस्थेतील मोक्याच्या जागा कोणत्या, धोक्याच्या जागा कोणत्या, आणि हा मोका आणि धोका कशामुळे उत्पन्न झाला असावा, हे समजावून सांगण्याचा मी प्रयत्न करीत होते. मोक्याची जागा घरातल्या कर्त्या पुरुषाची, म्हणजे बापाची, धोक्याची जागा हीही कर्त्या पुरुषाचीच, म्हणजे बापाचीच. हे का?

कुटुंब हा दोन किंवा तीन पिढ्यांचा एकत्र राबता असतो. एक पिढी मोठी होत असते, मोठी झालेली दुसरी पिढी कुटुंब चालवीत असते. कुटुंबाला खाऊ-पिऊ घालते, कुटुंबासाठी श्रम करिते आणि त्याच्या मोबदल्यात कुटुंबावर अधिकार गाजविते. धाकट्या पिढीने मोठ्यांचे ऐकावे, मोठे सांगतील तसे वागावे, अशी अपेक्षा असते. सर्वसाधारणपणे थोड्याबहुत प्रमाणात ही अपेक्षा पुरीही होते. पण कधीकधी असे काही प्रसंग उदभवतात की, त्यांमुळे बाप-मुलगा, सासू-सून ह्यांचे संबंध कसे धोक्याचे आहेत, हे समजते. मुलगा बापाचा वारस असतो. बापाचे सर्व अधिकार, घरदार, साठविलेली माया त्याला मिळावयाची असते. सून आज-ना-उद्या आपण घराची मालकीण होऊ, अशी वाट पाहत असते. आयुष्याची काही वर्षे आज्ञाधारकपणे रहायला या दोघांचीही मोठी तक्रार नसते. पण जर वडील माणसे मरणामुळे किंवा अपंग झालो या जाणिवेमुळे लवकर दूर झाली नाहीत, तर तरुण पिढीचा आज्ञाधारकपणा, प्रेम व भक्ती यांना ताण बसतो, वाट पाहण्याचा तिला कंटाळा येतो आणि अशा वेळी

तरुण पिढी वडिलांच्या विरुद्ध उठते. बंड करिते, क्वचित वडिलांना मारितेसुद्धा.

अंध दीर्घतमा फारफार दिवस जगला. इतका की, मुले त्याला कंटाळली व शेवटी त्याला एका लाकडी तराफ्यावर बसवून मुलांनी गंगेत सोडले. बिंबिसार व त्याची राणी इतकी जगली की, अजातशत्रूला त्यांना तुरुंगात टाकून राज्य घ्यावे लागले. तीच गोष्ट औरंगजेबानेही केली. बापलेकांच्या भांडणामध्ये लेकाने बापाला किंवा बापाने लेकाला मारल्याचे कितीतरी गुन्हे होत असतात. एक पिढी जावयाची, दुसरी पिढी यावयाची, आणि एका पिढीचे अधिकार दुसरीला मिळायचे, हा जो क्रम चाललेला असतो, तो होता-होईतो ताणाताणीशिवाय व्हावा, हे कुटुंबसंस्थेचे एक उद्दिष्ट. आणि त्याचमुळे बापाची जागा मोक्याची आणि धोक्याचीही. जी गोष्ट कुटुंबातील परिस्थितीची, तीच सर्व समाजाची. तेथेही अतिशय विस्तृत प्रमाणावर एका पिढीकडून अधिकार दुसऱ्या पिढीकडे जात असतो. आणि म्हणूनच दोन पिढ्या कायमच्या ताणलेल्या, दुरावलेल्या परिस्थितीत असतात.

माझे विचार येथपर्यंत आले आणि एकदम अंधारात मोठा उजेड पडावा, तसे मला झाले. कुठच्याही प्रसंगात माझे विचार ठाम, जलद व परिस्थितीची समज असलेले असे नसतात. थोड्या गोंधळलेल्या मन:स्थितीतच, पण काही श्रद्धांना धरून मी काहीतरी करीत राहते, आणि मग कितीतरी दिवसांनी काहीतरी निराळ्याच संदर्भात पूर्वी घडलेल्या प्रसंगावर एकदम प्रकाश पडतो, मन एकदम लख्ख होऊन जाते. अगदी तसेच आता झाले. एकदा एक प्रसंग असा आला की, त्यामध्ये एका बाजूला मी व एका बाजूला माझे सगळे-सगळे तरुण सहकारी, अशी वेळ आली. त्या वेळी माझे मन भांबावून गेले होते. मी विचार करिताना प्रत्येक सहकाऱ्याबद्दल निरनिराळे विचार करीत होते. अमका विरुद्ध वागला, त्याला हे अमके कारण झाले असावे; पण तो दुसरा आणि तिसरा ह्यांना का बरे माझी भूमिका कळू नये? न्याय-अन्याय, सत्य-असत्य, अपराध आणि शिक्षा ह्यांबद्दलच्या माझ्या आणि त्यांच्या भूमिकेत एवढा मोठा फरक का बरे पडावा? मी अगदी हतबुद्ध झाले होते. पण आत्ता, ह्या क्षणी मला उमगले की, न्याय-अन्याय, अपराध-निरपराध वगैरे सर्व गोष्टी ह्या भांडणात अवांतर व गैरलागू होत्या. खरे भांडण होते दोन पिढ्यांचे. एक नाही, दोन नाही, २५-३० वर्षे एका

विभागाची मुख्य म्हणून मी राहिले. वेळच्या-वेळीच शहाणपणाने बाजूला सरून नव्या पिढीला वाव द्यावा, ते हातून झाले नाही. आणि काही सुदैवी सहकाऱ्यांप्रमाणे वेळीच मरणही आले नाही. त्यामुळे मूर्ख म्हाताऱ्यांची जी स्थिती व्हावयाची, तीच माझी झाली. भांडण तत्त्वाचे नसून सबंध पिढीचे होते. कुठच्याही नीतितत्त्वापेक्षा अगदी खोलवर गेलेल्या जीवसृष्टीतील एका प्रवृत्तीचा तो आविष्कार होता, हे आता माझ्या ध्यानात आले.

हे पिढ्यांचे भांडण, एका पिढीने दुसरीचा नाश करावयाचा ही प्रवृत्ती सनातन आहे, सर्व जीवनसृष्टीत आहे. एकेका कुटुंबात आहे; सर्व समाजात आहे. गेल्या काही वर्षांमध्ये आढळणारे तरुणांचे मोर्चे तिचेच निदर्शक नाहीत का? पूर्वीच्या इतिहासात धाकट्या पिढीने थोरल्या पिढीवर इतक्या व्यापक प्रमाणावर व इतक्या तीव्रतेने हल्ले केलेले दिसत नाहीत. अशा तऱ्हेचा हल्ला ही जर एक सनातन प्रवृत्ती आहे, तर तिचा आविष्कार हल्लीच एवढ्या तीव्रतेने का व्हावा? पूर्वीची थोरली पिढी मुलांना चांगले जरबेत ठेवीत असे, तेव्हा बंड व्हावयाची शक्यता खरे म्हणजे जास्त असली पाहिजे. हल्लीची थोरली पिढी त्या मानाने तरुणांना दबून असते; तरुणांचे कौतुक करिते. तरीसुद्धा तरुणांनी इतके चेवून उठावयाला कारण काय?

-याला कारणे दोन आहेत. पहिले कारण माणसाच्या शास्त्रीय प्रगतीत आहे; दुसरे कारण म्हातारी पिढी तरुण पिढीचे जे वरवरचे लाड करिते, त्यात आहे.

शास्त्रीय प्रगती ती अशी... गेल्या शंभर वर्षांत शास्त्राच्या सहाय्याने मरण टळले नाही तरी लांबले मात्र खास आहे. पूर्वी मूल जन्माला येऊन मोठे होणे म्हणजे एक दिव्यच होते. कित्येक मुले जन्मतःच मरत व निम्म्या-शिम्म्यांना पाच वर्षांच्या आतच मरण येई. आता सर्व जगभर व आपल्या भारतातसुद्धा बालमृत्यूचे प्रमाण खूप घटले आहे. पूर्वी पाचांवरून पंचवीसपर्यंत जाणारी मुलेच कमी होती. आता त्यांची संख्या दुपटी-तिपटीने वाढली. ह्याचप्रमाणे दुसऱ्या टोकाला माणसे बहुतेक पन्नास वर्षांच्या आतबाहेर मरत असत. साधारणपणे चाळीस-पन्नास वर्षे जगणारी माणसे अगदी सर्वस्वी निरोगी क्वचित असत. पण आता यकृत बिघडले, हृदय मंदावले की, त्यावर तोंडाने घ्यावयाची ओषधे आहेत; अंगात टोचायच्या सुया आहेत. ऐकू आले नाही, तर कानाला चिकटवावयाला यंत्रे आहेत; धड दिसत नाही, तर चष्मा आहे. असे निरनिराळे टेकू देऊन माणसे पंचेचाळीस

वर्षांपुढे खूप जगतात. आणि धिरा देऊन उभ्या केलेल्या खांबाप्रमाणे नुसती उभीच राहतात असे नव्हे, तर आपापल्या अधिकारांच्या जागांना धरून, अगदी घट्ट धरून उभी राहतात. काही लोकांना अमक्या-एका वयाला जागा सोडून द्यावी लागते. कारकून, शिक्षक, सैन्यातले अधिकारी यांना आज-ना-उद्या जागा सोडाव्या लागतात. पण त्यांच्याहून वरचे अधिकारी गव्हर्नर, मिनिस्टर, निरनिराळ्या संस्थांचे मुख्य हे मात्र आपली जागा सोडीत नाहीत. एकतर ते त्या जागेवर असताना मरतात, किंवा त्यांना एका जागेवरून काढले, तर दुसरी मोठी जागा द्यावी लागते. पूर्वी पाच वर्षांची मुले पंचवीस वर्षांची होईपर्यंत सुदैवाने जुनी व्हावयाला तयारच नव्हती. ती मोठी माणसे होती. जबाबदारीच्या जागा संभाळून होती. आणि वडील पिढी लवकर मरून गेल्यामुळे स्वतःची लहान भावंडे व मुले आणि आपण स्वतः या सर्वांच्या भरणपोषणाचा भार त्यांच्यावर पडलेला असे. इतक्या समजुतीने व इतक्या लवकर आईबाप मेले, म्हणजे मोठ्या श्रद्धेने त्यांचे श्राद्ध होत असे, आठवणी निघत असत. काही वेळेला तर मेलेल्या मनुष्याचा टाक करून देवांत ठेवून त्याची पूजा होई. कवींना आईबापांवर काव्ये करावीशी वाटत. 'ते हि नो आमचे आईबाप होते, तेव्हा आम्हाला कसलीही काळजी नव्हती. 'ते हि नो दिवसा गता:!' म्हणून रडायला वाव होता.

पण आता पाच वर्षांची पोरे पंचवीस वर्षांची झाली, तर चाळीस वर्षांची माणसे साठ वर्षांची होऊन जगतच असतात आणि जगता-जगता खालच्या पिढीला बाप्ये होऊ न देण्याची खबरदारी घेतात. शाळा काढतात, कॉलेजे काढतात, तीस-तीस वर्षांचे झाले तरी त्यांना शिकवीत असतात. त्यांना पैसे देतात, कपडे देतात; फक्त एकच गोष्ट करीत नाहीत. त्यांना मोठे होऊ देत नाहीत. आपण मरतही नाहीत व बाजूलाही सरत नाहीत. अशा वेळेला बिचाऱ्या खालच्या पिढीने जर बंड उभारले, तर नवल काय?

ज्या शास्त्रीय प्रगतीने ही स्थिती आणिली, त्याच शास्त्राला त्याच्यावर तोड नाही का सापडणार? काहींना जन्मालाच घातले नाही, व काहींना पन्नास वर्षांपर्यंत नाहीसे केले, तर ही सामाजिक समस्या सुटणार नाही का? ह्या दोहोंपैकी पहिला मार्ग पुष्कळ राष्ट्रांनी चोखाळलेला आहे. पण दुसरा मार्ग स्वीकारावयाचा, हे मात्र कोणाच्याही मनात येत नाही. ह्याउलट आयुष्याची मर्यादा वाढवावयाची कशी ? मरावयाला घातलेल्या माणसाला अर्धवट जिवंत अवस्थेत किती दिवस टिकविता येईल, ह्याकडे

लोकांचे लक्ष लागलेले आहे पन्नाशीच्या आसपास वय झाले, म्हणजे शक्य तितक्या कमी क्लेशांत वडील माणूस नाहीसे करून टाकणे खरोखर कठीण नाही. आमके-एक वय झाले की लगेच त्या दिवशी त्याला मरणाचे बक्षीस द्यावयाचे, इतका क्रूर व तडकाफडकी प्रकार न करिताही योजनाबद्ध रीतीने हळूहळू पन्नास वर्षांवर आयुष्य असलेला मनुष्य समाजातून नाहीसा करून टाकावयाचा, अशी युक्ती योजिता येईल. एखाद्या डोकेबाज संख्याशास्त्रज्ञाला हा विषय दिला, तर मला वाटते, महिन्याभरात तो ह्याचे उत्तर देऊ शकेल. पन्नास वर्षांच्या वर वय असलेल्या माणसांची एक यादी करावयाची. तीमध्ये दरवर्षी किती भर पडते हे समजू शकते. सध्या फुगलेली ही संख्या व नवीन येणारे, असे मिळून एक दहा वर्षांत सगळ्यांना नाहीसे करावयाचे म्हटले, तर तो शास्त्रज्ञ कुठच्याही तऱ्हेची दया, लोभ, आपलेपणा वगैरे न दाखविता कोणते नंबर मारावयाचे, ते ठरवून देईल. ह्या नंबरांच्या चिठ्ठ्या सार्वजनिक रीतीने काढाव्या, नाही तर गुप्त रीतीने. आणि एकदा एका वर्षाचे नंबर मिळाले की ह्या-ना-त्या प्रकाराने वर्ष संपावयाच्या आत त्यांना नाहीसे करावे,- कोणाला सुई टोचून, कोणाला औषध देऊन, कोणाला काही खावयाला देऊन, कोणाला काही प्यावयाला देऊन. प्रसंगाप्रमाणे योग्य ते उपाय योजून त्यांना नाहीसे करणे शक्य आहे. ह्यामुळे फार फायदे होणार आहेत.

जुगाराची चटक लागलेल्या राज्यकर्त्यांना व प्रजेला जुगार खेळायला एक नवी संधी मिळणार आहे. यंदा कोणते बरे म्हातारे जाणार आहेत? पुढच्या आठवड्यात कोण जाणार आहेत? -हे ओळखणाऱ्यांना पहिले बक्षीस जाहीर करिता येईल. म्हातारी माणसेसुद्धा जाताना कोणालातरी द्रव्य देऊन जातील!

संतप्त तरुण नाहीतसे होतील. कारण ज्यांच्यावर दात-ओठ खावयाचे, ज्यांची मूल्ये चुकली म्हणून आरडाओरडा करावयाचा, ती पिढीच मुळी नाहीशी झालेली असणार. सर्वच तऱ्हेचे मोर्चे कमी होतील. कारणे दोन : ज्यांच्याविरुद्ध मोर्चा न्यावयाचा, असे कोणी उरणार नाही; आणि बऱ्याचशा तरुणांवर आयुष्याच्या जबाबदाऱ्या पडल्यामुळे अजून मुलेच असलेले असे तरुण मोर्चात सामील व्हावयाला राहणारच नाहीत.

हातचे एक शस्त्र नाहीसे झाले, म्हणून राजकीय पक्षांना व पुढाऱ्यांना वाईट वाटण्याची शक्यता आहे. पण त्यांनी विचार केला, तर असे दिसेल

की, वाईट वाटण्याचे कारण खरोखरच त्यांना राहणार नाही. म्हातारी माणसे मेली, म्हणजे तरुणांना त्यांच्या जागांवर बसता येईल. तेथून उचकटावयाला प्रयत्न करावे लागणार नाहीत. जुने पुढारी मेल्यामुळे नव्यांना भरपूर वाव राहील.

म्हाताऱ्यांचासुद्धा या योजनेत फायदा आहे, हे विचाराअंती त्यांना दिसून येईल. जास्ती जगल्यामुळे वरवर दिसावयाला म्हातारी माणसे जरी अधिकाराच्या पदांवर असली, तरी खालच्या पिढीच्या सतत प्रहारांमुळे त्यांची मने हबकून गेलेली असतात. ती जिवंतपणीच मेलेली असतात: हृदयातील व्यथा लपवून वरवर हसत असतात; जिवंतपणाचे सोंग घेऊन वावरत असतात. ह्या असल्या जिवंत मरणापेक्षा खरोखरीचे नाहीसे झालेले काय वाईट?

माझे विचार कुठे भरकटले असते कोण जाणे! पण मला शब्द ऐकू आले, ‘‘बाई, कॉफी आलीय, पिता ना?’’

एकच कप कॉफी आली होती. ‘‘तू नाही घेणार?’’ मी विचारले.

‘‘मला नकोय आज.’’

मी मुकाट्याने कप तोंडाला लावला. कॉफी छान गरम होती. पण- आज नेहमीपेक्षा कडू लागली. का बरं?

मी वरती पाहिले. माझ्या तरुण मदतनिसाचा चेहरा नेहमीप्रमाणेच प्रसन्न, निर्व्याज व निरागस होता.

१९६९

# भाग चौथा

दहा :

# एकाकी

मी एकटी आहे. मी काय एकाकी आहे होय? मुळीच नाही. माझ्याभोवती माझी काळजी घेणाऱ्यांची गजबज आहे. मग मी काय असहाय आहे? अंहं. मी हाक मारण्यापूर्वीच कितीतरी हात मला मदत द्यायला तयार आहेत, कितीतरी पाय माझ्यासाठी धावताहेत. इतकी माणसे भोवती आहेत, पण कुणाला म्हणून माझ्या अंत:करणाचा ठाव सापडला नाही, असा का प्रकार आहे? छे! तसेही नाही. माझ्या अंत:करणाचा ठाव ज्यांना सापडला, अशीही पुष्कळ आहेत. मग मी एकटी कशी?

मी एकटीच होते, -आहे, व पुढेही एकटीच असणार आहे. हे उमजायला जवळजवळ सगळे आयुष्य जावे लागले! सगळ्या गोष्टींचे हे असेच आहे. सर्व आपल्या डोळ्यांपुढे असते, पुस्तकांतून वाचीत असतो, समजले आहे असा भास होत असतो. एक दिवस, -कसे कोण जाणे? - अंतरी एकदम वीज चमकावी असा प्रकाश पडतो व खरोखरचे समजते. मी माझ्या स्कूटरवर बसून स्वतंत्रपणे ती चालवू लागले तेव्हाची गोष्ट. पहिल्याच दिवशी माझ्यापुढे एक टांगा होता. टांग्याचा वेग किती, मोटारीचा वेग किती, या गोष्टी मला अगदी तोंडपाठ होत्या. मला टांग्याच्या पुढून एक वळण घ्यावयाचे होते. मी आपली वाट पाहत होते, टांगा पुढे सटकेल आणि मी वळेन म्हणून. एकदम माझ्या डोक्यात लख्ख झाले. अरे, मी तर टांग्यापेक्षा कितीतरी जास्त वेगाने जाऊ शकते की!

एखादे वेळी डोक्यात प्रकाश पटदिशी पडतो. कधीकधी फार-फार वेळ लागतो. मोठ्या श्रमाने मी कितीतरी गोष्टी एकत्र केल्या होत्या. द्राविड

भाषांमधील नात्यांचे शब्द माझ्याजवळ जमले होते. वंशावळीही खूप होत्या. पण द्राविड कुटुंबरचनेचे सूत्र काही लक्षात येत नव्हते. गोळा केलेली माहिती शक्य तितक्या मुद्देसूदपणे मांडून 'अमक्या-अमक्या गोष्टीमागील सूत्र काही उमजत नाही,' म्हणून लेख लिहिला. तो प्रसिद्ध झाला, पण मनाचे काही समाधान होत नव्हते. असे महिनेच्या-महिने गेले. असमाधान, सूक्ष्म रुखरूख हा एक स्थायी भाव होऊन बसला होता. पण वरवर मात्र मन आणि शरीरही इतर कामांत व्यग्र होती. एक दिवस मी सकाळी उठले, ती द्राविड कुटुंबरचनेचे उलगडलेले सूत्र घेऊनच. माझा पूर्वीचा लेख काढून त्यात उल्लेखिलेल्या सर्व गोष्टी डोळ्यांखाली घातल्या. आता कशी साऱ्या विसंगतींना संगती लागत होती; एखादेही टोक विनासंदर्भ अधांतरी लोंबत राहिलेले नव्हते. जे विचार करकरूनही समजत नव्हते, ते विनासायास हाती आले तरी कसे? असे काही झाले म्हणजे मला एका ओळीची आठवण होते. "नायमात्मा प्रवचनेन लभ्य:, न मेधया, न बहुना श्रुतेन। यमेवैष वृणुते तेन लभ्य:...॥" हा आत्मा आहे ना, तो प्रवचनाने मिळत नाही, बुद्धीने हाती लागत नाही, पुष्कळ पढून गवसत नाही. तो स्वत: होऊन ज्याला निवडतो, त्यालाच तो मिळतो. ही ओळ मनात आली की, कॉलेजात शिकलेला इंदुमतीस्वयंवराचा सर्ग आठवतो व डोळ्यांपुढे चित्र उभे राहते ते स्वयंवराचे. किती राजकुमार बिचारे जिवाचा आटापिटा करीत होते, पण तिने ज्याला माळ घातली, त्यालाच ती मिळाली. तस्सा खट हा आत्मा आहे. म्हणजे काय खटपटच करू नये? कोणी म्हणतात, ह्या वाक्यात परमेश्वरी कृपेचे सूत्र गोवलेले आहे. ईश्वर म्हणतात ना, तो तपश्चर्येने लाभत नाही, त्याची कृपा व्हावी लागते!

अगदीच ह्याच तऱ्हेने एक दिवस एकदम मला ज्ञान झाले की, मी एकटी आहे.

ध्यानी-मनी नसता डोक्यात जो प्रकाश पडतो, त्याला कृपा म्हणता येईल का? ज्ञानाचा हा झोत मलातरी विजेच्या लोळासारखा वाटला. मी त्यात भाजून निघाले, तडफडले. वरून जिवंत होते, तरी आतून मेल्यासारखी झाले. एकटे असणे ही गोष्ट काय एवढी भयंकर आहे? जगाच्या गलबल्याने कंटाळून एकटे असावे, असे वाटत नाही का कधी? मनस्वी राग आला, म्हणजे नाही का आपण होऊनच माणूस जगापासून दूर होण्याचा प्रयत्न करीत?

रागाने दूर निघून जाणे, रुसून कोपऱ्यात बसणे, जगाला कंटाळून लांब जाणे हे सर्व प्रकार खरे एकटेपणाचे नव्हत. आपली चहा होत नाही, लोकांना आपले अंतरंग समजलेच नाही, असे वाटून मनुष्य जेव्हा रागाने जातो, तेव्हा मनाच्या कुठच्यातरी कोपऱ्यात जगाच्या निकटपणाची जाणीव त्याला असतेच. जगाने माझी आज उपेक्षा केली, तरी उद्या त्याला माझी किंमत कळेल, ह्या गावी माझी बूज राहिली नाही, तरी कुठेतरी दुसरीकडे माझ्या भावनेला खासच साद मिळेल, अशी त्याची खात्री असते. ह्या एकान्तवासाची सर्व भूमिकाच लोकसापेक्ष असते. लोकांपासून तोंड वळविले, तरी पशुपक्षी, झाडे ह्यांच्या सहवासात संतकवी परमेश्वरचिंतन करीत होते असे दिसते. म्हणजे- जरी कोणी रुसले, रागावले, एकान्तवासात गेले, तरी एकटे नसते.

मला जे एकटेपणाचे ज्ञान झाले, त्यामुळे मी इतकी भांबावून, गडबडून गेले, तो अगदी खराखुरा, अनादि-अनंत असा एकटेपणा आहे. तो माझाच नव्हे, सर्व जीवजातीचा, ज्यात-ज्यात म्हणून चैतन्य आहे, त्याचा एकटेपणा आहे. आपल्या भोवती जी माणसे आहेत, त्यांना आपण कधी भेटलोच नाही, अशा भेटीची शक्यताच नाही; डोळा डोळ्याला भिडतो, काहीतरी मिळालेसे वाटते, पण ती खरी मिळणीच नाही; स्पर्शाची तीव्र अनुभूती ही भेट नव्हे. एखाद्याचा पायरव कानी पडावा, त्याचे शब्द कानी यावे, पण हे सर्व भेटीचे प्रसंग म्हणजे समुद्रात सहजगत्या प्रवाहाने एकत्र येणारी लाकडे जशी एकमेकांना टक्कर देतात, त्यापेक्षा विशेष असे काही नाही. शेवटचा उपाय म्हणून देवाच्या पायांवर डोके ठेविले. मंदिराच्या दाराशी जरा बसले, तेथेही मनात हाच विचार आला, 'अठ्ठावीस युगे ह्या क्षणाची वाट पाहत तू उभा असणार, जन्म-जन्मांतरीच्या फेऱ्यांत मी चुकून तुझ्या पायांवर येऊन आदळले ही काय भेट म्हणायची? एक आत्मा, दुसऱ्या आत्म्याला भेटणेच शक्य नाही.

ह्या परिस्थितीला आल्यावर आपण शेवट गाठला, ह्यापलीकडे जाणे शक्य नाही, असे वाटले. माझ्या समजुतीप्रमाणे मी स्वस्थ होते; पण मला न सांगता, न सवरता मन ह्या कोंडीतून सुटण्याचा प्रयत्न करीतच होते. आता पुढे मार्ग नाही, ही कबुली द्यायला मन तयार नसतेच.

नेहमीच्या वाचनातील ओळी व शब्द निराळ्याच संदर्भात मनापुढे यायला लागतात. शब्द तेच, प्रत्येक शब्दाचा अर्थ तोच, पण मनाच्या

स्थितीप्रमाणे वाक्यार्थात निराळेपणा किंवा खोली यायला लागते. 'विश्वात्मकें देवें' हे दोन शब्द कितीदा ऐकिले असतील, डोळ्यांनी वाचले असतील, पण ह्या वेळच्या वृत्तीमुळे मन तेथेच घोटाळत राहिले. विश्वात्मकता, सर्वात्मकता म्हणजे सर्व एकाकी आत्म्यांचे भेटण्याचे स्थान नाही का? प्रत्येकाला विश्वात्म्याची भेट होण्याची शक्यता आहे, व काही असामान्य व्यक्तींना ते साधलेही होते विश्वात्म्याशी भेट म्हणजे सर्वत्र विखुरलेल्या एकाकी जीवांशीही भेट, ही परिस्थिती आपोआपच आली की,-ह्या विचारांनी मनाला बरे वाटले. म्हणजे हा नवा विचार मनात आल्याबरोबर माझी लगेच इतरांशी एकात्मता झाली, असे मुळीच नाही. पण 'एकटेपणा' वर एक तोडगा अस्तित्वात आहे. ह्या जाणिवेनेच बरे वाटले. मी आपली समजूत घातली की, एकटेपणा वाटणे म्हणजे आपल्याभोवती कुंपण घालणे आहे. हे कुंपण तुटले, तर सर्वात्म्याशी व त्याच्या द्वारे इतरांशी खरी भेट होण्याची शक्यता आहे. पण मी आपल्याभोवती शब्दांचे जंजाळ पसरीत होते व बोलाच्याच कढी-भाताने भूक शमविण्याचा प्रयत्न करीत होते.

ज्या मनाने माझ्यापुढे हा विचार आणिला, तेच शत्रूप्रमाणे माझ्यापाठी लागले होते. मी कुठे दम खाईन किंवा विश्रांती घेईन, ह्याची सोयच नाहीशी झाली होती. कसे का होईना, माझे समाधान झाले होते ना, -पण मन स्वस्थ बसू देत नव्हते. काहीतरी दुवा हाताशी आहे पण सापडत नाही, तसे झाले होते.

नवा दुवा सापडला, तोही गोष्ट वाचता-वाचताच. पूर्वी वाचलेले पण नक्की आठवेनासे झालेले-फक्त हुरहुरीच्या रूपाने राहिलेले काय होते, ते समजले व उलगडा झाला, आणि मनाची धडपडही थांबली. ''आत्मा एव इदम अग्रे आसीत एकः एव।सः अकामयत। बहु स्याम।'' पूर्वी पहिल्याप्रथम आत्माच फक्त होता; एक होता. त्याने इच्छा केली, मी पुष्कळ व्हावे. ''सः अबिभेत तस्माद एकाकी बिभेति''... त्याला भीती वाटली. एकटे असले, म्हणजे अशीच भीती वाटते. ''स वै नैव रमे। तस्मादेकाकी न रमते''... त्याला करमेच ना. एकटे असले, म्हणजे करमत नाही. त्याला वाटले, आपल्याला बायको असावी. एकटे असले, म्हणजे असेच वाटते.

मला खूप हसू आले. एकदम मनावरचे कितीतरी दिवसांचे दडपण गेले. 'सर्वात्मा, सर्वात्मा' म्हणतात ना, तो पूर्वी एक होता, अद्वितीय होता, त्याला एकटे वाटले! त्याला वाटले, पुष्कळ व्हावे!

गम्मतच आहे. एकटे, सर्वात्मक, दुसरे नाही, असे असले म्हणजे इतर असावेत, असे वाटते; ब्रह्म झाले म्हणून काय झाले, त्यालाही कुणाचे तरी बोलणे ऐकावेसे वाटले, कुणालातरी पहावेसे वाटले; म्हणून ते पुष्कळ झाले; आणि त्याचे तुकडे एकमेकांची खरी भेट होत नाही म्हणून रडतातच. एक असतानाच एकाकीपणा घालविण्यासाठी दुकटे व्हायचे, आणि पुष्कळ असल्यामुळे वाटणारा एकाकीपणा घालविण्यासाठी विश्वात्म्याकडे धाव घ्यायची. हे चक्र कधीच थांबणार नाही. माझ्या अगदी आतल्या मनाचेही समाधान झाले वाटते. तेसुद्धा कुरतडायचे थांबून दमलेल्या कुत्र्यासारखे पुढच्या पंजात डोके टेकून शांत निजले.

१९६२

अकरा :

# लोक आत्मचरित्र का लिहितात?

आपल्या स्वत:बद्दल लिहावेसे वाटणे हे म्हातारपणाचे लक्षण आहे. मला वाटते, मी पाहिलेली आत्मचरित्रे, आठवणी सर्व म्हाताऱ्यांनीच लिहिलेली आहेत. तरुण माणसांनीही क्वचित स्वत:बद्दल लिहिले आहे, पण ते स्वत:चे एखादे कृत्य वा भूमिका ह्यांच्या समर्थनासाठी आहे. "मी माझा धर्म का सोडला?" "मला कम्युनिझमचा वा भांडवलशाहीचा कंटाळा का आला?"- अशासारखी ती आत्मनिवेदने आहेत. स्वत:च्या आयुष्यावरच आधारलेल्या एखाद्या प्रसंगाचे चित्रण, नाटक, कादंबरी, कथा वा काव्य ह्या रूपानेही ती आपल्यापुढे आलेली आहेत. पण त्यांतही चितारलेल्या स्वानुभवातील 'मी' नाहीसा होऊन त्या 'मी' चे एक सर्वात्मक प्रतीक बनते. अशा तऱ्हेच्या वाङमयातील आनंद, दुःख, त्वेष ही अमक्या-एका कालातील, अमक्या-एका ठिकाणी असलेल्या अमक्या-एका व्यक्तीची न राहता तशा तऱ्हेच्या प्रसंगातील कोणाचीही बनतात. असे झाले असते, तर आपल्यालाही असेच वाटले असते, अशी भावना तशा प्रसंगातून न गेलेल्या व्यक्तींनासुद्धा निर्माण होते. थोड्याफार फरकाने सर्वच वाङमयाबद्दल असे म्हणता येईल. पण आत्मकथा व्यक्तिगत राहते; ज्या गोष्टी आपण आपल्या मित्रांजवळ बोलू, त्या सर्वांजवळ बोलल्या जातात. हे म्हातारपणाचेच लक्षण नाही का?

माझे एक मित्र काही दिवस 'आत्मचरित्र' म्हणजे काय व लोक ते का लिहितात, ह्याबद्दल सारखी चर्चा करीत होते. त्यांनीही आत्मचरित्र लिहिले होते. ते का, हे त्यांनी सांगितले नाही. मीही विचारिले नाही. पण त्यांचे आत्मनिवेदन काही थोडे प्रसंग वगळल्यास प्रसंगनिष्ठ व वस्तुनिष्ठ झालेले

होते. 'आत्मा' एका समाजातील, एका कालातील सुशिक्षित माणसाचे प्रतीक होता. त्यातील 'व्यक्ती' सापडत नव्हती. ते माझ्या मामंजींना विचारीत होते, "अण्णा, तुम्ही आत्मचरित्र का लिहिले?" अण्णांचे उत्तर त्यांच्या स्वभावाला धरून होते. ते म्हणाले, "पुढील लोकांना मार्गदर्शन व्हावे, ही माझी इच्छा," परत मी प्रश्न विचारिला, "चार पाउले उमटवु आपुली ठेवु खुणेचा मार्ग बरा' अशा अर्थाने का?" ते म्हणाले, "होय." हा हेतू म्हणजे म्हातारपणाची बडबड खासच नाही. कार्य काय, अकार्य काय, चांगले काय, वाईट काय, ह्याबद्दल ज्यांचे विचार पक्के आहेत, कसोटीचा प्रसंग आला असता धीर करून ज्यांनी आपले विचार आचरणात आणिले व ज्यांच्या मनात स्वत:बद्दल कधी शंका आली नाही, अशा एका माणसाचे हे उद्‌गार होते. बेंजामिन फ्रँकलिनचे आत्मचरित्र असेच असणार. फार काय, अचाट कार्य करणाऱ्या चर्चिलचे आत्मचरित्र, त्याचा तितकाच अचाट शत्रू जो हिटलर त्याचेही आत्मनिवेदन ह्याच तऱ्हेचे. प्रत्येकाच्या व्यक्तिमत्त्वामुळे, कार्याच्या व्याप्तीमुळे व लिहिण्याच्या शैलीमुळे त्यांत फरक आहे, जमीन-अस्मानाचा वाटावा, इतका फरक आहे; पण त्या निवेदनाच्या मागची भूमिका सारखीच. हेही एक प्रकारे आत्मसमर्थनच आहे; पण त्याच्या बुडाशी स्वत:बद्दलची म्हणजे स्वत:च्या कृत्यांच्या, व मतांच्या सर्वथैव योग्यतेची खात्री आहे.

मी ज्या आत्मनिवेदनाबद्दल बोलते आहे, ते ह्या प्रकारचे नव्हे. ते एक निवेदन असते,-अगदी स्वत:बद्दलचे निवेदन असते. त्याच्या पाठीमागे काही मोठा हेतू नसतो. आपले सांगावेसे वाटते, बोलावेसे वाटते, म्हणून बोललेले असते. त्या बोलण्यात नेहमीच्या बोलण्याप्रमाणेच खूपसे लपविलेले असते; पण बरचसे लपविलेले निसटून बाहेर पडतेच. स्वत:बद्दलचे खूपसे सांगितलेले असते; पण म्हातारपणीच असे का सांगावेसे वाटते?

सर्वच म्हातारी माणसे खूपच बडबडतात. त्यातली काही साक्षर असतात. साक्षरांतल्या काहींना आपली बडबड कागदावर उतरवायला वेळ असतो. ही बडबड छापून काढणारे काही आढळतात. कारण अशी कागदावर उतरलेली, स्वत:च्या घरच्या नसलेल्या म्हाताऱ्याची वटवट ऐकायला काही रिमाटेकड्या लोकांना वेळ असतो.

सगळे खरे, पण रिकामा वेळ असला म्हणून तरी स्वत:बद्दल लिहावेसे का वाटावे? तरुणपणी का वाटत नाही? म्हातारपणीच का वाटावे?

ह्या प्रश्नाचे उत्तर अगदी अचानक दोन प्रसंगी, दोन तऱ्हांनी मिळाले. एझुपेरी नावाच्या फ्रेंच लेखकाने दुसऱ्या महायुद्धाच्या वेळी घरदार सोडून अमेरिकेत स्थायिक होण्यास निघालेल्या लोकांचे वर्णन केले आहे : ''(लिस्बनमध्ये जुगार खेळताना पाहिलेली) ही माणसे बोटीवर मला परत दिसली. ती सर्व अमेरिकेला निघालेली होती. बोट एका खंडातून दुसऱ्या खंडाला जायला निघाली होती. माल कोणता? - ज्यांची मुळे तुटली आहेत, अशा ह्या झाडांचा. ज्यांशिवाय अगदी चालायचेच नाही, एवढ्याच वस्तू मी आपल्याबरोबर घेतल्या होत्या. पण ही माणसे खिशात हात घालून आपल्या नावाची कार्डे -आपल्या व्यक्तित्वाची उरलीसुरली फुटकी निशाणी- शोधशोधून काढीत होती. आपण कोणीतरी आहोत, हा खेळ ती परत खेळत होती. आपल्याला काहीतरी अर्थ आहे, ही समजूत टिकविण्यासाठी ती आपली ओढाताण करीत होती. 'तुम्हांला माहिती आहे का? मी तो अमका-तमका.' असे ती म्हणत होती. 'मी अमक्या गावचा, त्या तमक्याचा मित्र, तुम्हांला माहीत आहे ना तो?' आणि मग ती दुसऱ्याला निरनिराळे लांबलचक इतिहास ऐकवीत होती : कोठच्यातरी मित्राचा, कोठच्यातरी केलेल्या कामाचा. ज्यांमध्ये काही अर्थ नाही व कोणाला स्वारस्य नाही, अशा काहीतरी लांबलचक हकीकती ती सांगत बसत... आपण खरेच परतणार आहो, असा एक विचित्र खेळ ती मनाशी खेळत होती.

''माणूस शेजारी गेले आहे की सातासुद्रापलीकडे गेले आहे, ह्याला महत्त्व नसते. एखाद्या मित्राची वाट पाहत असावे, त्याचे येणे लवकर होऊ नये, अशा वेळी त्याचे आपल्या मनातील अस्तित्व हे शरीराने त्याच्या जवळ असण्यापेक्षासुद्धा तीव्रतेने जाणवते. मी सहारात होतो, त्या वेळी माझे आपल्या घरावर जेवढे प्रेम होते, तेवढे इतर केव्हाही नव्हते. सोळाव्या शतकात खलाशी जेव्हा दक्षिण आफ्रिकेच्या टोकाशी वाऱ्याच्या भिंतीतून आपली गलबते नेत-नेत वर्षे मोजीत होते, तेव्हा ते आपल्या प्रियेच्या जितके जवळ होते, तितके कोणीही जवळ नसेल. त्यांचे प्रयाण ही त्यांच्या परत येण्याची सुरुवात होती. जायच्या दिशेने जेव्हा ते शिडे उभारीत, तेव्हा खरोखर त्यांची परतीची तयारी चाललेली असे. ब्रिटनीच्या बंदरातून प्रियेच्या घरी जाण्यासाठी सगळ्यांत जवळचा रस्ता आफ्रिकेच्या केप हॉर्नवरून गेलेला होता. आता ह्या बोटीवरून जाणारी माणसे ब्रिटनीच्या त्या खलाशासारखी होती; पण कोणीतरी त्यांची ब्रिटनीमधली प्रियाच हिरावून

नेली होती. त्यांना रात्री-अपरात्री वाट दिसावी म्हणून ब्रिटनीमधली कोणीही बाई आपल्या खिडकीत पणती ठेवून बसली नव्हती. घरावर रुसून गेलेल्या मुलासारखीही ही नव्हती. ती बाहेर निघाली होती हे खरे; पण परत जायला त्यांना घरच उरले नव्हते. जेथे व्यक्तिमत्त्व, स्वत्व नाहीसे झाले आहे, अशा खऱ्या प्रयाणाला ती निघाली होती...

''त्यांना कोणतीही मानवी घनता नव्हती. ज्यांना अमुक-एक घर आहे. अमुक-एक मित्र आहे, अमुक-एक जबाबदारी आहे, अशी ती माणसे नव्हती. हे सर्व आपल्याला आहे, असे ती वागत होती. पण तो निव्वळ एक खेळ होता. कोणाला त्यांची गरज नव्हती. कोणीही त्यांच्याकडे मदत मागायला जाणार नव्हते.''

म्हातारी माणसे अशाच महाप्रयाणाला निघालेली असतात. येथले सर्व काही-आपले घर, आपली आळी, आपली माणसे, ज्याने म्हणून मानवी जीवनाला घनता आलेली असते, जे-जे म्हणून येथल्या मातीत दृढमूल झालेले असते, ते सर्व टाकून त्यांना जायचे असते. परत यायचे नसते. जेथे जायचे, तेथे येथल्या ओळखीदेखी उपयोगी नसतात. येथल्या कोणालासुद्धा त्यांची गरज नसते, आणि अगदी अशाच वेळी त्यांना स्वत:बद्दल, स्वत:च्या अनुभवांबद्दल, स्वत:च्या मित्रांबद्दल बोलावेसे वाटते.

एझुपेरीचे पुस्तक न वाचलेल्या माझ्या एका बालमैत्रिणीने अगदी अशाच तऱ्हेचे शब्द परवा उच्चारिले. प्रश्न होता कोल्हापूर सोडण्याचा,-पुण्याला येऊन राहण्याचा. ''लग्नानंतरचे सर्व आयुष्य येथे गेले. येथे रस्त्यातून गेले, तर पंचवीस माणसे ओळखीची भेटतात. कुणी मदत मागायला येतात, कुणी सल्ला विचारायला येतात. कुणाला गरज आहे, ते आपल्याला माहीत असते. दोन दिवस आम्ही दिसलो नाही, तर लोक घरी विचारपूस करायला येतात. पुण्याला सुट्टीत गेले होते. सबंध आठवड्यात कोणी ओळखीचे भेटले नाही. भाऊ व नातेवाईक आपापल्या कामांत वा मेळाव्यात दंग. आपली कोणाला गरजच नाही. मला इतके चमत्कारिक वाटले, मी आले बाई निघून परत.'' लहानपणची तिची पुण्यातल्या मातीतली मुळे तुटली होती. म्हातारपणी नवी मुळे येण्याची तिला तरी शक्यता वाटत नव्हती.

व्यक्तिमत्त्व, वैशिष्ट्य, मीपणा हे सर्व माझे स्वत:चे खाजगी असे काहीतरी आहे, असा माझा समज होता. फक्त मलाच हे तीन गुण आहेत, इतरांना नाहीत, हा माझा ग्रह कधीच नव्हता. उलट प्रत्येक व्यक्तीला ते आहेत.

अगदी साधारण व्यक्तीतसुद्धा असाधारण वैशिष्ट्यांचा मीपणा आहे, असा माझा आग्रह आहे. माझी जी चूक होती, ती हे वैशिष्ट्य काहीतरी सर्वस्वी खाजगी आहे, असे वाटण्याची. मीपणा- इतरांपासूनचे आपले असे निराळे अस्तित्व -ह्याची जाणीवच मुळी इतरांबरोबरच्या व्यवहारातून होते. आपल्याबद्दलचे स्वत:चे असे जे चित्र असते, ते इतरांच्या आपल्याबद्दल ज्या आकांक्षा असतात, इतरांशी आपला जो संबंध येतो, त्यांतून उत्पन्न झालेले असते. अनामातून, निराकारातून आपण जन्माला आलेले असतो. जन्माला येतानाच आपल्याला आकार मिळतो. थोड्याच दिवसांत नाव मिळते आणि जन्मभर त्या नावाच्या त्या आकृतीत अनुभवांची भरती होत-होत व्यक्तिमत्त्व जमत राहते. "उपजलिया बाळकासी। नाव नाही तयापासी। ठेविलेनि नावेंसीं। ओ देत उठी॥"... नाव ठेविले, तरी ते नाव आपले आहे, हे कळायला वेळ लागतोच. ते नाव व ती आकृती मिळून एक 'मी' ची जाणीव होते. मग असंख्य देवाण-घेवाणींतून त्या 'मी' ला विशिष्ट आकार येत राहतो. भोवतालचे वस्तुमय जग सारखे अपेक्षा निर्मीत असते. त्यांतील काही, आपली आळी, आपले घर, आपले गाव अशा तऱ्हेच्या ममत्वाने 'मी' चे भाग बनून जातात. आपण कोणाचे तरी मूल असतो, कोणाचेतरी भावंड असतो; कोणाचीतरी बायको, आई, काकू, मैत्रीण, शत्रू असतो; गुरू, मालक, नोकर असतो. प्रत्येक संबंधात आपण कुणाच्यातरी अपेक्षेप्रमाणे वागत असतो व कोणाकडून कशाची तरी अपेक्षा करीत असतो. प्रत्यक्ष परस्पर-संबंधातून अप्रत्यक्ष दूरवर पसरलेले संबंध निर्माण होतात. परस्पर-अपेक्षेतून मूल्ये निर्माण होतात. उतारवयात व्यक्तिमत्त्व, मीपणा कमी होत जातो. प्रत्यक्ष संबंध संकोचतात. म्हाताऱ्या माणसाने आयुष्याच्या वाटचालीकडे दृष्टिक्षेप केला, तर असे आढळते की, ह्या वाटेवरचा एक एक मैलाचा दगड म्हणजे एक हरवलेली व्यक्ती, एकेक हरवलेला संबंध असतो. आई-वडील, भावंडे, सासू-सासरे, दीर-जाऊ जे-जे म्हणून गेलेले असते, त्यांच्या संबंधाची स्मृती, छाया राहते; पण प्रत्यक्ष संबंधाचा उत्कटपणा नाहीसा झालेला असतो. 'ही माणसे जिवंत असताना आपल्या हातून असे झाले नसते, तर बरे झाले असते,'.... 'असे झाले असते तर...' अशी खंत वाटून एक प्रकारच्या विषण्णतेने आत्मा झाकळून जातो. शेवटी शेवटी तर दुःखाची वा अपराधाची जाणीवही नाहीशी होते. आपल्या आत्म्याचे दुःखही नाहीसे व्हावे, स्मृतीची तीव्रताही जावी, म्हणजे व्यक्तिमत्त्वाचाच लोप नाही का? व्यक्तिमत्त्वाचा विकास जसा परस्पर-

संबंधाने दोन अंगांनी होतो, तसा लोपही दोन अंगांनी होत असतो. ज्यांमुळे स्वत्वाची जाणीव झाली, त्यांना आतून आत्मा विसरत असतो. बाहेरून इतर लोक त्या व्यक्तीला विसरत असतात. एखादी महान व्यक्तीसुद्धा एक पुसट आठवण म्हणून राहते. माझ्या मामंजींना 'भारतरत्न' ही पदवी मिळाली, त्याचे दिल्लीहून मुंबईला पत्र आले व 'मालक सापडत नाही,' ह्या शेऱ्यानिशी परत गेले. हा प्रसंग मी विसरूच शकत नाही. शाळेतल्या पुस्तकांतून ज्याच्याबद्दल धडा येतो, असा हा गृहस्थ जिवंतपणी बऱ्याच जणांना फक्त नाममात्रच झाला होता,- तोसुद्धा मुंबईत! त्यांनी तरुणपणी विधवाविवाह केला; त्यांच्याबद्दल पुणे-मुंबईच्या वर्तमानपत्रांनी उलट-सुलट टीका केली; गावाने त्यांना वाळीत टाकिले. त्या वेळी त्यांचे व्यक्तिमत्त्व उत्कट होते. ते कोणाचेतरी, कशाचेतरी विरोधक होते. ते कोणत्यातरी व्यवहाराचे हिरीरीने मंडन करीत होते. शेवटी ते जगाला विसरले होते; जग त्यांना विसरले होते. ह्याच अर्थाने व्यक्तिमत्त्वाचा लोप होतो, असे मी म्हटले. प्रेम आणि राग, मैत्री आणि विरोध, आपुलकी आणि दुरावा-अगदी त्रयस्थपणासुद्धा- अशा अनेक व्यवहारांतूनच माझा अमुकपणा निर्माण होतो. निरनिराळ्या व्यक्तींना मी निरनिराळी असते, माझी भूमिकाही प्रत्येकाशी निरनिराळी असते. वयाप्रमाणे हा व्यवहार कमी होतो. जी अगदी जवळची असतात, ती मेलेली तरी असतात किंवा दूर तरी गेलेली असतात. कृतीमागील व विचारामागील तारुण्यातील उत्कटता नाहीशी होऊन फक्त आचाराच्या व विचाराच्या सवयी तेवढ्या राहिलेल्या असतात. संध्येच्या दाट छाया सबंध दिवसभर पडलेल्या असतात. सर्वस्वी नाहीसे होण्याच्या काळोखात जाण्याची वेळ आलेली असते, आणि अगदी ह्याचमुळे आत्मनिवेदनाची उबळ येते.

'खुणेचा मार्ग' मागे ठेवून पुढच्या पिढीला वाट दाखवावयाची ह्या विचारामागेसुद्धा बऱ्याच अंशी वरील भावना असते. स्वत:ची 'खूण' ठेवायची धडपड असते. सर्व 'अमुकपणा', सर्व 'मीपणा' नाहीसा होणार, अजिबात जाणार हे कळते, आणि जन्मभर ज्याने सोबत केली तो मीपणा टिकावा, ज्यांच्यामुळे हे व्यक्तिमत्त्व मिळाले त्यांच्या स्मृतींत काही दिवस घर करून रहावे, म्हणून धडपड चालते. कोणी बोलत राहतात, कोणी फोटो काढतात, कोणी आपली बडबड कागदावर उतरवितात. ''मी अमुक-अमुक आहे,- इथेच आहे,- अगदी तुमच्यातच आहे,'' असा तो आक्रोश असतो.

१९६८

बारा :

# किंकाळी

चित्राचं नाव काय असावं, नक्की आठवत नाही. बहुधा 'द क्राय!'- 'किंकाळी'- असावंसं वाटतं. चित्रकाराचंही नाव आठवत नाही. आठवतं ते फक्त चित्र आणि दरवेळी आठवलं म्हणजे भीतीनं अंग शहारतं. चित्र अगदी साधं- फक्त काळंपांढरं. एक बाई, तीही अगदी साधी. अतिरेखीव नाही, विकृत तर नाहीच नाही. तिनं किंकाळी मारताना तोंड उघडलं आहे, एवढंच चित्र. पण पहिल्या क्षणापासून आतापर्यंत चित्र डोळ्यांपुढं आलं की, ती किंकाळी ऐकू येते. तो एकाकी असहायपणा, सगळं संपलं, अशी अगतिक जाणीव चित्र पाहताना जी झाली, ती आजही होत आहे.

आणखी एक किंकाळी सारखी आठवते,- मनात घर करून राहिली आहे- ती म्हणजे काम्यूच्या 'फॉल' नावाच्या कादंबरीतील. ह्या कादंबरीतील सबंध कथानक एका किंकाळीभोवती गुंफिलेले आहे. ह्या कादंबरीचा नायक एक तरुण, हुशार माणूस आहे. गरीबगुरीब माणसांचे खटले कोर्टात चालवून, त्यांना न्याय मिळवून देणारा म्हणून त्यानं प्रसिद्धी मिळविली होती. गरिबांचा कनवाळू म्हणून त्याचा सगळीकडे बोलबाला झाला होता. त्याची ही कीर्ती चढत्या कमानीत होती. म्हाताऱ्या-कोताऱ्यांना तो मोठ्या आस्थेनं रस्ता ओलांडायला मदत करी. तोही आपल्याला हुशार, लोकांत मानमान्यता पावलेला समजत असे. रस्त्यातून जाताना, किंवा विशेषतः कोर्टाच्या आवारात, त्याला पाहिल्याबरोबर खाली वाकून नमस्कार करणारे, त्याला दुवा देणारे, 'हा पहा तो अमका अमका,' म्हणून त्याच्याकडे बोट दाखविणारे लोक खूपच होते. तो स्वतःही

एकंदरीने स्वत:च्या कर्तबगारीवर, समाजानं त्याचं हे जे चित्र त्याच्या डोळ्यांपुढं उभं केलं होतं, त्यावर खूष होता.

एक दिवस संध्याकाळच्या वेळी सेन नदीवरील एक पूल तो ओलांडीत होता. रस्ता जवळ-जवळ निर्मनुष्य होता. अशा कातर वेळी अर्धवट अंधारात एक बाई पुलाच्या मध्यभागी कठड्याला टेकून नदीकडे पाहत उभी राहिलेली त्याला दिसली. अशा वेळेला ती बाई का उभी असावी, असा विचार त्याच्या मनाला चाटून गेला. बाईची उभी राहण्याची तऱ्हा, काय ओझरतं तोंड त्याला दिसलं ते, यांवरून बाई दु:खीकष्टी असावी, असं वाटत होतं. तिच्या मनात काही भयंकर विचार तर नसेल ना, आपण तिची विचारपूस करावी का, असंही ओझरतं त्याच्या मनात येऊन गेलं. पण आपल्याला काय करायचं, म्हणून तो तसाच पुढे गेला. पुलाच्या दुसऱ्या टोकाला पोहोचतो, तो त्याला पुलावरूनच एक आर्त किंकाळी ऐकू आली. मागे वळून पाहतो, तो त्या मघाच्या बाईनं कठड्यावरून नदीत उडी घेतली, असं त्याला दिसलं. धावत जाऊन आरडाओरडा करून लोक जमवावे, पोलिसांपर्यंत बातमी पोहोचवावी, शक्य-तो आपणच उडी मारून तिला काढण्याचा प्रयत्न करावा, असंही त्याच्या मनात आलं. पण परत 'जाऊ दे, तिला मरायचं होतं, पाणी पण फार गार असेल,' असं म्हणून तो पुढे सटकला.

तो पुढे गेला. संध्याकाळी त्याला एका बाईकडे जायचं होतं, तिच्याकडे तो गेला. पण ती हताश बाई व तिची शेवटची किंकाळी त्याला काही विसरता येईना. तिच्या स्थितीची कल्पना आली असूनही तिला तीतून बाहेर काढण्यासाठी आपण काहीही प्रयत्न केला नाही, ही जाणीव त्याला चैन पडू देईना. आपल्या मनातच गरिबांचा कनवाळू असं आपलं जे चित्र त्यानं रंगविलं होतं.त्याच्या पार चिंधड्या झाल्या. त्या किंकाळीची आठवण बुजविण्यासाठी त्यानं आपल्या स्वत:ला दारूत बुडविलं, बायकांच्या उपभोगात स्वत:ला विसरण्याचा प्रयत्न केला. जगप्रवास केला. कशानंही ती किंकाळी त्याचा पिच्छा सोडीना, शेवटी एक दिवस तो पॅरिसमधून नाहीसा होऊन, जिथं त्याला कोणी ओळखीचं नव्हतं, अशा हॉलंडमधल्या एका गावी जाऊन तो राहिला. सदैव धुक्यात बुडालेल्या, सदैव एक प्रकारच्या विचित्र थंडीनं भरून राहिलेल्या ह्या गावाचं वातावरण सर्वस्वी पॅरिसच्या विरुद्ध होतं. जणू त्याच्या अंतर्मनाचं प्रतिबिंबच असं कंटाळवाणं, क्षुद्र,

एकाकी जीवन तो जगत होता. तरीही ती किंकाळी सदैव त्याच्या सोबतीला होती. पुस्तकाच्या शेवटी नायक म्हणतो 'एकदा तो क्षण परत माझ्या आयुष्यात यावा.'' त्याला असं वाटतं की, 'मी योग्य तऱ्हेनं वागेन.' पण लगेच दुसऱ्या क्षणाला तो म्हणतो, ''काय उपयोग? तो क्षण परत आला, तर मी तसंच वागणार नाही कशावरून?''

ती चित्रात पाहिलेली किंकाळी आणि ही वाचलेली किंकाळी सारखी अधूनमधून आठवते.

तिसरी किंकाळी ही माझ्या आयुष्यात घडलेली एक घटना. ती काही एकच किंकाळी नव्हती. एकामागून एक दिलेल्या बऱ्याच किंकाळ्या होत्या. पण त्या सर्व आज माझ्या कानांत आणि जाणिवेत एकाच किंकाळीसारख्या आहेत. ह्या स्वत: ऐकिलेल्या किंकाळ्या आजही मनात घोळतात.

मी पुण्याहून मुंबईला चालले होते. बायकांच्या थर्ड क्लासच्या डब्यात मला खिडकीशेजारी जागा मिळाली. माझ्या नेहमीच्या सवयीप्रमाणे मी बाकावर बसल्या बसल्या, डब्यात इतर कोण आहे ते बघत होते. गाडी भांबुर्ड्याला (म्हणजे हल्लीचं शिवाजीनगर) थांबली. एक तरुण बाई मुलाला खांद्यावर टाकून डब्यात शिरली व माझ्याविरुद्ध बाजूला प्लॅटफॉर्मशेजारी खिडकीशीच बसली. बाईच्या अंगावर कोरं-करकरीत लुगडं होतं. मुलाच्या अंगावरचे कपडेही, टोपडं, झबलं वगैरे नवे, कोरे-करकरीत होते. बाईला पोहोचवायला मध्यम वयाची दोन माणसं आली होती,-एक बाई व एक पुरुष. त्या सर्वांना पाहताना माझ्या मनात आलं, पहिलटकरीण बाळाला घेऊन सासरी निघालेली दिसते आहे. पोहोचवायला आलेले आईबाप दिसताहेत. अशा प्रसंगी नेहमी कितीतरी बोलणी होतात. पण ह्या वेळी मात्र कोणी कुणाशी बोलत नव्हतं. बाळ घेतलेली पोर गप्पच होती. बाहेरचं वयस्क जोडपंही बोलत नव्हतं. गाडी सुटली. त्यांनी मानेनंच मुलीचा निरोप घेतलां मुलीनं बाकावर मांडी घातली आणि मुलाला मांडीवर ठेविलं. हा सर्व वेळ मूल झोपेतच होतं, असं दिसलं.

गाडी चालू झाली. मी खिडकीबाहेर बघू लागले. डब्यात फारशी गर्दी नव्हतीच. त्यामुळं फारसं बोलणं-चालणंही नव्हतं. सगळं जरा शांतच होतं. असा अर्धा-एक तास गेला असेल. मलाही किंचित डुलकी लागली होती. एवढ्यात एकदम एका किंकाळीनं मी खडबडून जागी झाले. पाठोपाठ दुसरी किंकाळी ऐकू आली. चाललंय काय, म्हणून मी इकडेतिकडे पाहिलं.

डब्यात पेंगलेल्या इतर बायकाही माझ्याप्रमाणं चकित होऊन इकडेतिकडे बघत होत्या. किंकाळी कुठून आली कळलं नाही. एवढ्यात एक स्टेशनही येऊन गेलं. मला वाटलं, बाहेरच्या स्टेशनवरचीच एखादी किंकाळी ऐकू आलेली आहे. पण चालत्या गाडीत आणखी पाच-दहा मिनिटांनी परत तशीच किंकाळी ऐकू आली. ती माझ्या डब्यातून ऐकू येत होती. दुसरी किंकाळी ऐकू आली. मी उठून पाहिलं. त्या मघाशी पाहिलेल्या तरूण मुलीच्या मांडीवरील मूल किंकाळ्या फोडीत होतं. मला पहिल्यानं वाटलं त्यापेक्षा मूल बरंच मोठं होतं. सहा महिन्यांचं असेल. बाई आली तेव्हा जशी स्तब्ध बसली होती, तशीच बसली होती. मांडीवर मूल होतं. मुलाचे डोळे मिटलेले होते. मुठी वळलेल्या होत्या. किंकाळीनं तोंड वेडंवाकडं झालं होतं. पाहता-पाहता मुलाच्या मुठी सुटल्या. तोंड परत नीट सरळ झालं. बाईच्या तोंडावर कसलाच भाव नव्हता. बाकीच्या बायका 'काय झालं? काय झालं?' असं विचारीत होत्या. 'करतं असंच अधूनमधून,' असं तुटक उत्तर देऊन ती बाई स्वस्थ बसली.

थोडा वेळ तिच्याभोवती उभं राहून जो-तो आपापल्या बाकावर बसला. मीही आपल्या बाकावर बसले. मुलाला काहीतरी मोठा आजार झाला होता, यात शंकाच नव्हती. काय झालं होतं, मला कळत नव्हतं. काही मदतही करिता येत नव्हती. मी स्वस्थ बसून राहिले. एवढ्यात आणखी एक किंकाळी ऐकू आली. पाहिलं तो बाई होती त्याच स्थितीत; तशीच पुतळ्याप्रमाणे नि:स्तब्ध. पण मला काही राहवेना. सबंध आगगाडीत खासच एखादा तरी डॉक्टर भेटेल, त्याला बोलावून मुलावर काही उपचार होतात का हे बघता येईल, असा विचार माझ्या मनात आला. मी उठले. एकामागून एक गाडीचे डबे शोधीत निघाले. शेवटी एका डब्यात डॉक्टर आढळला. त्याला घेऊन परत आले. त्या डॉक्टरबरोबर आगगाडीतला तिकीटतपासनीसही आमच्याबरोबर आला. आम्ही बायांच्या डब्यात शिरलो, तो लागोपाठ दोन किंकाळ्या ऐकू आल्या. आम्ही धावतच ती बाई होती तिथं पोहोचलो. आम्ही मुलाशी पोहोचेपर्यंत किंकाळ्या थांबल्या होत्या. डॉक्टरनं मुलाकडे पाहिलं व छातीला स्टेथॅस्कोप लावला. मूल मेलं होतं.कसलाच उपचार करण्याची शक्यता नव्हती.

काही करता येणं शक्य नाही, म्हणून डॉक्टर परत गेला. तिकीट चेकर बाईजवळ उभा राहिला. त्यानं विचारलं, 'तुम्हांला कुठं जायचं आहे?'' बाई

म्हणाली, “माझं तिकीट कुर्ल्याचं आहे. माझ्या नवऱ्याला स्टेशनवर यायला सांगितलं आहे.” तिकीट चेकर म्हणाला, “असं मेलेलं माणूस घेऊन तुम्हांला जाता येणार नाही. आता येईल त्या स्टेशनवर म्हणजे कल्याणवर तुम्हांला उतरून देणार.” हा सगळा प्रकार पाहून मी रदबदली केली. म्हटलं, “कल्याणपासून कुर्ला किती दूर? जाईना का बिचारी गेली तर!” पण तिकीट चेकर ऐकेना. त्या बाईला तिच्या मेलेल्या मुलासकट त्यानं कल्याणला उतरविलं. बाई एक शब्द बोलली नाही. तिनं कोणाकडे पाहिलं नाही. मुकाट्यानं मुलाला खांद्यावर टाकून ती कल्याणला उतरली.

ती उतरून गेली, आणि माझं विचारचक्र सुरू झालं. भांबुर्ड्याच्या स्टेशनावर ही माणसं गुपचूप का होती, त्याचं कारण आता मला कळलंसं वाटलं. ही पहिलटकरीण तरी होती का? पण तिचं मूल खासच आगगाडीत बसल्यावर आजारी झालं नव्हतं. त्याचा आजार काही दिवसांचा असणार. ते आजारी पडून आता वाचत नाही, असं कळल्यावर त्या लोकांनी तिला व त्याला नवे कपडे घालून त्यांची घाईघाईनं बोळवण केलेली होती. नवऱ्याशी पोहोचेपर्यंत मूल कदाचित जिवंत राहील, अशीही कल्पना असावी. माहेरच्या माणसांनी का सासूसासऱ्यांनी मरायला टेकलेलं मूल मांडीवर देऊन त्याला नव्या कपड्यांनी शृंगारून तिची पाठवणी केली होती. ह्या मुलाला घेऊन काही तासांत ती नवऱ्याकडे पोहोचणार होती. ह्या भयंकर प्रसंगाला तोंड देऊन ती पोरगी बसलेली होती. माझ्या नसत्या उठाठेवीनं तिला मदत तर झाली नाहीच, पण एका भलत्याच स्टेशनावर उतरविल्यामुळं तिच्यापुढे एक नवीनच संकट उभं झालं, हे मला स्पष्ट दिसून आलं. मला मुंबईला बडा रेल्वे-अधिकारी घ्यायला येणार होता. मी सर्व हकीकत त्याला सांगून त्या बाईला कुर्ल्याच्या स्टेशनवर पोहोचवायचीही व्यवस्था केली. पण हे सगळं व्हायला दोनचार तास सहज निघून गेले. आमचा निरोप जाईपर्यंत ती बाई मुलाला घेऊन कल्याण स्टेशनातच बसली होती. असं मला समजलं.

० ०

ह्या गोष्टीला कित्येक वर्षे लोटली. अजून मला त्या पोराची किंकाळी ऐकू येतेसं वाटतं आणि परत परत मनात येतं की, ‘मी माझ्या वेड्या कीव येण्यामुळं त्या बाईला व्यर्थ दुःखात टाकलं.’ ही कीव त्या बाईबद्दल होती, का मला त्या किंकाळ्या ऐकवत नव्हत्या म्हणून स्वतःबद्दल होती, हे समजत

नाही. परतपरत वाटतं, असा प्रसंग परत आला, तर मी काय करावं?

माझ्या मते मी लेख संपविला, पण माझा खट्याळ सांगाती मला स्वस्थ बसू देईना. त्याचे कधी न मिटणारे डोळे माझ्याकडे लागले होते. तो बोलत नाही, पण तो असा पाहू लागला की, माझं विचारचक्र परत सुरू होतं. कोणीतरी विचारीत आहेसं वाटतं.

''तुला असं वाटतं का की, तू स्वस्थ बसली असतीस, तर स्वत:ला दोष दिला नसतास?''

माझे मीच उत्तर दिलं, ''छे! मी गप्प बसले असते, तर उगाच गप्प बसले, डॉक्टर शोधून आणला असता तर मूल मेलं नसतं, असं वाटून हळहळत बसले असते.''

''हं!''

माझं मीच उद्वेगानं विचारलं, ''म्हणजे मनुष्याच्या हातून योग्य कृती होण्याची कधीच शक्यता नाही का?''

''माहीत असून वेडे प्रश्न का उभे करतेस?''

''मूल किंकाळ्या मारतं आहे, त्याचे हातपाय आखडत आहेत. तोंड वेडंवाकडं होत आहे, ते खूपखूप आजारी आहे, एवढंच मला समजलं होतं. ते पोरगं वाचणं शक्य नाही, हे मला माहीत नव्हतं. मला नाही, पण डॉक्टराला समजेल, तो काही तात्पुरता उपाय करू शकेल असं मला वाटलं, म्हणून मी गेले-''

''बरं मग?''

''मी गेले नसते व मूल मेलं असतं, तर मला शक्य असून मी मदत मिळवायची धडपड केली नाही, म्हणून जन्मभर मनाला बोचणी राहिली असती.''

''हं!''

''माझ्या लुडबुडीनं त्या बाईला काडीचीही मदत झाली नाही, उलट त्रास मात्र झाला, हे मागाहून झालेलं ज्ञान!''

मी पुढे म्हटलं, ''तो काम्यूचा नायक 'मदतीला गेलो नाही,' म्हणून हळहळत होता, व मी गेले म्हणून हळहळते आहे!''

परत आपलं नुसतं ''हं!''

परत विचार करून मी म्हटलं, ''हा जो प्रकार झाला, ते ह्या अपूर्ण जीवदशेतील मनुष्यव्यवहाराचं सर्वसाधारण वर्णन, असं म्हणता येईल.''

"हं!"

"म्हणजे काहीही कृती केली, अगदी समजून-उमजून, विचारानं केली, तरी ती योग्य होईलच, असं नाही. कधी बरोबर झाली. तरी तीमध्ये थोडीबहुत चूक राहणारच."

"हं."

मी त्रासून विचारलं, "मग काहीच कृती करू नये, असंच ना?"

उत्तर नाही.

माझं मलाच उत्तर शोधलं पाहिजे.

"जिवंत आहे, तोवर कृती व विचार होतच रहाणार. दोन्ही आपल्याशी इमान राखून करायच्या. अपूर्णत्वामुळं काय चुकेल, त्याचं फळ भोगायला व हळहळ करायला सबंध आयुष्य आहेच की!"

उत्तर नव्हतं; पण मागचा ससेमिरा थांबला होता.

१९६९

तेरा :

# उकल

कधीतरी काहीतरी कोडं पडलेलं असतं. तेही इतक्या मागं की, आपल्याला एखादी गोष्ट कळली नाही ही गोष्टसुद्धा मन-जागृत मन- विसरलेलं असतं आणि एकदम एखादे दिवशी अगदी भलत्याच संदर्भात जुन्या आठवणी जाग्या होतात, मनाला डिवचतात व पुन्हा विचार करायला लावतात. जुनी कोडी उलगडतात, कधीकधी पूर्णपणे, कधीकधी नवी कोडी मनापुढे उभी करून.

ज्ञानदेवीच्या अठराव्या अध्यायाची सुरुवात म्हणजे शब्दांची कसरत आहे. प्रत्येक शब्द समास आहे. त्या समासातील शब्दांचे अर्थ समजून सबंध समास कळायचा, म्हणजे मन एकाग्र करून वाचावं लागतं. माझ्या समजुतीपमाणे सर्व चित्त देऊन मी वाचीत होते. पण माझ्या मनाचा काही भाग मला नकळत भटक्या मारीत असला पाहिजे. डोळे वाचीत होते. ''जन्मजराजलदजालप्रभंजन.'' मन एकदम म्हणालं, ''मदन-एडका मदन.'' मदन हा शब्द 'प्रभंजन'सारखाच आहे. प्रभंजन-भंग करणारा; तसेच, 'मदन' म्हणजे 'मद आणणारा, मदास असणारा, म्हणजेच मद आलेला. 'एडका मदन'' म्हणजे 'मद आलेला एडका.' अठरावा अध्याय राहिला बाजूला आणि जणू आता घडत आहे अशा प्रकारे पन्नास वर्षांपूर्वीच्या आठवणी जागृत झाल्या. आजीच्या बरोबर मी रत्नागिरीच्या विठोबा-मंदिरात होते. सभामंडपात भजन रंगात आलं होतं. सोनार मंडळींची दिंडी होती म्हणे. एकजण गळ्यात पखवाज अडकवून वाजवीत होता. इतरांच्या गळ्यात झांजा होत्या. सर्वजण अगदी रंगात येऊन भजन म्हणत होते व नाचत होते -

''एडका मदन-मदन-मदन, तो केवळ पंचानन, केवळ पंचानन! एडका मदन.'' मला सबंध भजन ऐकायचं होतं. पण आजीला घरी जायची घाई होती आणि मला तिच्या बरोबर जावंच लागलं. माझे कान मागे लागले होते; पुढची ओळ काय आहे, हे ऐकण्याची उत्सुकता होती; पण आम्ही लांब जाईपर्यंत, 'एडका मदन' व 'पंचानन' एवढीच अक्षरं ऐकू येत होती. एडका, रतिपती मदन आणि पंचानन ह्यांचा संबंध काय असावा, मला मोठ्ठं कोडं पडलं होतं. ''पंचानन म्हणजे काय ग?'' ''वाघ.'' एवढंच उत्तर भराभर चालणाऱ्या आजीनं दिलं होतं. त्यानं काही कळलं तर नाहीच, पण मन आणखी गोंधळात पडलं.

ज्ञानदेवीचा अठरावा अध्याय मी काही आजच वाचीत नव्हते. धातूला 'अन' लागून होणारी असंख्य नामंही माझ्या चांगली माहितीची होती. पण आजच का कोण जाणे 'प्रभंजन' शब्द वाचला आणि पूर्वी ऐकिलेल्या त्या 'मदन' शब्दाचा अर्थ कळला असं वाटलं. ओळीचा अर्थ लावला. 'एडका मदन' म्हणजे 'माजलेला एडका'; 'तो केवळ पंचानन' म्हणजे कळला, ''नुसता वाघ आहे.'' तेवढ्यापुरतं जुनं कोडं उलगडल्यासारखं वाटलं. पण मनाचं समाधान होत नव्हतं. 'मदन' म्हणजे 'माजविणारा, माजलेला' असा अर्थ करिता येईल. पण ह्या ठिकाणी बसतो का, असा नवा प्रश्न पडला आणि 'एडका मदन तो केवळ पंचानन' ह्या ओळीचा विठोबाशी संबंध काय? ह्या ओळी लिहिणारा तरी कोण? मला वाटलं, नक्की तुकारामबुवांच्या गाथेत ह्या ओळी सापडतील. सर्व गाथा धुंडाळली; पण व्यर्थ. डेक्कन कॉलेजातल्या एका प्रोफेसरांना विचारलं; ''नक्की ठाऊक नाही, पण एकनाथांच्या असाव्यात.''

एकनाथ म्हणजे समुद्र. त्यात ह्या ओळी शोधायच्या कुठं? ज्या अर्थी एका लहान गावातली भजनी मंडळी त्या म्हणत होती, त्या अर्थी पांगारकरांच्या किंवा अशाच एखाद्या भजनी गाथेत सापडावी. 'सकलसंतगाथा' नावाच्या बारीक टाइपातला एक अवाढव्य ग्रंथ लायब्ररीत मिळाला. त्यात एकनाथ पाहिला. तो 'एडका' ह्या नावाखाली एक पाच-सहा ओळींचं रूपक सापडलं. आणि कळलं की, माझा अर्थ अगदीच चुकीचा होता. त्या ओळीत 'मदन' म्हणजे 'माज आणणारा मदन' म्हणजे 'रतिपती' अर्थात 'कामदेव' हाच अर्थ अपेक्षित आहे. कुत्रा, गाय, वगैरे

रूपकं आहेत. तसंच हे एक. मदन म्हणजे एडकाच, व तो इतका मस्त की, तो वाघाप्रमाणे सामर्थ्यवान. सबंध रूपकच देते. नाही तर दुसऱ्या कोणा मनाला माझ्याप्रमाणे कोडं पडायचं.

एडका मदन तो केवळ पंचानन॥ध्रु॥
धडक मारिली शंकरा। केला ब्रह्मयाचा मातेरा।
इन्द्रचन्द्रासी भेदरा। लाविला ज्यानं
तो केवळ ॥ध्रु.॥
धडक मारिली नारदा। केला रावणाचा चेंदा
दुर्योधना मारिली गदा। घेतला प्राण।
तो केवळ ॥ध्रु.॥
भस्मासुर मुकला प्राणांसी। तेचि गती झाली वालीसी
विश्वामित्रासारिखा ऋषी। नाडिला ज्यानं
तो केवळ ॥ध्रु.॥
शुकदेवानें ध्यान धरूनी। एडका आणिला आकळोनी
एका जनार्दनाचे चरणी। बांधिला जेणें।
तो केवळ पंचानन॥

मदनरूपी एडक्यानं सर्वांना लोळविलं. फक्त शुकानं त्याच्यावर मात केली. म्हणून शेवटच्या ओळीतलं 'पंचानन' हे विशेषण एडक्याला लागू नसून शुकाचं समजण्यास हरकत नसावी. आता ह्या ओळीशी विठोबाचा संबंध काय, हा दुसरा प्रश्न. त्याचं उत्तर माझ्या हातातच होतं. 'सकलसंतगाथे'त संतांची कविता होती,- मुख्यत: वैष्णव वारकरी संतांची कविता होती. ह्या कवींच्या तोडून जे- जे बाहेर पडलं, ते- ते सर्व थेट विठोबाशी रुजू होतं, हा वारकऱ्यांचा दृढ विश्वास. शब्द काहीही असोत, 'हरि मुखे म्हणा' असोत, 'चंदनाची चोळी, माझे अंग अंग पोळी' असोत, 'विटंबिती रांडापोरें' असोत, 'नाम घेतां उठाउठी, होय संसाराची तुटी' असोत, वा 'एडका मदन' असोत, सर्व काही सारख्या प्रमाणात विठोबाच्या चरणी रुजू होतं. दोन्ही प्रश्न एकदम सुटले.

ह्या एडक्याच्या आधीही आईनं मला एका कोड्यात टाकिलं होतं. आम्ही त्या वेळी ब्रह्मदेशात होतो. वडील दर दोन वर्षांनी काहीतरी

कामानिमित्त हिंदुस्थानात यायचे. परत जाताना तिकडे न मिळणाऱ्या कितीतरी गोष्टी मुंबईहून व कलकत्त्याहून आणायचे. मुख्य जिन्नस असत नव्या गाण्यांच्या तबकड्या. ते आले म्हणजे आम्ही दिवसभर त्या तबकड्या लावून गाणी तोंडपाठ करीत असू; आणि मग दिवसभर आम्ही ती गाणी म्हणत असू.' नका टाकून जाउं, डावा डोळा पाण्याने माझा भरला' हे गाणं मी घोळून-घोळून म्हणत होते. आईनं देवघरातून दरडाविलं, ''माई, ते गाणं म्हणायचं नाही.'' मी 'बरं' म्हटलं व थांबले. थोड्या वेळानं आई बाहेर आली व तिनं एक धपाटा लगावला. ''सांगितलं होतं ना ते गाणं म्हणायचं नाही!'' तेव्हा कुठं माझ्या लक्षात आलं की, मी पाटीवरील बेरीज वजाबाक्या करिता-करिता अगदी अनवधानानं परत तेच मना केलेलं गाणं म्हणत होते म्हणून. मोठ्या प्रयत्नानं मी ते गाणं मनातून काढून टाकिलं. पण एक प्रश्न उरला होता, 'ते गाणं का म्हणायचं नाही?' आईला विचारावं, तर ती रागावलेली. प्रश्न तसाच राहिला व पुढं मी विसरूनही गेले. नंतर कितीतरी वर्षांनी मी पुण्यातच दुपारची बसायला म्हणून माहेरी आले होते. रविवार असल्यामुळे सर्व मुलं घरीच होती. गाण्याच्या नव्या-जुन्या सगळ्या तबकड्या लावावयाचा बूट निघाला. मी तिथं गप्पा मारीत बसले होते. गाण्यांकडे विशेष लक्ष नव्हतं, पण एकदम 'नका टाकून जाउं' ही जुनी रेकॉर्ड ऐकू आली. मी ते गाणं जवळजवळ विसरलेच होते. फक्त पहिली ओळ आठवत होती. गप्पा थांबवून मी उत्सुकतेनं पुढं होऊन गाण्याचे शब्द ऐकू लागले. 'नका टाकून जाउं डावा डोळा पाण्यानें माझा भरला।तीन दिवस झाले म्हणूनि तंटा हो माझ्याशीं केला' वगैरे वगैरे शब्द. सगळ्या शब्दांचे अर्थही लक्षात आले; एवढेच नव्हे, तर आईनं गाण्यास मनाई का केली, अनवधानानं गाणं घोकून म्हणत असता धपाटा का मारिला, हेही उलगडलं. गाणं जुनं झालं होतं. मुलांच्या तोंडी राहिलं नव्हतं. बऱ्याच जणांना जुनंपण नवीन वाटलं. माझ्या लेकीनं मला हलवून विचारिलं, ''म्हणजे काय ग?'' ''अग, काय विचारिते आहेस?'' मी आपल्या तंद्रीतून जागी होऊन विचारिलं. ''तीन दिवस झाले म्हणुनी तंटा हो माझ्याशी केला' म्हणजे काय ग? आणि डावाच डोळा एकटा कसा ग पाण्यानं भरतो?'' तिनं मला कोड्यात टाकलं होतं. ''डावाच डोळा पाण्यानं कसा भरतो, हे मला नाही बाई समजत.'' मी प्रांजळ कबुली दिली. पण तिचा पहिला प्रश्न कायमच होता. ''अग, ती बाई तीन दिवस विटाळशी म्हणून त्याला भेटायला गेली

नाही, बाजूला बसली होती जुन्या लुगड्यात, तर तो तू का आली नाहीस म्हणून भांडायला लागला.'' तिनं नीट ऐकिलं. ''असं होय? बावळट होता म्हणायचा!'' ती म्हणाली. जुनं कोडं उलगडलं. नव्या कोड्यातून सुटका झाली.

लहानपणी पडलेली बरीचशी कोडी शिक्षणाच्या कोतेपणामुळे पडलेली असतात. पुरेसा अनुभव नसतो, शब्दांचे अर्थ माहीत नसतात, म्हणून मन घोटाळ्यात पडतं. पण गुंता उत्पन्न होण्यास हेच कारण आहे, असं नव्हे. अगदी मोठेपणी अनुभवाची व ज्ञानाची पुरेशी सामग्री असूनही मन नसत्या घोटाळ्यात पडतं, ते केवळ पूर्वानुभवामुळं म्हणजेच पूर्वाग्रहामुळं. वाचता-वाचता काही-काही मुद्दे लक्षात येऊन पुढचं वाचन मग त्या पहिल्या अनुभूतीच्या चौकटीतून जाऊ लागतं. वाचताना लागणारा मनाचा निर्लेपपणा नकळत नाहीसा झालेला असतो व मग माणूस नसत्या घोटाळ्यात पडतं. उद्योगपर्वातील कर्ण-कुंती-संवाद मी एकदा वाचीत होते. कुंती कर्णाला सांगते. ''बाबा, तू राधेय नाहीस, कौंतेय आहेस. तुझा बाप सूर्य व आई मी,- आता तू आपल्या भावांना सामील हो व रामजनार्दनां (बळरामकृष्णां) प्रमाणे तुमची कर्णार्जुनांची जोडी युद्धात शोभू दे.'' ह्या भाषणावर कर्णाचं फार विदारक उत्तर आहे. त्या उत्तरात त्यानं म्हटलं आहे, ''हा तुझा नियोग (नियोगकरणं तव) माझं धर्मद्वार होऊ दे. मी क्षत्रिय म्हणून जन्मलो, पण माझ्यावर क्षत्रियाचा एकही संस्कार झाला नाही. पूर्वी कधी तुला आईचा कळवळा आला नाही. आज जे सांगते आहेस, ते केवळ आप्पलपोटेपणामुळे...'' वगैरे. ''तुझ्या नियोगामुळे मला धर्माचं दार मोकळं झालं.'' ह्या वाक्याचा अर्थ लागेना. कुंतीनं कुमारी असताना सूर्याशी संयोग केला, ह्या क्रियेला 'नियोग' हा शब्द का लावावा? 'नियोग' म्हणजे नवरा जिवंत असताना त्याच्या आज्ञेनं वा संमतीनं वा तो मेल्यावर त्याला पुत्र प्राप्त करून देण्यासाठी इतर पुरुषाबरोबर (बहुतेक दिराबरोबर) केलेला जो समागम तो. ह्या व्याख्येत तर कुंती-सूर्य-संयोग बसत नाही. बरं, त्यामुळं धर्माचं दार मोकळं झालं, म्हणजे तरी काय? ह्या घोटाळ्यात मी पडले व तशा अर्थाची टीप माझ्या लेखात देऊन इतरांनाही मी घोटाळ्यात टाकिलं. अंबिका, अंबालिका व कुंती सर्वांनीच नियोगानं पुत्रोत्पती करून घेतली होती. हे माझं पूर्वज्ञान इथं माझ्या आड येत होतं. लीलाबाई अर्जुनवाडकरांचं मन असं पूर्वग्रहानं भरलेलं नव्हतं. त्यांनी 'नियोग' शब्दाचा सरळ अर्थ केला

: 'आज्ञा', 'सांगावा', 'आयुक्ती'. 'तुझा नियोग' म्हणजे 'तुझी आज्ञा', 'तुझं सांगणं' असा अर्थ होतो. 'ह्या तुझ्या सांगण्यामुळे मी कोण, हे उमजलं; आता मी आनंदानं लढाईत मरेन, कारण मी क्षत्रिय असल्यामुळे या क्षत्रियोचित मरणानं मी स्वर्ग साधीन,' असं कर्णाचं म्हणणं सरळ दिसतं. त्यात घोटाळा काही नाही. 'नियोग' हा शब्द व नियुज ह्या धातूची रूपे माझ्याही परिचयाची होती. 'तत्किं कर्मणि घोरे मां नियोजयसि केशव' ही ओळ कितीदा तरी वाचनात आली होती. 'नियोग- 'सांगितलेली आज्ञा' हा अर्थही कित्येक वाक्यांत आलेला होता. पण महाभारताच्या परत-परत केलेल्या वाचनानं व त्यातील राण्यांच्या 'नियोगा'नं माझं मन इतकं व्यग्र झालेलं होतं की, साधा-सरळ अर्थही मला सुचेनासा झाला होता. तो उलगडा एका विद्वान व व्यग्र नसलेल्या लख्ख मनानं केला.

देवळातले शिल्प, धातूच्या मूर्ती, मध्ययुगापासून काढलेली चित्रं ह्यांतल्या बऱ्याचशा कलाकृतींत मनुष्यदेह वस्त्राच्छादित असूनही देहाकृती स्पष्टपणे दर्शविलेली आहे. वस्त्राच्या चुण्या, खांद्यावरून व पोटावरून लपेटलेले वस्त्र यांचा आकारही स्वच्छ दाखवून त्यांच्या आडचे अवयवही स्पष्ट दाखविलेले आहेत. मला वाटायचं, हा एक संकेत आहे म्हणून. वस्त्राचं सौंदर्य व मनुष्यदेहाचं सौंदर्य ही दोन्ही दाखविण्याचा मोह कलाकाराला आवरला नाही व त्यातून वस्त्रही दाखवायचं व त्याच्या मागची देहाची आकृतीही दाखवावयाची, असा संकेत पडला असावा, अशी माझी ठाम समजूत होती. एक दिवस माझा हा भ्रम नाहीसा झाला. ओरिसात जाजपूर रोड स्टेशनवरच्या प्रतीक्षालयात सकाळच्या वेळी मी बसले होते. मी बसलेली खोली सावलीची होती. खिडक्या पश्चिमेकडे होत्या. पुढे पूर्वेला प्लॅटफॉर्म व त्याच बाजूला दार होतं. सूर्याचे किरण दारातून खोलीच्या मध्यापर्यंत आले होते. मी सहप्रवाशांकडे पाहत होते. अधूनमधून प्लॅटफॉर्मवर दृष्टी टाकीत होते; मधून-मधून घड्याळाकडे बघत बसले होते. इतक्यात एक वयस्क विधवा बाई आपल्या नातवाचा हात धरून दाराशी आली. ती आत येण्याच्या आतच तिला दुसरी कोणी मुलं भेटली, व ती त्यांच्याशी बोलत दारातच उभी राहिली. बाई उघड-उघड जुन्या वळणाची होती. तिच्या अंगात चोळीपोलकं काही नव्हतं. त्याचप्रमाणे नेसल्या साडीच्या खाली हल्लीच्या मुली घालतात, तसा परकर नव्हता. तिचं नेसणंपण जुन्या तऱ्हेच्या उडिया बाईचं. पांढऱ्या शुभ्र साडीचा एक एकेरी

वेढा कमरेभोवती होता व बाकीची साडी सर्वांगभर सैल गुंडाळली होती. डोक्यावरून पदर खाली घेऊन परत खांद्यावरून मागं नेऊन पुढे आणला होता. आणि ह्या सर्वांतून मला बाईचं अंग सूर्यप्रकाशाइतकं स्वच्छ दिसत होतं. तिचा अर्धवट उघडा गळा. त्याखाली तिचे सुकलेले लोंबणारे स्तन दिसत होते. मागच्या बाजूनं तिची शरीर-रेषा तर फारच स्पष्ट दिसत होती. मानेपासून पाठ निघाली ते वाकण, कमरेशी मणक्याचं दुसरं वाकण, ढुंगणाचा फुगीर भाग, नंतर तो मांडीला मिळतो तिथली घडी, मांड्या, गुडघ्याच्या वाटीचा फुगवटा व त्या मागचा खोल भाग, खाली पोटरी व तीखाली घोटा व पाऊल. घोटा व पाऊल वस्त्राबाहेर होतं. म्हणून जास्त स्पष्ट दिसत होतं, असं मुळीच नव्हतं. वस्त्रातीलही अंग तितकंच स्पष्ट दिसत होतं. मधून-मधून वस्त्राच्या चुण्या, वस्त्र डोक्यावरून खांद्यावर आलं तिथली गोलाई, बऱ्याच ठिकाणी वस्त्र एकेरी, काही ठिकाणी दुहेरी, पण शरीर पूर्ण झाकील इतकी जाडी कुठंच नव्हती. तिचं काळं अंग, सुरकुतलेलं ढुंगण-अगदी रेष-नरेष दिसत होतं. बाई विनयशील होती. डोक्यापासून पोटऱ्यांपर्यंत वस्त्रात लपेटलेली होती. तिच्या प्रत्यंगांचं प्रदर्शन खट्याळ सूर्यकिरणं करीत होती. सूर्य कलाकार नव्हता म्हणून म्हणा, की सर्वश्रेष्ठ कलाकार होता म्हणून म्हणा, वस्त्राआडच्या तरुण नसलेल्या कृश, काळ्या स्त्रीदेहाचं उघडं पण झाकलेलं दर्शन मला तो घडवीत होता; आणि मला प्रत्यय आला की, आमचे जुने कलावंत कुठच्यातरी संकेताच्या आहारी जाऊन प्रतिमा घडवीत किंवा रंगवीत नव्हते, तर त्यांना जे दिसत होतं, ते थोड्याशा अतिशयोक्तीनं दाखवीत होते. आमचे मध्ययुगीन विणकरपण बारीक, तलम सुती वस्त्रं विणण्यात पटाईत होते. आणि वस्त्रांत गुरफटलेले पण उघडे असे स्त्री-पुरुष तेव्हापासून आजतागायत भारतात वावरत आहेत. मीच डोळे उघडे ठेवून बघत नव्हते.

डोळे व कान उघडे ठेवून बघणं किंवा चित्त देऊन अनुभव घेणं म्हणजे तरी काय? मन निरनिराळ्या गमती करीत असतं. ज्या गोष्टीचा संबंध अगदी वरवर पाहता दिसतो, तिथं तो संबंध उमजून येत नाही. असं एकदा नाही, तर अनेकदा घडतं, आणि मग एक दिवस अकस्मात उजाडतं. एकच गोष्ट उमगते असं नाही, तर आतापर्यंत लक्षात न आलेले धागेदारे व संबंध प्रत्ययाला येतात. पूर्वीच्या अनुभूतीत प्रत्ययाला न आलेल्या गोष्टी नव्या प्रेरणेनं मनात घुसतात. मनाला एवढा धक्का बसतो की, मन अगदी बधिर होऊन जातं.

एकदा जुन्या इंग्रजी पाचवीच्या वर्गात संस्कृताचा धडा चालला होता. पुस्तक होतं भांडारकरांचं दुसरं पुस्तक. पुस्तकात एक वाक्य भाषांतरासाठी होतं. आनन्दं ब्रह्मणो विद्वान न बिभेति कदाचन।' अर्थ लावायची माझी पाळी होती. 'भी' धातूच्या तृतीय-पुरुषाच्या रूपासाठी वाक्य घातलं, हे उघड होतं. वाक्य सोपं होतं. सर्व शब्द व त्यांची रूपं मला माहीत होती. मी अर्थ केला, ''ब्रह्माचा आनंद माहीत असणारा कधीही भीत नाही.'' अर्थ बरोबर होता. मी खाली बसले. शब्दांचा अर्थ लागला होता. पण वाक्याचा अर्थ मला मुळीच कळला नव्हता. ब्रह्माचा आनंद आणि भीती ह्याचा संबंध काय? मनात म्हटलं, 'मला कुठं भीती वाटते आहे? पण मला कुठं ब्रह्माचा आनंद होतो आहे? हे भांडारकर विचित्रच वाक्यं घालतात.'

काही दिवस वाक्य मनात घोळलं व नंतर कित्येक तपं मी ते वाक्य विसरूनही गेले होते. बी. ए. च्या वर्गात म्हणे मी तत्त्वज्ञान हा विषय घेतला होता; पण सबंध दोन वर्षांत त्या वाक्याची मला आठवण झाली नाही. कधी तरी अजिंठ्याची लेणी पहायला मी गेले होते. तिथे मनुष्याला 'पंचमहाभयं' की 'सप्तमहाभयं' असतात, त्यांचं चित्रण केलेलं पाहिलं. एवढंच काय 'मृत्यू उदराचिये परिवरीं।गर्भ गिंवसी' ही ज्ञानदेवीतली ओवीपण मोठा रस घेऊन वाचली. पण मन काही केल्या ह्या अनुभूतींचा भांडारकरांच्या पुस्तकातील वाक्याशी संदर्भ जोडीना. पण एक दिवस उजाडला. हायडेगरचे एक भाषांतरित पुस्तक वाचीत होते. विषय त्याचा आवडता. झाइन (Sein) आणि निष्ट-झाइन (Nichtsein). 'झाइन' म्हणजे असणे, 'निष्ट-झाइन' म्हणजे नसणं. त्यानं ज्यावर भाष्य केलं आहे अशी आणखी एक कल्पना 'डाझाइन' (Dasein) म्हणून आहे. 'डाझाईन' म्हणजे 'तिथं असणं, असणारं', संस्कृतात नैयायिकांच्या भाषेत सांगावयाचं, म्हणजे 'तत'. 'झाइन-नेस' (Sein-ness)- असणेपण, म्हणजे सत्ता; 'निष्ट-झाइन-नेस' - (Nicht-sein-ness)- विशिष्ट ठिकाणी नसणेपणा म्हणजे असत; व 'डाझाइन-नेस' (Dasein-ness)- विशिष्ट ठिकाणी असणं, म्हणजे 'तत्ता'- 'डाझाईन' हे 'दिक व काल यांनी मर्यादेत आणलेलं' - 'अभिव्यक्त झालेलं झाईन' किंवा 'व्यक्ती'. हायडेगर सत्‌ची, त्यापेक्षाही तत्‌ची चिकित्सा करिताना व रूप निश्चित करिताना त्याचे मुख्य गुण काय, हे सांगतो. 'सत्' हे सर्वव्यापी व अनंत असल्यामुळे असत्‌ला गुंडाळून बसलेलं असतं. पण 'तत्' हे सत्‌चं देशकालानं मर्यादित झालेलं रूप असल्यामुळे त्यावर

असतची दाट छाया जन्मापासूनच पडलेली असते व 'निष्ट-झाइन' 'नाहीसं होणं' ह्या परिणामाचं भय त्याला असतं. हे भय तत्चं एक लक्षण आहे. इथपर्यंत आले आणि डोळ्यांपुढे पुस्तकातलं पान व ओळ स्वच्छ दिसली. 'आनन्दं ब्रह्मणो विद्वान न बिभेति कदाचन।' भय कसलं असतं व कशामुळे ते नाहीसं होतं, हे अगदी लख्ख समजलं. हायडेगर तिथंच सोडला व पाचवीच्या पुस्तकातलं वाक्य परत सापडतं का, बघू लागले.

हात व डोळे पुस्तकं चाळीत होते आणि मन भरकटत होतं. ह्या ओळीचा अर्थ इतका सोपा आहे की, त्याला म्हातारपण का यावं लागलं? वयाच्या तेराव्या-चौदाव्या वर्षी कळलं नाही, तर नवल नाही, पण मागून विशीच्या पुढे सुद्धा मन प्रगल्भ झालं नव्हतं का? लहानपणी मृत्यूची कल्पना नसते. पुढे जीव व मृत्यू ह्या दोन शब्दांची सांगड घातलेली वाक्यं वाचली, तरी 'भय' शब्द नसल्यामुळे साखळी जुळली नाही. पंचमहाभय-सप्तमहाभयांची चित्रं पाहिली, पण त्यांत निरनिराळ्या एकेका भयाचं, पाण्यात बुडून मरण्याचं, आगीत जळण्याचं वगैरे चित्रण असल्यामुळं 'भया'च्या सर्वंकष सामान्यत्वाची कल्पना आली नाही. ज्ञानदेवांच्या ओळींतही 'जन्म' आणि मृत्यू' असे शब्द आहेत; 'भय' नाही. म्हणून लक्षात आलं नाही. अशी सारवासारव मी करू बघत होते. पण एकदा जागं झालेलं मन ही तडजोड मानायला तयार नव्हतं. परत पहिल्यापासून विचार करायला लागले.

लहानपणी मृत्यूची कल्पनाच नसते. त्यामुळे ही ओळ समजण्याचं सामर्थ्यच मनाला नव्हतं. इथपर्यंतचं समर्थन पटण्यासारखं होतं. मोठेपणी क्षणभर थांबून उसंत घेतली असती, विचार केला असता, तर ओळ समजली असती. पण मन व शरीर वर्तमानकाळात इतक्या आस्थेनं वावरत होतं, इतक्या उत्कटतेनं प्रत्येक क्षण जगत होतं की, अव्यक्त अशी सुरुवात (अव्यक्तादि) व अव्यक्त असा अंत (अव्यक्तनिधन) ह्यांकडे त्याची झेपच नव्हती. व्यक्तमध्यात ते पूर्णपणे गुरफटलेलं होतं. तेही दिवस गेले. सासर-माहेरची वडील माणसं गेली. ज्यांना जिवाभावाचे मित्र म्हणत असे, त्यातलेही काही गेले. पण मन अजून पुरं जागं झालं नव्हतं. स्वतःची जिवावरची दुखणी आली, म्हातारपण व अशक्तपणा आला. तेव्हा जिथं जातो तिथं बरोबर असणाऱ्या ह्या सांगातीची ह्या 'निष्ट-झाइन'च्या अस्तित्वाची जाणीव झाली. भयानं मनाला स्पर्श केला. हा सर्व अनुभव

येईपर्यंत अगदी चिरंतन उघडं सत्यही दिसलं नव्हतं. सत्य कायम, डोळ्यांपुढे उघडं असतं. ते पडद्याआड नसतं. कुठूनतरी उकरून काढायचं नसतं. त्याला न ओळखणं, न पाहणं, पाहूनही दृष्टीआड करणं ही सर्व आपल्या मनाची किमया आहे. वाचायला येऊन उमजत नाही. अनुभव घेऊनही आपण कोरडेच राहतो. कारण सत्य समजून घेण्याची, त्याचा आविष्कार सहन करण्याची मनाची तयारी नसते. मनाच्या तयारीप्रमाणे एकेक कोडी उलगडतात, आणि कितीतरी न उलगडता तशीच राहत असली पाहिजेत. कोडी आहेत, ह्याची जाणीवही आपल्याला न होता आपला अंत होत असेल, हा सगळा विचार संपतो, तो हवं असलेलं वाक्य तैत्तिरीय उपनिषदात सापडलं. तिथं खूण घालून हायडेगर पुढे वाचावयास घेतला.

व्यक्तीला (तत्‌ला) नाहीसं होण्याची कायम भीती आहे. पण हायडेगर एवढ्यावरच थांबला नाही. त्याची चिकित्सा पुढे चालू झाली. हे जे तत्‌ असतं, त्याचं आणि त्याच्या असण्याच्या क्रियेतच जे नसण्याचं भय असतं, त्याचं एक रूपांतर ते तत करितं. ते रूपांतर म्हणजे इतरांबद्दल काळजी वा चिंता. व्यक्ती कसल्या-ना-कसल्या काळजीत असते. ती दुसऱ्यांबद्दल काळजीत असते, सगळ्यांची चिंता करीत असते आणि ही दुसऱ्याबद्दल वाटणारी काळजी वा चिंता दुसरं-तिसरं काही नसून स्वतःला स्वतःच्याबद्दल जी चिंता वाटते, तिचं एक रूपांतर आहे. स्वतःच्या नष्ट होण्याची चिंता बाळगीत राहिल्यानं जीवन दुःसह होईल. पण त्या चिंतेला असं रूप दिलं, म्हणजे जीवनौघ व्यवस्थित चालू राहतो, ही हायडेगरच्या विचारावर पडलेली फ्रॉइडची छाया. ह्या दोघांनी मिळून मला माझं खरं रूप दाखविलं. माझ्या प्रकृतीबद्दल विचारणाऱ्या माणसाला हसून उलट, "आता तुमची प्रकृती कशी आहे? मध्ये फार आज़ारी होता, नाही?" असं काळजीच्या सुरात विचारणारी मानभावी मी, "अग, तुला हल्ली बरं नसतं. एवढी बडबड करू नकोस; घरी बसून विश्रांती घे." असं कर्त्यासवरत्या शहाण्यासुरत्या मुलीला बजावणारी मी, "हे बघ धाकटीला पडसं झालं आहे. तिच्या अंगात गरम घाल. तिला बाहेर नेऊ नकोस. भारी काळजी वाटते बाई तिची." असा उपदेश करणारी मी, म्हणजे स्वतःच्या भयानं वळवळणारा पण वरवर दुसऱ्याबद्दलच्या काळजीचा बुरखा घेतलेला माझाच क्षुद्र जीव आहे हे स्पष्ट झालं.

एखादी गोष्ट हातात घेतली की, बुद्धी जिथपर्यंत जाईल तिथपर्यंत तिचा पाठपुरावा करायचा, मध्ये थांबायचं म्हणून नाही; अगदी शेवटाला जायचं, हा जर्मन लोकांचा गुण आहे. रस्त्यावर खडी चेपणारा रूळ असतो ना, तसं त्यांचं आहे. तोच अजस्त्रपणा, तोच संथपणा, तोच एकमार्गीपणा, तोच अटळपणा आणि तेच सामर्थ्य. हायडेगरने माझा आत्मा पार भुईसपाट करून टाकिला.

१९६८

चौदा :

# 'ते सर्व तूच आहेस!'

''आज पुरे. माझं डोकं चालत नाही. आजचं तपासून झालं तेवढं उद्या नीट करून आण-पुढचं उद्या वाचू.''

''तुम्हांला बरं आहे ना? माझा रोज येण्यानं त्रास नाही ना होत?'' तिने काळजीच्या स्वरात विचारिले.

''छे, छे! तसं काही नाही. पण हल्ली मला पहिल्यासारखं काम होत नाही. माझी प्रकृती पार बिघडायच्या आत संपवून टाक उरलेलं काम, म्हणजे सुटलीस.''

''किती काळजी करता बाई तुम्ही माझी! काम माझं, आणि ओझं तुम्हांला. दुसऱ्यासाठी फार खपता तुम्ही!''

ती अगदी मनापासून पण विचार न करिता बोलली. मला हसू आलं. तिनं विचारलं, ''हसण्यासारखं बोलले मी?''

''हसण्यासारखंच नाही तर काय? तू म्हणालीस, 'काम माझं आणि ओझं तुम्हांला म्हणून.' तुला वाटतं, तू माझी विद्यार्थिनी, मी तुझी शिक्षिका -तुझ्यासाठी मी स्वत:ला झिजविते आहे म्हणून-''

माझे बोलणे पुरे व्हायच्या आत उताविळीने तिने म्हटले, ''मग हे खरं नाही का?''

मी नकारार्थी मान हलविली. ''हे पहा तापी, तू विद्यार्थिनी खरी, पण त्याच्या पाठीमागं विशेषण काय लावते मी? माझी विद्यार्थिनी. मी तिला शिकविते. ती पास झाली, म्हणजे तिच्याबरोबरच माझीही परीक्षा पास होते. तू पास होतेस विद्यार्थिनी म्हणून, मी पास होते शिक्षिका म्हणून. तुला

कल्पना नाही. ही परीक्षा किती कठीण आहे ती. बाहेरचे परीक्षक तुझ्या
निबंधाबद्दल जे लिहितील, ते तुझ्यापेक्षा मलाच जास्त लागू असतं. माझ्या
सुदैवानं ही शोभा फार प्रकटपणे होत नाही! जे विद्यार्थी नापास,
त्यांच्याबरोबर मीही नापास; पण जे पास होतात, त्यांच्याबरोबर मी क्वचितच
नीटपणे पास होते. ही परीक्षा पास होण्यासाठी माझी धडपड. मी तुझ्यावर
रागावते, कधी तुला चुचकारते, तुझं लिखाण नीट व्हावं म्हणून मेहनत घेते,
हे तुझ्यासाठी नसून स्वतःसाठीच आहे. आयुष्यात मी निरनिराळ्या भूमिका
पार पाडीत असते. त्यांतील एक शिक्षकाची. माझ्या मनात मी शिक्षक म्हणून
एक स्वतःचं चित्र उभं केलं आहे. प्रत्येक विद्यार्थी हा दुहेरी तऱ्हेने मीच
असतो. माझ्या शिक्षणाचं, शिक्षकत्वाचं ते एक प्रतीक असतं. माझ्या
विद्यार्थीपणाचं ते दुसरं एक प्रतीक असतं. माझी सर्व धडपड ही
माझ्यासाठीच आहे. माझ्यात जे अनंत 'मी' आहेत ना, त्यांतल्या एकेका
'मी' साठी मी जीव टाकीत असते.''

मी थोडा वेळ थांबले. तापी माझं बोलणं ऐकून विचार करीत होती.

''हे बघ तापी, उपनिषदांत म्हटलं आहे ना ग कुठेसं, 'अरे, तू स्त्रीवर
बायको म्हणून प्रेम करीत नाहीस, आपल्या आत्म्यावरचं प्रेम असतं ते.'
वगैरे?''

तापीने नुकतीच उपनिषदे वाचली होती. तिचे स्मरणही माझ्या मानाने
तल्लख होते. तिने माझ्या कपाटातून बृहदारण्यकोपनिषदातील ते पानच
माझ्यापुढे धरिले :

''न वा अरे पत्युःकामाय पतिः प्रियो भवति।
आत्मनस्तु कामाय पतिः प्रियो भवति।
न वा अरे पुत्राणां कामाय पुत्राः प्रिया भवन्ति।
आत्मनस्तु कामाय पुत्राः प्रिया भवन्ति।
न वा अरे देवानां कामाय देवाः प्रिया भवन्ति।
आत्मनस्तु कामाय देवाः प्रिया भवन्ति।
न वा अरे भूतानां कामाय भूताः प्रिया भवन्ति।
आत्मनस्तु कामाय भूताः प्रिया भवन्ति।''

''बघ तापी, याज्ञवल्क्यानं गुरुशिष्याचं निराळं असं उदाहरण दिलं
नाही कारण त्याची बायकोच त्याच्यापुढे शिष्या म्हणून बसली होती.''

''आई जे आपल्या मुलावर प्रेम करिते, त्याच्या खस्ता खाते, ते काय

'आत्म्या'च्या, म्हणजे तुमच्या म्हणण्याप्रमाणे स्वत:च्या प्रेमाखातर?'' तापीने शंका काढिली.

''होय ना, तापी. याज्ञवल्क्याचं हे उदाहरण तर मला फार पटतं. तान्ह्या मुलाच्या रूपाने आईच्या इवल्याशा आत्म्याला सर्जनशील परमात्म्याचा अनुभव आलेला असतो. तो लहान जीव सर्वस्वी आईवर अवलंबून असतो. आई त्याला खाऊ घालते, वाढविते, रडविते; अशा वेळी सर्वसत्ताधारी सर्वशक्तिमान ईश्वराची भूमिका ती पार पाडीत असते. मुलाच्या खस्ता खाताना, लौकिकात वावरताना तिने स्वत:शी रंगविलेली, समाजमान्य झालेली आईची भूमिका ती पार पाडीत असते. त्या मुलाला बोलायला ती शिकविते, वागायला ती शिकविते, शाबासकी ती देते, शिक्षा ती लावते,- कर्ती-करवती तीच असते. ही भूमिका पार पाडीत असता, तिच्या आत्म्याच्या ह्या आविष्काराचा तिला एवढा कैफ चढतो की, ते मूल हाही एक स्वतंत्र आत्मा आहे, हे ती विसरते. वाढणाऱ्या आणि वाढलेल्या मुलाकडून लहानपणच्या असहायतेची,- लगटण्याची, भीतीची, आज्ञा-पालनाची तिची अपेक्षा असते. ती भंगली, म्हणजे तिला अतोनात दुःख होतं. हे वाढलेलं, आपली सत्ता नाकारणारं मूल हेही आपणच आहोत, हे ती विसरते.''

तापीला माझं प्रवचन पटलेलं दिसलं. ''मूल मोठं होण्याची वाटच पहावी लागत नाही, बाई. किती लहानपणापासून त्याचा स्वतंत्रपणा दिसू लागतो. जशा आईच्या अपेक्षा असतात, तशाच मुलाच्याही ठाम अपेक्षा असतात. तेही आपली आई म्हणजे आपल्या 'स्व'चीच पुस्ती म्हणून वागते. मला जर उशीर झाला, तर माझा चार वर्षांचा मुलगा किती रुसतो! त्याचं काही कमी पडलं म्हणून नाही, पण जणू मी त्याच्या काही हक्कांवर गदा आणिली, असा त्याचा आविर्भाव असतो.'' तिने हसत-हसत सांगितले. आणि उद्याचा वायदा करून ती निघून गेली.

विद्यार्थिनी गेली, पण माझ्या मनाला एक नवीन करमणूक देऊन गेली. माझी नात खेळता-खेळता पडली. मी आजारी असताही तिला उचलून घ्यायला धावले. माझे मन मला म्हणाले, ''ती तूच आहेस.'' कोवळ्या चांदण्यासारख्या हसणाऱ्या, वसंताच्या झुळुकीप्रमाणे दुडूदुडू पळणाऱ्या माझ्या लहानग्या नातीला माझ्या वाळक्या वृद्ध हातांनी कवळीत हसतच मी म्हटले, ''आहेच मुळी मी ती.'' बाहेर बागेत गेले, तो कुत्रा धावत-धावत

शेपूट हलवीत पुढ्यात आला. ''तोपण तूच आहेस.'' ''होय. खरंच.'' मी म्हटले. बागेतल्या बकुळीच्या झाडाची बकुळे खात एक कोकीळ बसला होता. मला पाहताच उडून गेला. ''तो तूच आहेस.''

माझी करमणूक चालूच होती. काही दिवसांनी मी महाबळेश्वराला गेले. एका संध्याकाळी कुठल्याशा टोकाला जाऊन समोरच्या डोंगरांच्या रांगांतील सूर्यास्त पाहात बसले होते. खाली थिजलेल्या दगडांच्या अफाट लाटा, वर निळ्या आकाशात रंगीबेरंगी ढगांच्या लाटा व कुठेतरी अधांतरी मी! ''ते सर्व तू आहेस.'' माझे मन आनंदाने अगदी उतू चालले होते. सूर्यास्ताशी होणारी एकात्मता त्याला एकदम पसंत होती. आणि ह्या आनंदात भर टाकायला एक उपनिषद मदतीला धावलेच. ''हे सूर्या, लोकांचे नियमन करणाऱ्या, लोकांच्या जन्मदात्या, आपले प्रखर किरण एकत्र आण. त्यांना आवर. तुझे सौम्य कल्याणकारी रूप मला पाहू दे. त्यात जो पुरुष आहे ना, तो मीच आहे.'' मी परत-परत जिभेवर घोळवीत मिटक्या मारीत हा जुना श्लोक म्हणत होते. विश्वाशी झालेल्या एकात्मतेचा मला कैफ चढला होता.

मी पुण्याला परतले होते. रोजच्याप्रमाणे वर्तमानपत्र चाळीत होते इस्त्रायलमध्ये चाललेल्या आइश्मान् खटल्याची हकीकत होती ती. लक्षावधी निरपराधी लोकांना-अर्भकांना, स्त्रियांना, पुरुषांना-हाल करून नात्सी लोकांनी मारिले, ही गोष्ट मला माहीत होती. पण एका मनुष्याने काय क्रूरपणा केला, ती हकीकत वाचवत नव्हती. ह्या हत्येत मारले गेलेले माझे जर्मन मित्र मला आठवले. पळून गेल्यामुळे ज्यांचा जीव वाचला, पण आयुष्य कायमचे मातीमोल झाले, अशा मैत्रिणी डोळ्यांसमोर आल्या. त्यांच्या मारेकऱ्यांबद्दल मन त्वेषाने उफाळून निघाले. ''तेही तूच आहेस.'' विजेचा चटका बसला. छे! छे! कदापि नाही. ज्याच्याबद्दल मला इतकी घृणा वाटते, इतका त्वेष वाटतो, ते मी कधीही असणे शक्य नाही. अंगी चिकटू पाहणारे हे किळसवाणे झुरळ मी जोरात झटकून टाकिले. मन बिचारे गप्प बसले.

रोजचा व्यवहार चालूच होता. विषय शिकवायचा होता समाजातील गुन्हेगारीबद्दलचा. माझी जीभ विवेचनात अगदी रंगून गेली होती. ''ज्यांना आपण गुन्हेगार म्हणतो ना, ते समाजाचेच घटक आहेत. सामाजिक परिस्थिती व समाजाची बांधणी हीसुद्धा इतर गोष्टींबरोबरच गुन्ह्याला कारणीभूत होतात. तुम्ही, मी, सर्वजण आज ह्या दालनात बसून गुन्हेगार व

त्यांची प्रवृत्ती ह्यांचा विचार करितो आहोत,- जणू काही गुन्हेगार म्हणजे आपल्यापेक्षा काहीतरी निराळे, काहीतरी लोकविलक्षण म्हणून. पण ते खरं नाही. मानवाच्या- तुमच्या, माझ्या, सर्वांच्या-प्रवृत्ती सगळीकडे सारख्याच असतात. सुस्थितीत राहण्यासाठी स्वत:ला, बायकोला, मुलांना खाणेपिणे, कपडेलत्ते नीट मिळावे, असं सर्वांनाच वाटतं. अगदी ह्याच साधारण प्रवृत्ती गुन्हेगारांच्याही असतात. आपल्यापेक्षा मानाने, वयाने, शिक्षणाने, अधिकाराने मोठे असतील, त्यांचं म्हणणं ऐकावं, हीही सामान्य प्रवृत्तीच आहे, आणि तिचा फायदा राजकीय, सामाजिक, धार्मिक क्षेत्रात वडील माणसं व पुढारी घेतातच. खुनी फक्त पैशासाठी खून करितो, सूडासाठी करितो, असं थोडंच आहे? धर्मवेडाने, देशप्रमानेही माणसं दुसऱ्यास मारावयास प्रवृत्त होतात.''

''तुमचं म्हणणं असं की लढाई म्हणजे खूनच?'' वर्गातील एक आवाज.

''प्रश्न विचार करण्यासारखा आहे, पण आज आपला विषय आहे समाजातील गुन्हेगारी. तेवढ्यापुरताच आपण विचार करू''

''तुमचं म्हणणं असं की धार्मिक भावना, पितृप्रेम, देशप्रेम ह्या उदात्त प्रवृत्तीही गुन्हेगाराला प्रेरक होतील?'' दुसरा आवाज.

''माणसं काही वेळा भावनेने भारून जातात. गुरू, पुढारी, वडील माणसं जे सांगतात, ते करून जातात. आपली स्वत:ची अशी मूल्यं आहेत, आपल्या धार्मिक मूल्यांचा विचार करून त्यातली काही तरतमभावाने स्वीकारण्याचा आपला हक्क आहे, हे माणसं विसरतात. इतर विचार, नोकरी, सुखी जीवन हीही अशा गोष्टी विसरायला मदत करतात. पूर्वी माणूस राजाच्या नोकरीत राहिला म्हणजे आपल्या आश्रयदात्याचं ऐकण्यात भूषण मानीत असे. जीव देणं व घेणं ह्या गोष्टी त्याच्या लेखी सारख्याच होत्या. परमभक्तीचं एक लक्षणच असं आहे की, मनुष्य सर्वथा दुसऱ्याचा होतो. अशा मन:स्थितीतही गुन्हा होणे शक्य आहे. नुसतं शक्य आहे, इतकंच नव्हे, तर महाभयंकर गुन्हे झाल्याचं इतिहासात नमूद आहे. युरोपात, मध्ययुगात ख्रिश्चन धर्माच्या नावाने 'इन्किझिशन' या संस्थेमार्फत कित्येक वर्षं लोकांचे अनन्वित हाल झाले. तिची आपल्या इकडे गोव्यामध्येही झळ लागली. मनुष्यजातीविरुद्ध ही एक भयानक गुन्हेगारीच हाती, आणि ती धर्मवेडाने उत्पन्न झालेली होती.''

तास झाला. मुले पांगली. पण माझे विचार चालूच होते. गुन्हेगारांच्या प्रवृत्ती इतर मानवांसारख्याच असतात हे जर खरे, तर ह्याचाच दुसरा अर्थ म्हणजे कोणीही मनुष्य काही विशिष्ट परिस्थितीत गुन्हा करणे शक्य आहे. लाखांमध्ये एखादा असा सापडतो की, तो 'प्राण गेला तरी बेहेत्तर, पण माझी स्वत:ची अशी मूल्ये बाळगून राहीन,' असे म्हणतो, आणि दहा लाखांत एखादाच असा की, कसोटीची वेळ आली, म्हणजे खरोखरच तसा वागतो. गुन्हेगारी, दुर्वर्तन, लबाडी हे सर्व प्रकार म्हणजे सर्वसाधारण मानवी प्रकृतीचाच आविष्कार मानिला, म्हणजे मानवी प्रकृती कुठल्या टोकापासून कुठल्या टोकापर्यंत जाण्याचा संभव आहे, ह्याची गुन्हेगारी ही एक खूण व आठवणच म्हणावयाची. गुन्हेगाराच्या रूपाने आपल्यापुढे जे येते, ते आपलेच सुप्त अनाविष्कृत स्वरूप का?

माझे मन दचकून मागे सरले.

जुना विषय संपून नवा सुरू झाला होता. सामाजिक संबंध किती प्रकारचे असतात, हे समजावून देणे चालले होते. फार खोल विचार न करता पाठ म्हणावा, तशी मी बोलत होते. ''उच्चनीचपणा, पुढारीपणा, अनुयायीपणा परस्परसाहाय्य व विरोध-''

''विरोध हाही एक सामाजिक संबंधच म्हणायचा का?'' वर्गातून एक आवाज आला.

''संबंध आल्याशिवाय विरोध येणारच नाही. एवढंच काय, जेथे-जेथे सहकार्य आहे तेथे-तेथे विरोध दिसून येतो. मालक व मजूर या दोघांच्या प्रयत्नांनी उत्पादन होत असते व त्याच क्रियेत दोघांचा एकमेकांशी विरोध दिसून येतो. समाजाच्या विधिनिषेधाच्या कल्पना आत्मसात करून व्यक्ती समाजाभिमुख होताना असा विरोध तर सारखा दिसून येतो. लहान मुलांचेच पहा. सकाळी दात घातल्याशिवाय खायचं नाही, ही सवय त्याला लावायला श्रम पडतात ना? त्यांचा विरोध होत-होत हळूहळू त्यांच्या सामाजिक जाणिवेचा विकास होत असतो. समाजाची मूल्यं गळी उतरत असतात, आत्मसात होत असतात. ह्याहीपलीकडे जाऊन फ्रॉइड म्हणतो की, विरोध हा बऱ्याच प्रसंगी संमतीचं लक्षण असतो. मनातून संमती असते, बाहेरून विरोध असतो. जागृत मनाला म्हणजेच समाजाभिमुख मनाला अमक्या गोष्टी वाईट, अमक्या गोष्टी चांगल्या, अशी ठाम शिकवण मिळालेली असते. पण खोलखोल दुसरं मन दडलेलं असतं. लांडग्याचं क्रौर्य, वाघाचा शिकारीपणा,

हरिणांचा भित्रेपणा, कुत्र्यांची लाचारी, डुकराची हाव, माकडाचा खट्याळपणा, सर्व काही त्यात असतं. ज्या घटनांबद्दल किंवा माणसांबद्दल तिरस्कार वाटतो, त्यांच्या कृत्यांचं एक मन हळूच कौतुक करीत असतं. एकाच शरीरात अशी दोन मन हळूच कौतुक करीत असतं. एकाच शरीरात अशी दोन मनं असतात. सामान्य माणसांच्या व्यवहारात बहुतेक एका मनाचं चित्र उमटलेलं दिसतं. दुसरं दबलेलं असतं, पण काही प्रसंगी ते मन उफाळून येतं, आणि एकच माणूस देवाची, आणि दैत्याची अशा दोन्ही परस्परविराधी भूमिका उमटवीत असतो. पाश्चात्त्यांच्या कथा-कादंबऱ्यांत कथानकाला रंग भरण्यासाठी ह्या तत्त्वाचा उपयोग केला गेला आहे. पहिल्या भेटीत ज्याच्याबद्दल गैरसमज घृणा किंवा द्वेष, त्याबद्दल शेवटी आत्यंतिक प्रेम अशी कलाटणी बऱ्याच कथा कादंबऱ्यांत दिसते. आपल्याकडे भक्तिमार्गी लिखाणात व तत्त्वज्ञानात ह्याचा विचार फार खोल केला आहे; पण इतर वाङ्मयप्रकारात तो दिसत नाही. भक्तिवाङमयात विरोधभक्ती म्हणून एक प्रकार सांगितला आहे. देवाचे आत्यंतिक विरोधी व वैरी असलेल्या लोकांची मने सूडापायी इतकी देवमय होतात की, तेही शेवटी देवाला जाऊन पोहोचतात, असे सांगितले आहे. आपल्या तत्त्वज्ञानाप्रमाणे ब्राह्मी स्थिती प्राप्त व्हायची, म्हणजे संपूर्ण समता अंगी बाणली पाहिजे. समता म्हणजे राग नाही, लोभ नाही, घृणा नाही, आसक्ती नाही, प्रेम नाही, द्वेष नाही. पाणी गायीला आणि वाघाला सारखंच असतं. 'गायीची तृषा हरू,वाघ्रा विष होऊनि मारूं' असं ते करीत नाही. सूर्य रावरंक म्हणत नाही. ती समता; तीच अलिप्तता. एका दृष्टीनं सर्व आपणच व दुसऱ्या दृष्टीने आपण कशातच नाही, अशी ही वृत्ती. ह्या सर्वांचा विचार केला, म्हणजे विरोध-आत्यंतिक विरोध-म्हणजे नुसता सामाजिक नव्हे, तर वैयक्तिक संबंध व लागेबांधे ह्यांमुळेच उत्पन्न होतो. त्या विरोधामध्येसुद्धा आत्मीयता आहे, ह्याची प्रचीती येते. प्रेम आणि द्वेष ही एकाच आत्म्याची दोन रूपं आहेत -''

मनाला पुढे जाववेना. ते विचार करायचे थांबले.

एकदा ठेच लागली, म्हणजे परत-परत तिथेच ठेच लागते. तसे माझे झाले. एक पाहुणे घरी आले होते. ते मला म्हणाले, ''मी एक फारच छान पुस्तक वाचतो आहे-तुम्ही अवश्य वाचाच.' मी ते घेतले. ते होते शायररचे हिटलरच्या उदयास्ताबद्दलचे. मी वाचायला घेतले. काही गोष्टी माहीत होत्या, तरी त्या नव्याने मांडल्या होत्या. जर्मनीत हिटलरचा उदय का बरे

झाला? पहिल्या महायुद्धानंतर युरोपात काही विशिष्ट घडी बसवण्याची विल्सन स्वप्ने रचीत होता, पण इंग्लंड-फ्रान्सच्या कुटिल राजकारणाचा वीट येऊन तो निघून गेला व जर्मनी या दुकलीच्या चिमट्यात गवसला. आपला प्रतिस्पर्धी, पहिले महायुद्ध करणारा गुन्हेगार, म्हणून जर्मनीच्या या दोन शत्रूंनी पुरेपूरपणे जर्मनीचे नाक खाली करण्याचा चंग बांधला. जर्मनीच्या पुढाऱ्यांना त्या वेळच्या राष्ट्रसंघात न्याय मिळणे अशक्य झाले. तिच्या साध्या व रास्त मागण्याही धुडकाविल्या गेल्या. मी जर्मनीत गेले, तेव्हा ते सबंध राष्ट्र रागाने धुमसत होते. जे याचनेने मिळाले नाही, ते हिटलरने दांडगाईने घेतले, तेव्हा जर्मनीवर एकच आवाज उमटला, "असेच पाहिजे होते. इंग्लंडला, फ्रान्सला व अमेरिकेलाही सभ्य, रास्त मागण्या समजत नाहीत; त्यांना बडगाच कळतो." पहिली दांडगाई पचल्यावर हिटलरने निरपराध राष्ट्रांना गिळंकृत केले; ती दांडगाई ह्या बड्यांनी ऐकून घेतली. त्या वेळी दटावले असते, परिणामाचा भयंकर परिपाक लक्षात घेऊन वेळीच ठोकले असते, तरी जर्मनी गप्प बसता. पण पहिल्याने स्वार्थामुळे डोळ्यांवर पडदा ओढला, आता भीतीने गप्प बसले. ह्या भानगडीत मध्ययुरोपातील फिनलंडपासून अल्बानियापर्यंत सर्व चिमुकल्या राष्ट्रांचे स्वातंत्र्य पहिल्याने जर्मनीने व नंतर रशियाने नष्ट केले व लक्षावधी असहाय ज्यूंची अमानुष हत्या झाली. ह्याला जबाबदार फक्त जर्मनीच का? जर्मनीच्या गुन्हेगारीत सर्व युरोपचा, पर्यायाने सर्व जगाचा वाटा नाही का? जी गोष्ट राजकीय गुन्हेगारीची, तीच, सामाजिक गुन्हेगारीची.

एका भयंकर सत्याच्या जाणिवेने मी व्याकुळ झाले होते. 'तत्त्वमसि', 'ते तू आहेस'- माझ्यापुढे बोट नाचवीत मन म्हणत होते. मी थरथर कापत म्हटले, "होय, हे मीच आहे. आइश्मान, स्टालिन, हिटलर आणि त्यांनी मारिलेले लोकसुद्धा मीच आहे."

पण एवढ्यावरच हा ज्ञानाचा लोट थांबणार नव्हता. "इतर देशांतल्या माणसांची व घटनांची नावे का घेतेस? घरचीच, जवळचीच नावे घे की." मनाने छेडले.

"स्वातंत्र्याच्या चळवळीत काही निरपराध माणसं मारिली गेली. काय म्हणालीस तू त्या वेळेला? आठवतं?"

मला आठवलं, "देश युद्धात पेटलं, म्हणजे असं एखादे वेळेला व्हायचंच."

"ज्यांनी वाममार्गाने पैसे मिळविले, लाच घेतली, असं तुला वाटतं त्यांचा तुझा कधी संबंध येऊ द्यायचा नाही. असं कटाक्षानं वागणं तुला शक्य आहे का?"

"नाही." मी परत कबुली दिली.

"देशात सर्व जातींनी, सर्व धर्मांनी एकत्र नांदावं, असं असताना परिस्थितीचा बऱ्याचदा विपर्यास करणारे, भडक प्रचार करून तरुणांची मनं भडकविणारे लोक तुझ्या ओळखीचे आहेत ना?"

मी परत "होय" म्हटले व त्रासून विचारले, "काय, मी रानात जाऊन राहू? का जीव देऊ?"

"तसं केलंस, तरच तुला अलिप्तपणाचा आव आणता येईल, एरवी नाही. आपल्या कामापुरता,- जास्त नाही,- एवढा जरी व्यवहार तू ठेवलास तरी तेवढ्यापुरती तुझी त्या माणसांच्या कृत्यात भागीदारी होतेच की. अशा तऱ्हेचा सतत प्रचार ज्यूंविरुद्ध चालला होता, हे तुला माहीत आहे. येथील वातावरण अजून तितकं तापलेलं नाही. पण जर्मनीत झालेल्या प्रकाराची येथे पुनरावृत्ती होणार नाहीच असं काही म्हणता येणार नाही, हे खरे ना? अशाच प्रचाराने गांधींचा खून झाला ना? महात्मा गांधींच्या वधाचे निमित्त करून किती घरांची महाराष्ट्रात होळी झाली? एवढंसं निमित्त होऊन भयानक जातीय दंगे भारतात झाले ना?"

मी आपली 'होय', 'होय' म्हणत होते, पण अजून संपले नव्हते. "ही सर्व द्वेषाची बीजं नाहीतशी करण्याचे तू किती प्रयत्न केलेस? त्याच समाजात, त्याच लोकांत तू आपलं संभाळून, कातडी-बचावाच्या धोरणाने राहिली आहेस ना? मग जगात, तुझ्या स्वतःच्या समाजात, ही गुन्हेगारी चालली आहे व जे गुन्हेगार आहेत, त्यात आपला काही भाग नाही, हे म्हणण्यात काय अर्थ आहे? ते तूच आहेस. कर, आठवण कर. याज्ञवल्क्य काय म्हणाला, ते सबंध आठव ना."

मी जडपणे पाठ म्हटला, "एवं वा अरे अयमात्मा अनन्तरः अबाह्यः कृत्स्नः प्रज्ञानघन एव... यत्र हि द्वैतमिव भवति तदितरः इतरं पश्यति।"

"अग, ह्याप्रमाणे हा आत्मा सर्व बाहेरच असतो, तसाच सर्वस्वी आतला असतो. द्वैतभावना असेतोपर्यंतच बाहेरचे इतर परके वाटतात. पण सर्वत्र आत्मा ज्ञानमय, ज्ञानाचाच बनलेला आहे."

जाणीव वा ज्ञान ही गोष्ट कधीतरी सुखदायक असते का? ज्ञानाच्या

कुंडात माझी पूर्णाहुती पडत होती. मी व्यथित होऊन कळवळून म्हणाले, ''होय, होय. माझी धाकटी नात मीच, शेपटी हालवीत, भावपूर्ण डोळ्यांनी माझ्याकडे पाहणारा कुत्रा मीच, निळ्या आकाशातून भर्रदिशी जाणारा कोकीळ मीच, भव्य संध्याकाळ मीच, आइश्मान, स्टालिन, हिटलर, खून करणारे, घरे जाळणारे, दंगा माजविणारे, जळत्या घरातून होरपळणारे, खड्ड्यात जाणारे जीवही मीच आहे. खरंच, सगळं मीच आहे.''

माझी कबुली पूर्ण झाली. ज्या क्षणी ज्ञान झाले, त्याच क्षणी मी भस्म होऊन गेले.

१९६३

१. ‘थोडे’ मैत्रिणीसंबंधी

२. प्रस्तावना



# ‘थोडे’ मैत्रिणीसंबंधी

‘गंगाजल’ हे इरावतीबाईंचे ललित-निबंधांचे पुस्तक त्या गेल्यानंतर वर्षाने प्रकाशित होत आहे.

पुस्तकाचे नाव बाईंनी ठेविले नसून ते मी ठेविले आहे. पुस्तक बाईंचे, व नाव मी ठेवणार हे थोडेसे विचित्र वाटले, तरी माझ्या दृष्टीने त्याला फार अर्थ आहे. बाई असत्या तरीही कदाचित पुस्तकाला मीच नाव ठेविले असते.

ह्या ललित निबंधांच्या पुस्तकाला प्रा. कुरुंदकर यांसारख्या विचारवंतांनी प्रस्तावना लिहिल्यानंतर परत मी काहीतरी लिहिण्याची जरूरी नव्हती; परंतु प्रा. कुरुंदकरांनी बाईंचे मराठी ललित निबंधांतील स्थान सांगण्यापुरताच या लेखांचा परामर्श घेतला. ह्या निबंधांबद्दल प्रा. कुरुंदकर मौनच स्वीकारतात.

या पुस्तकातील सर्व ललित-निबंधांमागे बाईंचे सतत जागृत असणारे मन आणि त्यांना जीवनात येणारी अनुभूती यांचे एक सूत्र आहे. त्या सूत्राचा किंवा चिंतनाचा विचार जास्त स्पष्ट व्हावयास पाहिजे होता.

हे सूत्र मला यशस्वीरीत्या सांगता येईल, असे नाही. पण मी प्रयत्न करणार आहे.

साधारणपणे १९५२ पासून बाईंनी जे ललित निबंध लिहिले, त्या निबंधांचे विषय पुष्कळसे आमच्या दोघींच्या बोलण्यात येऊन जात.

अशा तऱ्हेची चर्चा त्या आणखीही कुणाजवळ करीत असतील. पण त्यांच्यापैकीच मीही एक आहे. हे लेख निरनिराळ्या स्वरूपातून जाताना,

त्यांचे रूपांतर होताना मी पाहिले आहे. आणि त्या-त्या लेखामागची त्या-त्या वेळची बाईंची मनोवृत्ती मी बऱ्याच जवळून पाहिली आहे.

मी जे काही लिहीन, त्याहून सर्वस्वी निराळे असे सूत्र दुसऱ्या कोणास सापडले, व त्याने ते मांडले, तर त्यात मला आनंदच आहे. 'परिपूर्ती' व 'भोवरा' हे ललित निबंध संग्रह एकाच वेळी वाचले म्हणजे आपोआपच एक ठळक गोष्ट लक्षात येते. या संग्रहांतून बाई स्वतःच्या जीवनाबद्दल आणि स्वतःच्या विचारसरणीबद्दल खूपसे काही सांगून जातात.

भोवरामधील 'सुटका' या लेखात त्यांनी ते जास्त स्पष्टपणे सांगितले आहे.

''एका माणसाची आयुष्याची कमाई किती असणार? ती कमाई करताना अनुभूतींचा प्रवाह तुडुंब भरून वाहून चालला की, मनुष्य आपण होऊन दुसऱ्याला बोलावते, व आपली कमाई वाटीत सुटते.''

बाईंच्या अनुभूतीचा प्रवाह तुडुंब भरून वाहून जाऊ लागला की, बाई सांगायला लागतात. मग त्यांना कुणी आग्रहही करावा लागत नाही.

'गंगाजल'मधील ललित-निबंधांत बाईंची अनुभूती कुठे सापडते का हे पाहू गेले की, 'बॉय फ्रेण्ड'पासूनच त्याच्या खुणा दिसू लागतात. बाई स्वतः होऊनच आपले आणि पंढरपूरच्या विठोबाचे नाते सांगतात. त्यात भक्ताचे विविध प्रकार सांगताना आर्त होऊन पंढरपूरला जाणाऱ्या बाई एकीकडे अर्थार्थीही असतात.

सोसवेनासा भार शिरी पडला की, त्यांना हरी आठवतो. एकाकीपणे प्रसंगाला तोंड देण्याचा प्रसंग आला की, बाई पंढरपूरच्या विठोबाजवळ बळ मागायला जातात. आलेला प्रसंग सोसायचे सामर्थ्य दे, म्हणून काकुळती येऊन त्याला मिठी मारितात. बाईंची ही काकुळती लौकिक नसते. व्यावहारिक अर्थाने त्यांना काही मागावयाचे नसते. माणसाच्या भावजीवनाची गुंतागुंत मोठी विलक्षण असते. माणूस जवळ आला आणि स्वतःला विसरून आपण त्याच्यावर प्रेम करू लागलो (मग ते प्रेम स्वतःसाठी का असेना), की, ही व्याकुलता, हे रडणे-हसणे सगळे आलेच.

कधी कधी ही गुंतागुंत फारच वाढते. तीतील सुटा धागा कुठे सापडत नाही. अशाही काही प्रसंगी बाई आपल्या जिवलगाला भेटण्यास जात आणि बऱ्याचशा शांत होऊन परत येत, असे मला बऱ्याच वेळा जाणवले आहे.

बाईंच्या मनात जीवनासंबंधी अपार श्रद्धा होती. 'देवळाविना गाव

नाही', म्हणताना त्या स्वतःच्या जीवनातील श्रद्धास्थानांबद्दल, स्वतःला जाणवलेल्या त्यांच्या अस्तित्त्वाबद्दल सांगण्यीच धडपड करितात. हे सांगताना त्यांचे मन या देहाला गाव समजून त्यातल्या देवळाबद्दलही सांगू लागते. म्हणजे यावेळी बाई कसल्यातरी शोधात असाव्यात. परत-परत कशाचेतरी चिंतन आणि कसलीतरी खळबळ त्यांच्या अंतर्मनात चालू असावी, आणि विशेष म्हणजे ती स्वतःची अनुभूती शोधण्याची होती. त्या खळबळीचा व्यावहारिक जीवनाशी काही संबंध नव्हता.

'दुसरे मामंजी', 'आई सापडली' हे निबंध थोडेसे आत्मचरित्रात्मक तर थोडेसे चिंतनशील अंतर्मनाचे स्वरूप व्यक्त करणारे आहेत. स्वतःसंबंधीचे विचार चालू असताना, स्वतःचे कठोर आत्मपरीक्षण करीत असताना त्यांचे समाजाचे चिंतन सुटले नव्हते.

'व्यक्तिस्वातंत्र्य म्हणजे मूल्यहीनता नव्हे', पुनर्जन्माचा बिनतोड पुरावा' हे मध्येच आलेले लेख त्याची प्रचीती देतात. त्याबद्दल विशेष काही सांगण्याची जरूरी नाही. परंतु 'एकाकी', 'किंकाळी', 'आत्मचरित्र लिहिण्यामागील माणसाचे मन', 'उकल', आणि 'हे सर्व तूच आहेस!' या लेखांमागे मात्र एक विशिष्ट सूत्र असून बाई स्वतःची अनुभूती ज्या पद्धतीने सांगत आहेत तीत स्वतःबद्दल सांगताना स्वतःच्या भावविश्वाबद्दल, स्वतःच स्वतःशी करीत असलेल्या झगड्याबद्दल खूपसे काही सांगून जातात, आणि ती त्यांची अनुभूती दुसऱ्याला चिंतनप्रवण करणारी आहे, असे मला तीव्रतेने जाणवते.

'भोवरा' मधील, 'भटके' लिहिताना बाई स्वतःच्या एकटेपणाला, आजारीपणाला, मृत्यूला भीत होत्या. 'भटके'मध्ये त्यांची कुणा-ना-कुणाबद्दल तक्रार आहे; कुणा-ना-कुणाकडून काही अपेक्षा आहे. पण ही अपेक्षा, एकाकीपणाची ही भीती 'एकाकी'मध्ये नाहीशी झाल्यासारखी वाटते.

'एकाकी'पासून पुढचे निबंध वाचू लागलो की, बाईंबरोबर आपणही मनाच्या एका निराळ्याच पातळीवर जातो.

या मधल्या काळात बाई आत्मरत व अंतर्मुख होत होत्या. आर्त, भयभीत होऊन पंढरपूरच्या विठोबाला मिठी मारीत होत्या. आपल्याला झालेल्या आजारामुळे मृत्यूने पाठ धरली आहे, याची तीव्र जाणीव त्यांना झाली होती; आसपासच्या सर्वांना ती झाली होती.

कधी मृत्यू येऊन आपल्याला गाठील, याची त्यांना किती भीती वाटे, हे सुरुवातीलच्या काळात आसपासच्या माणसांना प्रकर्षाने जाणवे.

त्यांचा पंढरीचा विठोबा त्यांना बळ देत होता, की त्यांचे आत्मसामर्थ्यच एवढे मोठे होते, हे सांगणे कठीण; पण मृत्यूच्या या भीतीवर त्यांनी मात केली होती.

'एकाकी' हा एक उत्तम-कलात्मक निबंध आहे.

'एकाकी' मध्ये त्यांना झालेले एकाकीपणाचे ज्ञान, त्या ज्ञानाची, तेजाच्या लोळाची प्रखरता प्रकर्षाने जाणवते, ती 'भटके' आणि एकाकी' हे निबंध एकाच वेळी वाचले म्हणजे.

माणूस जगात एकटाच येतो आणि एकटाच जातो. त्याचे सुखदु:ख भोगायला जन्माचा सोबती, मुले, लेकरे, सगेसोयरे असे कितीही वाटेकरी जोडले तरी हा सुखदु:खांचा भार ज्याचा त्यानेच उचलावा लागतो. जो-तो खऱ्या अर्थाने एकटा असतो; एकाकी असतो. हे समजणे आणि उमजणे यात फरक असतो. अलीकडे हे बाईंना उमजले होते, असे त्यांच्या बोलण्यावरून वाटते.

'किंकाळी' हा उत्तम ललित-निबंध तर आहेच, पण त्यात ॲब्सर्डिटीचा धागा आहे.

'किंकाळी'सारख्या लेखात दिसते की, चूक आणि बरोबर हे सापेक्ष असते. नुसते एका प्रसंगापुरते नसते, तर जन्मभर आपण जे करीत आलो, त्यात चूक किती आणि बरोबर किती, याचे परिशीलन करणे कधी संपतच नाही. बाई सगळ्या आयुष्याला चूक-बरोबरच्या खात्यात बसवून उलट-सुलट विचार करीत असत. स्वत:च्या चिंतनात त्यांनी स्वत:चे जीवन परीक्षेसाठी, कसोटीसाठी ठेविले होते, आणि शेवटी त्या अशा निष्कर्षाला आल्या होत्या की, आपण आपल्याला योग्य वाटेल ते कर्तव्यबुद्धीने स्वत:शी प्रामाणिक राहून केले. याच्या पलीकडे ज्या चुका झाल्या असतील, त्यांचे परिणाम आपण भोगलेच पाहिजेत. कारण सर्वार्थांनी बरोबर असे वागता येत नाही. निदान आपल्याला तरी ते साधलेले नाही, ही त्यांना झालेली जाणीव त्या सहज सांगून जातात.

'उकल'मध्ये असाच स्वत:शीच चाललेला स्वत:चा झगडा त्यांनी मांडला आहे. १९५९-पासून त्यांना मृत्यूची जाणीव तीव्रतेने झाली होती; पण मृत्यूच्या भीतीने हातपाय गाळून न बसता त्या नव्या उमेदीने कामाला

लागल्या होत्या. मृत्यूचे आव्हान त्यांनी स्वीकारिले होते. त्याचप्रमाणे त्या जास्त अंतर्मुख बनल्या होत्या.

सत्याचे दर्शन फार भयंकर असते. ते पहायला मनाला बळ यावे लागते. जोपर्यंत माणूस आपल्या मनाच्या किमयेने सत्याकडे डोळेझाक करितो, तोपर्यंत एका अर्थाने तो सुखी असतो; पण या पेटाऱ्याचे दार उघडून त्यातले सत्य पाहण्याची धडपड सुरू झाली, म्हणजे शेवटाला जाईपर्यंत ते चैन पडू देत नाही . आणि सगळ्यांत कसोटीची अवघड गोष्ट अशी आहे की, सत्याचे ज्ञान झाल्यानंतर त्याचा आविष्कार सहन करण्याचे बळ राहणे हे कार्य महाकठीण.

या सत्याबद्दल बोलताना इरावतीबाई काही मृत्यूच्या जाणिवेबद्दल बोलत नाहीत, तर स्वत:च्या भावनेबद्दल बोलतात. स्वत:च्या निरपेक्ष प्रेमाचीही त्या अशीच चिरफाड करितात. दुसऱ्याबद्दलचे वाटणारे प्रेम, दुसऱ्याची काळजी म्हणजे स्वत:ला स्वत:बद्दल वाटणाऱ्या काळजीचे, प्रेमाचे, भीतीचेच ते एक स्वरूप आहे. माणसाचे स्वत:वरचे प्रेम हेच काय ते खरे. हा सगळा अटाट आपण करितो, हा पसारा मांडतो तो स्वत:साठी,- स्वत:वरच्या प्रेमानेच मांडलेला असतो. म्हणूनच आपण त्यात इतके गुंतून पडतो; ते का, असे प्रश्नचिन्ह आहे.

स्वत:च्या मनाची चिरफाड करणे आणि त्याचा आविष्कार सोसण्याएवढी मनाची तयारी करणे या दोन्ही स्थितींत माणसाने सतत आत्मचिंतन तर केले पाहिजेच; पण स्वत:शी अत्यंत कठोर झाले पाहिजे.

इरावतीबाई स्वत:ला अशा सारख्या भट्टीत घालीत होत्या. स्वत:मधले हिणकस जाळून टाकण्याची धडपड करीत होत्या. आणि त्या धडपडीतून स्वत:ला तावून-सुलाखून घेतानाच त्यांना 'हे सर्व तूच आहेस' याची जाणीव झालेली असावी.

हिटलरने ज्यूंच्या केलेल्या शिरकाणात कर्वे-कुटुंबियांचे अनेक जवळचे स्नेही मारिले गेले. त्यामुळे हिटलरचे नाव काढिले की, त्या सात्त्विक संतापाने उफाळून उठत.

कुठे अन्याय झालेला दिसला की, प्रथम त्या अन्यायाच्या विरुद्ध प्राणपणाने विरोध केल्यासारखा अन्यायाला विरोध करीत. त्या घटनेला, त्या व्यक्तीला न्याय मिळेपर्यंत विरोधाला तोंड देत. न्याय मिळेपर्यंत त्यांना चैन पडत नसे; परंतु म्हणून असे कोणी समजण्याचे कारण नाही की, त्यांना

विरोध करणाऱ्या माणसांच्याबद्दल बाईंच्या मनात द्वेष किंवा चीड असे.

अन्याय्य कृत्य करणाऱ्यांबद्दल त्यांच्या मनात अपार करुणा होती, हे मला माहीत आहे; ती मला जाणवलेली आहे.

त्यांना कोणी कितीही दुखावले असले, तरी त्या माणसाला न्याय देताना त्या स्वत:शी तर कठोर होतच; पण आपल्या माणसाच्या विरुद्ध त्या न्यायाच्या बाजूने उभ्या राहत.

त्यांच्या पहिल्या सूनबाईशी त्या जे वागल्या ते ज्यांना माहीत आहे, त्यांना मी लिहिते यात अतिशयोक्ती वाटणार नाही.

डेक्कन कॉलेजमधील प्रकरणात अनेक माणसे त्यांना दोष देताना मी ऐकिले आहे. बाईंना जे अन्यायाचे वाटले, त्याविरुद्ध त्या सर्व शक्तीनिशी झगडल्या, हे जितके खरे, तितकेच त्या ज्यांच्याशी झगडल्या त्यांच्यावर त्यांचा मनापासून राग नव्हता, हेही खरे.

ज्या हिटलरबद्दल त्यांना अत्यंत घृणा होती, तेही स्वत:चेच एक रूप आहे, हे झालेले सत्याचे दर्शन त्यांनी मनोमनी स्वीकारिले होते.

बाईंची वृत्ती 'मऊ मेणाहुनी आम्ही विष्णुदास । कठीण वज्रास भेदू ऐसे' अशीच होती. बाईंच्या लेखांसंबंधी हे लिहीत असताना बाईंना कुणी संतीण बनविण्याचा माझा हेतू नाही. पण या मार्गावरील साधकांपैकी त्या एक होत्या.

स्वत:मधील हिणकस नष्ट करण्याची धडपड करणारा तो एक अत्यंत प्रामाणिक आत्मा होता, की ज्याने स्वत:च स्वत:शी कठोर आत्मपरीक्षण करून स्वत:ला तावून-सुलाखून घेण्याचा आटोकाट प्रयत्न केला आहे.

या 'गंगाजला'बद्दल एवढे लिहिण्याचे कारण नव्हते; पण या संग्रहातील हे निबंध बाईंची अनुभूती सांगत असले तरी ही अनुभूती लौकिक किंवा प्रापंचिक नाही. त्यांच्या नित्याच्या व्यवसायातील, शास्त्रातील नाही, तर ती सर्वस्वी आत्मचिंतनात्मक आहे.

१९५३ सालापासून ७० सालापर्यंत आम्ही एकमेकींच्या फार निकट होतो असे मला जाणवले, म्हणून या निबंधांची मोड सांगण्याचा हा प्रपंच केला.

– सुलोचना देशमुख



प्रा. नरहर कुरुंदकर, डॉ. इरावती कर्वे.

# प्रस्तावना

इरावतीबाई कर्वे यांच्या ललितनिबंधांचा हा तिसरा आणि शेवटचा
संग्रह प्रकाशित होत आहे. ललितवाङ्मय हा इरावतींच्या आवडीचा व
वाचनाचा खास भाग असला, तरी त्यांच्या लेखनाचा आणि चिंतनाचा तो
खरे म्हणजे खास भाग नव्हता. त्यांचे मन फुलपाखरांप्रमाणे अधूनमधून
वेगळ्या-वेगळ्या विषयांचा आस्वाद घेत इतस्ततः उडणारे असे नव्हते.
जन्मभराचा व्यासंग त्यांनी एकाच विषयाचा केला, तो समाजशास्त्राचा. पण
समाजशास्त्राचा व्यासंग करिताना एका जिवंत, संवेदनाशील व्यक्तीच्या
मनात जी अस्वस्थता निर्माण होते ती अस्वस्थता, आणि जी वादळे निर्माण
होतात तशी वादळे इरावतींच्याही मनात निर्माण होत; आणि मग नित्याच्या
अभ्यासाशी एका बाजूने जोडलेले तर एका बाजूने शास्त्राच्या चौकटीतून
मोकळे झालेले असे काही अनुभव त्यांच्या मनात तरळू लागत. या
अनुभवांना अभिव्यक्तीची वाट मोकळी करून देताना इरावतींचा
ललितनिबंध आकार धारण करीत आला आहे.

मराठी वाङमयात काही नियतकालिकांना नव्या प्रयोगांच्या दृष्टीने
एक विशेष मानाचे असे स्थान आहे. अशा प्रकारचे 'अभिरुची' नावाचे एक
नियतकालिक पूर्वी बडोद्याहून निघत असे. त्या 'अभिरुची' ची आणि
प्रथमदर्शनी तरी तुटक, फटकळ आणि तुसड्या वाटणाऱ्या इरावतींची रुची-
कशी कोण जाणे! पण जुळली आणि बाई 'अभिरुची'मध्ये लिहू लागल्या. या
शास्त्रीय लिखाणाखेरीज असणाऱ्या मराठी लेखनाचा एक संग्रह इ.स.१९४९
साली 'परिपूर्ति' या नावाने प्रकाशित झाला. लेखनाच्या आरंभापासूनच

रसडोळस वाचकांचे लक्ष इरावतींच्या लिखाणाकडे खेचले गेलें होते. ललितनिबंधाच्या काही नव्या वाटा इरावतींच्या लिखाणातून प्रकट होत आहेत, असे त्या वेळी कुणाला जाणवले की नाही, हे नक्की सांगता येणार नाही. पण या लेखणीची मोहकता मात्र चटकन वाचकांचे मन वेधून बसली. तेव्हापासून आजतागायत अधूनमधून इरावतींनी ललितनिबंधाच्या वर्गात घालता येईल, अशा प्रकारचे लिखाण केले आहे. या अशा ललित लिखाणाचा 'परिपूर्ति' आणि 'भोवरा' यानंतर येणारा हा तिसरा संग्रह आहे.

एक वाङमयप्रकार म्हणून ललितनिबंध या वाङमयप्रकाराचा विचार इरावतीबाईंनी केला असेल, असे वाटत नाही. उलट, या वाङमयप्रकाराचा जाणीवपूर्वक शोध त्यांनी घेतला नव्हता, याच्याच खाणाखुणा त्यांच्या लिखाणात जागजागी आढळतात; आणि झाली गोष्ट एका अर्थी बरीच झाली, असेही वाटते. ललितनिबंध या वाङमयप्रकाराचा विचार इरावतीबाईंनी जर जाणीवपूर्वक केला असता, तर कदाचित आपण ललितलेखक नव्होत, या जाणिवेने त्यांनी लिखाणच केले नसते; किंवा जाणीवपूर्वक ललितनिबंध लिहिण्याचा जर त्यांनी प्रयत्न केला असता, तर आज त्यांच्या लिखाणात जो जिवंतपणा आणि ठराविक आकृतिबंध फोडून बाहेर पडणारा चैतन्यांचा आविष्कार दिसतो, तसा तो कदाचित दिसलाही नसता. 'आपण जे लिहीत आहो, त्याचे स्वरूप खरोखरच लालित्याचे आहे काय?' असा मन पोखरणारा भुंगा जर वेळोवेळी बाईंच्या मनात गुंजन करू लागला असता, तर त्या चमत्कारिक दडपणामुळे त्यांच्या हातून एक निर्जीव, साचेबंद पण सजविलेले असे एखादे मखर आपल्या हाती आले असते. माझा आणि त्यांचा परिचय त्यांच्या आयुष्याच्या सायंकाळी झाला. सायंकालीन, मावळती व म्हणून कोवळी झालेली अशी कांती त्यांच्या मनस्वी वागणुकीवर त्या काळी पसरली होती. पण या शेवटच्या काळातसुद्धा वाङमयाचा उल्लेख त्या अधून-मधून थोड्याशा हेटाळणीनेच करीत.

'तुम्ही कादंबरीकार, तुम्ही कवी, तुम्ही ललितलेखक,' असा आरंभ करून त्या मधूनमधून सुचवीत की, ललितवाङमयाचा पसारा कल्पनेचा आणि खोटा असतो. सत्याच्या जवळ जाण्याची ललित-लेखकांना इच्छा नसते. बाईंच्या या लिखाणाचा प्रतिवाद करून कलात्मक सत्याची महती त्यांना पटवून द्यावी अशी इच्छा मला कधीही झाली नाही. ऐन तारुण्यात जे

मराठी वाङमय बाईंनी वाचलेले होते, त्या वाङमयाचा सवंग भोळेपणा, त्यातील खोटे स्वप्नरंजन कुठेतरी बाईंच्या मनावर दाट संस्कार करून गेले होते. त्या संस्कारानिशी त्या बोलत असत. आणि तरीही जणू अकृत्रिम आणि मर्मस्पर्शी अशा लालित्याचा गाभा आपल्या हातात सापडला आहे, असे त्या लिहीत असत. जोपर्यंत त्या कोणतीही कृत्रिम बंधने मनावर न लादता मोकळेपणाने लिहीत होत्या, आणि त्यांच्या लेखणीची धार नेहमीच मुलायम आणि त्याच वेळी तीक्ष्ण होती, तोपर्यंत खुर्चीवर बसून आपल्या उंच आणि किनऱ्या आवाजात माझ्याकडे अगर रणजित देसाईंकडे बोट दाखवून त्या ललितवाङमयाविषयी काय बोलत होत्या, याचा फार गंभीरपणे विचार करण्याची मला गरज वाटली नाही.

१९४५ नंतर केव्हातरी बाईंनी मराठीतून लिहिण्यास आरंभ केला. ज्या वातावरणात त्या लिहीत होत्या, त्या वातावरणात गुजगोष्टी ऊर्फ ललितनिबंध ऊर्फ लघुनिबंध हा वाङमयप्रकार कोमेजून गेलेला होता. जेव्हा त्याचे रंग टवटवीत होते, तेव्हाही या वाङमयप्रकारातील कृत्रिमपणाची जाणीव त्या वेळच्या काही रसिकांना होत असावी, असे माझे अनुमान आहे. जे आदर्श डोळ्यांसमोर ठेवून मराठीत ललितनिबंध निर्माण झाला, ते आदर्श खऱ्या अर्थाने ललितवाङमयाचे आदर्श नव्हते. आपली स्फूर्तिस्थाने म्हणून आद्य मराठी लघुनिबंधकारांनी ज्या इंग्रज लेखकांचा आवर्जून उल्लेख केला आहे, त्या मूळ प्रेरकांच्याच लिखाणाविषयी ते खरोखरी ललितवाङमय आहे, की तेथे असलेल्या शोभेचा व सजावटीचा ललितवाङमय म्हणून चुकून स्वीकार झाला आहे, याविषयी माझे मन साशंक आहे.

नित्याप्रमाणे मराठी ललितनिबंधांच्या बाबतीतसुद्धा 'त्यांचा जनक कोण?' हा प्रश्न अजून विवाद्य राहिलेला आहे. प्रा.ना.सी.फडके यांचे असे मत आहे की, आपण स्वतः या वाङमयाचे जनक आहोत. गार्डिनर, चेस्टरटन आणि लिंड इत्यादिकांचे निबंध वाचताना फडके यांना असे जाणवले की, मराठीत अशा प्रकारचे लिखाण का नसावे? आणि मग त्यांनी जाणीवपूर्वक हा नवा वाङमयप्रकार जन्माला घातला. त्यांनी लिहिलेला 'सुहास्य' हा पहिला ललित निबंध किंवा ही पहिली 'गुजगोष्ट' इ. स. १९२५ सालची आहे. या ठिकाणापासून मराठी ललितनिबंधांना आरंभ झाला, असे फडके यांचे मत आहे. अर्थातच हे मत भाऊसाहेब खांडेकरांना मान्य असणे शक्य नव्हते. खांडेकरांनी आपले निवेदन सादर करिताना असे

म्हटले आहे की, आपल्या मनात वेळोवेळी अनेक अनुभव जागे होत असत. ह्या अनुभवांना नेहमीच कथेचे अगर निबंधाचे रूप देता येणे शक्यही वाटेना, इष्टही वाटेना; म्हणून आपण वेगळ्याच प्रकारे लिहिण्याचा प्रयत्न केला. इंग्रजी लघुनिबंध आपल्या वाचनात त्यानंतर आला. इ.स.१९२७ साली आपल्या ललितनिबंधांना आरंभ करिताना त्यांच्या डोळ्यांसमोर दुसरे काही नव्हते. कदाचित खांडेकरांना असे सुचवायचे असेल की, फडके आणि आपण या दोघांनी एकच वाङमयप्रकार जरी निर्माण केलेला असला, तरी फडके यांची प्रेरणा इंग्रजीतील हा वाङमयप्रकार मराठीत आणण्याची होती. भाऊसाहेबांची प्रेरणा मात्र स्वतःला जाणवणाऱ्या अनुभवांना आकार शोधण्याची होती. पण हा वाद येथे संपणारा नाही. कारण अनंत काणेकरांनी आपले निबंध लिहिण्यास १९३३च्या सुमारास आरंभ केला. पण त्यांचेही म्हणणे असेच आहे की, त्या वेळपर्यंत आपल्या डोळ्यांसमोर फडके किंवा खांडकेर यांचा ललितनिबंध नव्हता.

'मराठीतील ललित-निबंधाचा जनक कोण?' याचे उत्तर इतक्या सरळपणे देता येणे शक्य नाही. कारण फडके-खांडेकरांच्याही पूर्वी शिवरामपंत परांजप्यांचे निबंध होते. वत्सलावहिनींची पत्रे होती. अच्युत बळवंत कोल्हटकरांचे विविध लेख होते. वैचारिक निबंध कोणत्या ठिकाणी संपला आणि वैचारिकाची जागा ललित-निबंधाने नेमक्या कोणत्या ठिकाणी घेतली, ही विभाजक रेषा फारशी स्पष्ट असणे कधीच शक्य नसते. कारण वैचारिक निबंधातही आपला मुद्दा समजावून सांगण्यासाठी दृष्टान्त आणि कहाण्या यांचा वापर केलेला असतोच; या दृष्टान्तांची आणि कहाण्यांची लांबी रुंदी किती असेल, यालाही नियम नसतो. त्यांची संख्या किती असावी, यालाही बंधन नसते. दासोपंतांच्यासारखा एखादा गीताभाष्य-लेखक अद्वैत-तत्त्वज्ञान सांगताना लांब-रुंद अशी कहाणी सांगून जातो.

एकच मुद्दा मनावर ठसविण्यासाठी ज्या वेळी अनेक गोष्टी सांगितल्या जातात, किंवा ज्या वेळी एका मुद्द्याच्या अनेक बाजू स्पष्ट करण्यासाठी अनेक गोष्टी सांगितल्या जातात, त्या वेळी विवेचन तर्कशुद्ध आणि तर्कप्रमाण नसते. म्हणून त्या ठिकाणी ललितनिबंधांचा अवतार झाला, असे समजावे. ही भूमिका नुसती ढोबळच नसून उघडउघड चुकीची आहे. कारण ह्या भूमिकेप्रमाणे पाहता ठरलेला बोध देण्यासाठी गोष्टी सांगणारे इसाप आणि विष्णुशर्मा आद्य लघुनिबंधकार ठरण्याचा संभव आहे. एक मुद्दा

मांडण्यासाठी एक गोष्ट सांगितली काय, किंवा तो मुद्दा अधिक बळकट व्हावा म्हणून अनेक गोष्टी सांगितल्या काय किंवा एकाच गोष्टीचे निरूपण करून त्यातून नानाविध प्रकारांचा बोध काढिला काय, विवेचनाची मांडणी तार्किक असेल तो वैचारिक निबंध, आणि, जेथे विवेचनाची मांडणी तार्किक नसेल तो मात्र ललित-निबंध, या भूमिकेला मान्यता देता येणे कठीण आहे. शास्त्र आणि ललितवाङ्मय यांच्यातील सीमारेषा मांडणीची तर्कनिष्ठता किंवा मांडणीची अतार्किकता ही नसते. हा मांडणीवरून निर्माण होणारा फरक नाही; तर तो मूळ भूमिकेचाच फरक आहे, फडके काय, खांडेकर काय, की काणेकर काय, त्यांच्या दृष्टीने ललित-निबंध हा निबंधच होता; फक्त त्याची मांडणी निराळी होती. ही भूमिका त्यांनी जाणीवपूर्वक घेतली होती काय? ती त्यांच्या मनात होती काय? हे प्रश्न वाङ्मयाच्या चर्चेत-अप्रस्तुत आणि गैरलागू आहेत. फडके, खांडेकर, काणेकर यांच्या मनात काय होते, हा मुद्दा तिघांनाही आत्मवृत्तांत स्पष्ट करण्यासाठी मोकळा ठेविला पाहिजे. पण त्यांच्या वाङ्मयाचे स्वरूप मात्र वर सांगितल्याप्रमाणे, म्हणजे मांडणीची सीमारेषा ठरविणारे असे आहे.

मराठीतील टीकाकारांना खांडेकरांचे सगळेच ललितवाङ्मय नेहमीच कृत्रिम वाटत आले आहे. तेव्हा त्यांना खांडेकरांचा लघुनिबंध कृत्रिम वाटला, तर त्यात आश्चर्य वाटण्याजोगे काही नाही. इतर वाङ्मयप्रकारांचे काहीही असो, पण खांडेकरांचा ललित निबंध कृत्रिम असला तरी मनोरंजक आहे, याविषयी माझ्या मनात शंका नाही. उदाहरण म्हणून खांडेकरांचा 'श्रावणा' सारखा ललित-निबंध घेतला, तरी हा मुद्दा स्पष्ट होऊ शकेल. 'जीवनात सुखे आहेत, दुःखे आहेत, हसणे-रडणे, वासना-क्षोभ हे सगळेच जीवनात आहे. पण यांपैकी एकही जीवनाचे मूल्य नाही. संयम हे जीवनाचे खरे मूल्य आहे.' असा मुद्दा खांडेकरांना पटवून द्यावयाचा आहे. त्यासाठी 'श्रावण' या ललित-निबंधाचा जन्म आहे. जर हा निबंध वैचारिक असता, तर खांडेकरांनी त्याची मांडणी निराळी केली असती. पण कुठल्यातरी अनौपचारिक आणि अप्रस्तुत भासणाऱ्या घटनेने आरंभ करून खांडेकर वाचकांना कृत्रिम अशी भुरळ घालू इच्छितात. कुणीतरी पोरगा त्यांची मुलाखत घेण्यासाठी आलेला आहे. तो अनेक प्रश्न विचारीत आहे. विचारिता-विचारिता एक प्रश्न तो मुलगा विचारितो, "तुमचा आवडता महिना कोणता? आणि खांडेकर सांगतात, "आवडता महिना श्रावण."

यांनतर विविध स्मृती चाळविल्या जातात. वेळोवेळी आपले आवडते महिने बदलत कसे गेले, हे सांगताना खांडेकर विविध महिन्यांची नावे घेतात. शेवटी श्रावणावर येऊन संयमाचे महत्त्व सांगून हा लघुनिबंध संपवितात. सहजगत्या घडलेल्या एका संवादापासून आपण आरंभ करतो आहो, असा लेखकाने कितीही जरी आविर्भाव केला, तरी वाचकांच्या दृष्टीने एक सत्य शिल्लक राहते. ते म्हणजे, काय सांगायचे हे लेखकाने आधी निश्चित केलेले होते; आणि नंतर ते कसे सांगायचे, याची रूपरेखा आखली होती. वाचताना जरी लघुनिबंधाचा आरंभ अप्रस्तुतापासून दिसत असला, व शेवट प्रस्तुतावर होत असला, तरी लेखकाच्या मनात मात्र प्रस्तुत आधीच निश्चित ठरलेले होते. नजरेसमोर प्रस्तुत ठेवून लेखक अनुरूप अप्रस्तुतापासून आरंभ करितो व मग एखादा कुशल खेळाडू समोरच्या गड्यासमोर चेंडू खेळवीत बसतो, त्याप्रमोण लेखक वाचकाला खेळविण्याचा प्रयत्न करितो, आणि चटकन गोल मारून प्रस्तुत गाठतो. हाच प्रकार जर ललित-निबंध म्हणून येणार असेल, तर मग त्यातली गोडी फार वेळ टिकणे शक्य नव्हते. शेवटचा परिच्छेद वाचल्यानंतर तो ललित निबंध फार वेळ वाङ्मयीन समाधान देणारा उरू शकत नव्हता. हा वैचारिक निबंधच होता. पण लहान मुलांना गोष्टीरूपाने नीतिबोध करावा, त्याप्रमाणे या लिखाणात आपली मते वाचकांच्या गळी उतरवावी, हा सौदा पटविण्यासाठी कुशल मध्यस्थाप्रमाणे लेखक अघळपघळ गोष्टी सांगत होते. ह्यात क्रीडा असली, आणि कौशल्य असले, तरी ते लेखकाचे होते. वाचकांच्या खऱ्या भुका यामुळे तृप्त होणे कठीण होते.

खांडेकरांच्या ललित-निबंधाविषयी हे आणि यासारखे असे कितीही विवेचन मी केले तरी मराठी टीकाकार त्यामुळे रागावण्याचा संभव कमी आहे. कारण खांडेकर वाचकांचे नेहमीच आवडते आणि टीकाकारांचे तितकेच नावडते लेखक राहिले. पण जे खांडेकरांच्या लघुनिबंधाचे रूप आहे, तेच फडके यांच्याही गुजगोष्टीचे रूप आहे. फडक्यांनी कितीही जिव्हाळ्याने सांगण्याचा अभिनय केलेला असो, आणि कितीही रेखीवपणे त्यांनी त्याची मांडणी केली असो, त्या लिखाणाचे मूळ रूप तेच होते. फडक्यांचाही निबंध अप्रस्तुतापासून सुरू होई. तेथून वाचकांना भुलवीत-भुलवीत प्रस्तुतापर्यंत फडके प्रवास करीत. शेवटच्या परिच्छेदात प्रस्तुत सांगून ते मोकळे होत. 'माणसाला जे मिळत नाही, ते हवे असते, मग ते

कितीही वाईट का असेना. जे मिळते त्यावर समाधान नसते, मग ते कितीही चांगले का असेना. हा अप्राप्याचा हव्यास ही माणसाची प्रवृत्ती आहे.' हे फडक्यांचे प्रस्तुत. मग जिव्हाळ्याने फडके सांगू लागतात की, 'माझ्या मित्राकडे गोजिरवाणी अशी दोन लहान मुले आहेत. त्यामुळे त्याच्या घरात आनंद बहरलेला आहे. मी मित्राकडे जातो, तेव्हा मुलांच्यासाठी काही घेऊन जातो. एकदा खेळण्यातल्या दोन आगगाड्याच मी नेल्या.' यापुढचा फडक्यांचा मुद्दा अगदी स्पष्ट आहे. तो म्हणजे दोन्ही आगगाड्या सारख्याच होत्या. एक याला दिली, एक त्याला दिली, पण लवकरच दोघेही भांडू लागली. कारण प्रत्येकाला आपल्याला मिळालेले खेळणे हिणकस वाटत होते. ज्या प्रस्तुताकडे जाण्यासाठी हे अप्रस्तुत आहे, त्याला मुले दोनच असणे, खेळणी सारखी असणे हे आवश्यक होते. दोन्ही खेळणी मला एकट्यालाच हवी, असा हट्ट धरणारे मूल फडक्यांच्या दृष्टीने सोयीस्कर नव्हते. शेवटी फडक्यांचाही लघुनिबंध कोणतातरी मुद्दा पटवून देण्यासाठीच आहे. बोध अगर उपदेश हे वाङमयाचे प्रयोजन नव्हे; कला ही शुद्ध कलेसाठी आहे; असा नित्य उद्घोष करणाऱ्या फडके यांच्या गुजगोष्टींचे स्वरूप मात्र प्राधान्याने उपदेशप्रधान, म्हणजे हा किंवा तो मुद्दा पटवून देण्यासाठी निबंध- असे आहे.

ही अडचण फडके किंवा खांडेकर यांची नव्हती. दोघांच्याही डोळ्यांसमोर आदर्श म्हणून असणाऱ्या गार्डिनरच्या निबंधांचे स्वरूप असेच होते. कारण तोही गोष्टीवेल्हाळपणे कोणता-ना-कोणतातरी उपदेश इंग्लंडच्या जनतेला करू पाहत होता. त्याचाही प्रत्येक निबंध कोणत्यातरी मुद्द्याच्या सिद्धीकडेच जात होता. मुद्दा सांगण्यासाठी निबंध, विचार गळी उतरविण्यासाठी निबंध, हे जे निबंधाचे मूळ रूप त्याला गोष्टींची जोड दिल्यामुळे तो उपदेश शास्त्राप्रमाणे कठोर राहिला नाही. पण उपदेश कान्तासम्मित झाला, तरी त्याची मूळ प्रवृत्ती उपदेशाचीच आहे. काणेकरांच्या विरोधाभासात्मक मांडणीमुळे हे उपदेशप्रधान स्वरूप चटकन जाणवत नाही. त्यांचे संवादकौशल्य, त्या निबंधात असणारा अवखळ विनोद, गणूकाकांची रमणीय व्यक्तिरेखा या सगळ्यांनी मन जिंकले, तरी तोही निबंध शेवटी मुद्दा पटवून देण्यासाठीच आहे. त्यातील उरलेल्या सर्व बाबी सजावटीच्या आहेत. आपण मुद्दा पटवून देत आहो, एक विचार वाचकांच्या मनात पेरीत आहो, हे वाचकांच्या लक्षात येऊ नये, म्हणून कधी

कथा, कधी आठवणी, कधी संवाद, कधी दिलखुलासपणाचा भास निर्माण करणारी पण योग्य ठिकाणीच घेऊन जाणारी विषयांतरे हा सगळा सजावटीचा भाग होता. विविध कारागिरीने सजविलेल्या या मखरात ठराविक बोधाचा गणपती निश्चलपणे मांडी घालून बसलेला असे. कुणाची सजावट कृत्रिम पण देखण्या फुलांची होती; कुणी या फुलांच्याऐवजी वनश्री आणि झाडेझुडपे, पाने-फुले, वारे-तारे गोळा करून आणली होती; कुणी मखर म्हूणन वादविवाद करणारे जय-विजय दारावर उभे केले होते; पण ती होती सगळी सजावटच.

हा निबंध रंजक नव्हता, आकर्षक नव्हता, किंवा वाचकांचा आवडता नव्हता, असा याचा अर्थ नाही. कारागिरी आणि करमणूक यांतही वाचकांना बांधून ठेवण्याचे सामर्थ्य असतेच. तिथेही विरंगुळा असतोच; पण लेखनातील ही आकर्षकता आणि मोहकता म्हणजे लालित्य नव्हे; ती कलात्मकता नव्हे; एवढेच येथे सुचवावयाचे आहे. लघुनिबंध म्हटले तरी निबंध, ललितनिबंध म्हटले तरी निबंध, आणि निबंध म्हणजे मुद्दा पटवून देणे, ही जोपर्यंत भूमिका आहे, आणि जोपर्यंत गुजगोष्टी तात्पर्यासाठी आहे, तोपर्यंत सगळेच प्रकार विशेष मांडणीचे ठरतात. प्रकृती ठरीव, मुद्दा सांगणारी आणि सजावट शोभेची. या वर्तुळाला छेद देता येणे या ललितनिबंधाला शक्य नव्हते. कारण वर्तुळाच्या बाहेर पडण्यासाठी लागणारी खरी चिंतनशीलता किंवा खरी संवेदनक्षमता फडके, खांडेकर, काणेकर यांच्या प्रकृतीतच नव्हती. म्हणून हा वाङ्मयप्रकार १९४० नंतर क्रमाने कोमेजला होता. १९४५ नंतर तर तो सुकल्यासारखाच वाटत होता. शेवटी रंजक उपदेशाला कलेचा जिवंतपणा लाभेल, ही अपेक्षाच चुकीची होती.

या वातावरणात इरावतींच्या ललित-निबंधाने आपली पहिलीवहिली पावले टाकली. बाईंच्याबरोबर आणखी एका लेखिकेचा आवर्जून उल्लेख केला पाहिजे. ती लेखिका म्हणजे कै.कुसुमावतीबाई देशपांडे ह्या होत. कुसुमावतीबाईंच्या आकलन-अवलोकनाचा परिघ आणि खोली यांना फार मोठ्या मर्यादा होत्या भोवतालच्या निसर्गजीवनाचे हळुवारपणे चित्रण करण्याचा प्रयत्न करितानाही त्या सांकेतिकता पूर्णपणे बाजूला सारू शकत नव्हत्या; पण या साऱ्या मर्यादा मान्य करूनही कुसुमावतीबाईंच्या रूपाने हळवे, स्वप्नाळू आणि खरेखुरे संवेदनक्षम मन मराठी ललितनिबंधात प्रथमच

व्यक्त होत होते. महायुद्धोत्तर काळात मराठी लघुनिबंध फार मोठ्या जोमाने विकसित झाला असे म्हणता येणार नाही, तरी सुद्धा ललितनिबंधातील खरी कलात्मकता आणि खरे लालित्य याचनंतरच्या काळात अभिव्यक्त झाले. विंदा करंदीकर, श्रीनिवास कुलकर्णी, पाडगावकर आणि या सर्वांना काकणभर सरस असणारा अनेकपदी, गुंतागुंतीच्या, सूक्ष्म, भावगर्भ व विचारगर्भ अनुभवांना शब्दबद्ध करणाऱ्या दुर्गा भागवत यांचा ललितनिबंध या कालखंडातील आहे. ज्याला खऱ्या अर्थाने एखाद्या वाङ्मयप्रकाराचा विकास म्हणता येईल, तो या लेखकांच्या ललितनिबंधामध्ये जाणवतो. इरावतीबाईंच्या ललितनिबंधाकडे या नव्या आणि खऱ्याखुऱ्या ललितनिबंधाचा अग्रदूत म्हणून पाहिले पाहिजे.

इरावतींचे मन त्यांच्या विशिष्ट जीवनक्रमामुळे तीन पातळ्यांवर वावरणारे मन होते. आपण संसार मांडलेल्या गृहिणी आहो, पत्नी या नात्याने व माता या नात्याने आपणांवर पडणाऱ्या जबाबदाऱ्या आपण पार पाडल्या पाहिजेत, ही गृहिणीची भूमिका त्यांच्या मनातून काही बाजूला सरकली नाही. त्या एक कर्तव्यदक्ष गृहिणी होत्या, असे म्हणणे त्यांच्यावर थोडेसे अन्यायकारक होईल. कारण संसार त्यांनी कर्तव्य म्हणून पतकरिलेला नव्हता, गृहिणीची भूमिका कर्तव्य म्हणून पार पडलेली नव्हती. मनाने सुसंस्कृत असणाऱ्या आणि जीवनात रस घेणाऱ्या या विदुषीला आपण स्त्री आहोत, गृहिणी आहोत, याची उपजत जाणीव होती. मातृत्वात आपल्या जीवनाची परिपूर्ती आहे, याचीही उपजत जाणीव होती. म्हणून त्या घरात, संसारात, आपल्या प्रिय पतीत, मुलाबाळांत मनाने समरस झालेल्या आणि रमलेल्या आहेत. तो जणू त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा एक उपजत धर्म आहे. त्यात कर्तव्याच्या भावनेपेक्षा अंगभूत आपलेपणाची भावना अधिक महत्त्वाची आहे. या गृहिणीपदातून निर्माण झालेले मन हा इरावतींच्या मनाचा एक कायमचा भाग आहे. कोणत्याही प्रश्नाचा विचार करिताना आपण एक सांसारिक स्त्री आहो, या जाणिवेचा विसर त्यांना कधी होत नाही.

पण ही सांसारिक स्त्री दुसऱ्या बाजूने समाजशास्त्रज्ञ आहे. समाजशास्त्राच्या अध्ययनात एकतर त्यांना संपूर्ण भारतभर हिंडावे लागले. भारताच्या बाहेरही व्याख्यानांच्या निमित्ताने, अभ्यासाच्या निमित्ताने पाश्चात्त्य जीवनात त्यांना वावरावे लागले; आणि दुसरे म्हणजे विविध जाती,

विविध संस्कृती आणि विविध तत्त्वज्ञाने यांचा व्यासंग करावा लागला. मानववंशशास्त्रात त्यांना रस असल्यामुळे देशोदेशीच्या सहस्त्रावधी वर्षे प्राचीन असणाऱ्या, उत्खननातून बाहेर पडलेल्या संस्कृती, जगभर पसरलेले वन्य समाज, त्यांच्या चालीरीतींची विविधता आणि भारतीय संस्कृतीचा काही प्रमाणात बदललेला आणि काही प्रमाणात न बदलता तसाच उरलेला एक सांस्कृतिक आणि सामाजिक असा भव्य पट, या सर्वांच्या निकट परिचयामुळे हिंदू स्त्रीच्या मनात असणाऱ्या स्वाभाविक ग्रह-आग्रहांपासून आणि सांकेतिकतेपासून त्यांचे मन बरेच अलिप्त झालेले आहे. जीवनाची विविधता सतत न्याह्मळीत असल्यामुळे आणि उदारमतवादी वैचारिक भूमिकेत त्यांचे संगोपन झालेले असल्यामुळे त्या जीवनाच्या हिडीस आणि कुरूप भागाकडे तटस्थतेने पाहू शकतात. आत्मीय आणि आपल्या असणाऱ्या माणसांकडे त्यांनी कितीही जिव्हाळ्याने पाहिले, तरी त्यांच्यातला शास्त्रज्ञ नेहमी सावध, जागा असतो. आणि वासनांच्या चित्रणाचा त्यांनी जरी धसका घेतला नसला, तरी त्यांखेरीज असणाऱ्या जाणिवा त्यांना महत्त्वाच्या वाटतात. उपाशी माणूस अन्नाकडे जसे पाहतो, तसे वासनांचे विकृत आकर्षण त्यांच्याजवळ मुळीच नाही. एका तृप्त आणि व्यासंगी अशा मनाने, तृप्त झाल्यामुळे विरागी झालेल्या मनाने, व्यक्तीच्या आणि समाजाच्या सगळ्या दुःखांचा स्पर्श त्या वाचकांना घडवून देतात, आई ज्याप्रमाणे आपल्या मुलाच्या मलमूत्र विसर्जनाकडे पाहील, त्याप्रमाणे जीवनातील अभद्र आणि बीभत्स त्यांनी तटस्थ ममतेने न्याहाळिलेले आहे. हा त्यांच्या मनाचा अतिशय गुंतागुंतीचा आणि तितकाच महत्त्वाचा असा दुसरा भाग आहे.

आणि तरीही बाईंचे मन नवनवे अनुभव घेण्यासाठी, टिपण्यासाठी सदैव उत्सुक असणारे आहे; त्यांच्या मनाची संवेदनक्षमता भोवतालचे प्राणी, पशू पक्षी, निसर्ग, वनस्पती, पाने, फुले या सर्वांशी जवळीक साधणारी आहे. या संवेदनक्षम मनाने सहजगत्या निसर्गाची व भोवतालच्या समाजाची नानाविध चित्रे टिपलेली आहेत. ही चित्रे टिपताना सहवासाने आपले माणूस सुंदर वाटू लागते, तसाही प्रकार पुष्कळ वेळा घडलेला आहे. ज्यांचे बौद्धिक सामर्थ्य सामान्यांच्यापेक्षा थोडेसे अधिक असते, त्यांच्या इंद्रियांना प्रत्येक घटनेचा अर्थ हुडकण्याची एक अपसूक सवय लागलेली असते. या सवयीमुळे इंद्रियसंवेदनांचा जिवंत ताजेपणा अनुभविण्याची

त्यांची क्षमता मंदावलेली असते. आणि ज्यांची इंद्रिये रंग-गंधांच्या जाणिवांना हपापलेली असतात, ऐंद्रिय संवेदनेची प्रत्येक छटा ज्यांच्या मनाला जिवलग मैत्रिणीप्रमाणे मिठी घालते, त्यांची पुष्कळदा घटनांचा अर्थ लावण्याची क्षमता बोथट झालेली असते. इरावतींच्या बाबतीत घडले आहे ते असे की, त्यांच्या बौद्धिक क्षमतेने इंद्रियांची क्षमता अधिक डोळस केलेली आहे. त्यांच्या इंद्रियांच्या क्षमतेने बुद्धीचा काही प्रमाणात विकासच घडविलेला आहे, आणि कडे-खांद्यावर मुले घेऊन समाधानाने अडखळत चालणाऱ्या गृहिणीप्रमाणे त्यांच्या विशाल व्यासंगाने आद्य मानव-संस्कृतीपासून वर्तमानकाळापर्यंत आपली सौंदर्यबुद्धी व तर्कविलास यांच्यासह लीलया, हसत-हसत आणि नकळत प्रवास केलेला आहे.

असे हे तीनपदरी मन इरावतींच्या लिखाणात एका एकसंध व्यक्तिमत्त्वाचा भाग म्हणून अवतीर्ण होते. आणि म्हणून इरावतींचे लिखाण वाचताना पुष्कळदा वाचकाचे मन भारावून जाते, गोंधळून जाते. शास्त्रज्ञ आणि कवी असणारी ही गृहिणी ज्या वेळेला हळूच जवळ घेऊन कुरवाळीत असते, प्रकृतीची वास्तपुस्त करीत असते, त्या वेळी उगीचच हे जाणवत राहते की, हा जिव्हाळा खरा असला, तरी केवळ आपल्यापुरता मर्यादित नाही. कालच उत्खननात सापडलेल्या अस्थींचे सांगाडे हिने इतक्याच हळुवारपणे कुरवाळले असतील; आणि उद्या हिमालयाच्या सरहद्दीवर जिवंत माणसांच्या कवट्यांची मापे आणि रक्तांचे नमुने गोळा करण्यासाठीही जाणार असेल; ज्या कौतुकाने ही आपल्या पाठीवरून हात फिरवीत आहे, त्याच कौतुकाने ही उद्या उमलणाऱ्या पानाफुलांकडे पाहील; आणि दर वेळी कुंती-गांधारीपासून मध्ययुगीन स्त्रीपर्यंत आणि भारतीय स्त्रीपासून युरोपीय स्त्रीपर्यंत सर्व देशांत, सर्व काळांत जी आदिमाता वावरत होती. तिच्याविषयीचे विचार हिच्या मनात घोळत असतील. आणि एकदा असे जाणवू लागले की, शेजारी खुर्चीवर बसून खाद्यपदार्थांच्या चर्चा करणारी ही स्त्री जवळ असूनही खूप दूर गेल्यासारखी वाटू लागते. आपली असून आपली नसणारी, सर्वांची असून कुणाचीच नसणारी, मिठीच्या आटोक्यात असून फार मोठ्या आकारामुळे कवेत न सापडणारी, अशी ही चमत्कारिक, तरीही ओळखीच्या मनाची स्त्री एकदम मन भारावून टाकते; तितकेच गोंधळून टाकिते.

कारण इरावतींच्या मनात सगळे अनुभव एकाच वेळी ताजे असतात.

बालपणी जे जीवन ती जगली, त्याच्या आठवणी एकदम काल घडल्याप्रमाणे ती सांगू लागते. आणि ज्या वेळी ती लहान होऊन बोलू लागते, त्याच वेळी आपल्या मोठ्या आईशी समरस होऊन ती तिचे दुःख समजून घेत असते. कारण हे दुःख जणू तिच्या आईचे नव्हतेच. सासरी गेलेल्या आपल्या मुलीच्या आठवणीने व्याकूळ झालेली इरावती आपल्या बालपणात आपली मुलगीही पाहते आणि आपली आईही पाहते. वेगवेगळ्या पातळ्यांशी समरस होण्याची इरावतींची शक्ती, भूत-वर्तमान आणि भविष्य या काळांचे जीवन एका क्षणी जगण्याची तिची जिद्द तिला एकाच क्षणात परकरी पोर, अल्लड तरुणी आणि प्रौढ आई करून टाकिते. आणि सारेच अनुभव ती दरक्षणी जिवंतपणी भोगीत असते. हा अनुभवांचा जिवंतपणा, विचार आणि भावना या सगळ्यांना आपल्यात समावून घेत असतो आणि तरीही पुन्हा हे सगळे कुठूनतरी दुरून न्याहाळणारी तटस्थ इरावती या सर्वांचा एकूण मानवी जीवनातला अर्थ लावीत असते. तो अर्थ सर्वांना समजावून सांगण्यासाठी धडपडणारी मास्तरीण तीच असते. एका निबंधात बाईंनी म्हटले आहे की, मुंग्यांना दऱ्याखोऱ्या आणि पर्वत जाणवतच नसतात. आपणाला सपाट वाटणाऱ्या सडकांवर पडलेला प्रत्येक खळगा ही त्यांच्या लेखी दरी असेल आणि प्रत्येक उंचवटा त्यांच्या लेखी पर्वत असेल. आपल्याला ज्या दऱ्या आणि पर्वत जाणवतात, त्या दऱ्या आणि ते पर्वत मुंग्यांना जाणवण्याचा संभव फार कमी.

ज्या इरावतीने हे लिहिलेले आहे, त्याच इरावतीने शत-शतकांच्या संस्कृतीच्या अभ्यासाने समृद्ध झालेले आणि सर्व प्रकारच्या तृप्तीने बहरलेले आपले एकाच वेळी लिप्त आणि विरागी असणारे मन सर्वांना उकलून दाखविण्याचा, समजावून सांगण्याचा प्रयत्न केला आहे. मोठी माणसे मुद्दाम मुलांच्या जवळ जाण्यासाठी बोबडे बोलू लागली, म्हणजे मुलांना जसे काही ओळखीचे, काही दूरचे, काही जिव्हाळ्याचे आणि काही परके असे जाणवते, तसा प्रकार इरावतींचे लिखाण वाचताना सारखा घडतो. चिंतनशीलतेची, संवेदनांची अफाट क्षमता असणारे इरावतींचे वत्सल मन त्यांच्या निबंधांत ठिकठिकाणी व्यक्त होत राहते. म्हणून त्यांना नव्या मराठी ललित-निबंधाचे अग्रदूत असे म्हणावयाचे. एरव्ही, अशा कोणत्या वाङ्मयप्रकाराचा जाणीवपूर्वक विचार त्यांनी केलेला दिसत नाही.

ठरलेली मते सजवून मांडणारा निबंध आणि चिंतनशील मनाचा

आविष्कार यांत मूलतःच फरक असतो. अनुभव घेत असताना त्या अनुभवांची संगती लावणे आणि भाष्यनिरूपणांसह सर्व अनुभव पुन्हा अनुभवाच्याच पातळीवर शिल्लक राहणे, ही प्रक्रिया म्हणजे चिंतनशील मनाचा एक धर्म असतो. चिंतनशील मन हे प्रत्येक घटनेवर निरूपण करीतच असते, त्याची संगती लावीत असते. त्या ठिकाणी असणारा विचार नेहमीच सर्वस्वी नवा असतो असे नाही, पण तो अनुभवाचा भाग असतो. आणि ज्या वेळी पूर्वसिद्ध विचार सजवून मांडिलेले असतात, त्या वेळी विचारांना सोयीस्कर होतील असे प्रसंग हुडकून एकत्र आणिलेले असतात. सजावटीसाठी सावडून आणलेल्या सामग्रीलाही अनुभवाच्या पातळीवर जिवंत होता येणे शक्य नसते, आणि या प्रसाधनाशी मूळ विचार एकरूप होणेही शक्य नसते, चिंतनशील मन नुसता विचार करीत नसते, तर तो विचार त्या व्यक्तिमत्त्वाने रंगलेलाही असतो. इरावतींचे मन हे असे चिंतनशील मन असल्यामुळे त्यांचा निबंध ललित आणि वैचारिक यांच्या सीमारेषेवर वावरत असतो. कित्येकदा तो वैचारिकाच्या बाजूने अधिक झुकतो आणि मग विचार म्हणून ती मांडणी कितीही रेखीव झाली, तरी ती आपला जिवन्तपणा हरवून बसते. कित्येकदा हा निबंध आपल्याच अनुभवाची संगती लाविताना हरवून जातो आणि मग विविध अनुभवांच्या संगतीचे सूत्र हरवल्यामुळे विस्कळित वाटू लागतो. पण हे दोन्ही प्रकार त्यांच्या लिखाणात पुनःपुन्हा घडतात हे मान्य केले, तरी त्यामुळे या निबंधाचा वेगळेपणा संपत नाही. मी निबंध शब्द वापरतो आहे खरा, पण इरावतींच्या सगळ्याच लिखाणाचे स्वरूप नेहमीच निबंधासारखे असेल, असे नाही. कधी तो निबंध असतो, कधी त्या नुसत्याच आठवणी असतात. कधी प्रवासवर्णन असते, कधी त्यात निरनिराळ्या व्यक्तिरेखा असतात; या ललितनिबंधात इरावतींच्याबरोबर त्यांच्या मुली, जावई, मुले, पती, मित्र हे सगळे डोकावून जातात. कित्येकदा तर ही नावे नुसती नावे म्हणून शिल्लक राहत नाहीत. तीही आपापले व्यक्तिमत्त्व घेऊन इरूच्या वाङमयात हक्काने प्रवेश करितात.

ही कल्पिताची सृष्टी आहे. तिला वास्तवाचे निदान स्थलकालनिबद्ध वास्तवाचे संदर्भ नसावे, हे बंधन इरावतीबाईंनी कधी पाळलेले दिसत नाही. आणि या स्थलकालनिबद्ध वास्तविक सत्याने त्यांच्या वाङमयातील सार्वत्रिक सत्याला कधी अडथळा आणिलेला दिसत नाही. स्थलकालाच्या

खुंट्यांना बांधून ठेविलेले एक प्रकारचे सत्य, स्थल-कालाला न बांधलेले पण सार्वत्रिक असणारे दुसऱ्या प्रकारचे सत्य, कल्पनेत, भावविश्वात, सांस्कृतिक मूल्यांत असणारे तिसऱ्या प्रकारचे सत्य, आणि ललित वाङमयात कलात्मक पातळीवर जाणारे आणखी चौथ्या प्रकारचे सत्य-अशी सत्यांची वर्णव्यवस्था इरावतींनी कधी मानिली नाही. ती त्यांना कुणी समजावून सांगितली असती, तरी पटलीही नसती. त्यांच्यात असणारा समाजशास्त्रज्ञ त्यांना पुन:पुन्हा बजावून सांगत होता की, 'ही स्त्री बाळंत झाली, ती स्त्री बाळंत झाली, अशी शेकडो स्थल-कालविशिष्ट सत्ये एका सार्वत्रिक सत्याच्या पोटात असतात आणि हे सार्वत्रिक सत्यच विविध पातळ्यांवर वावरत असते. विशिष्टातून ते सामान्याचा बोध करून देते. संशोधनातली सगळी अनुमाने या जातीची असतात. हेच सामान्याच्या संदर्भात विशिष्टाचा अर्थ लावते. सगळी मानवी आकलनशक्ती या जातीची असते. आणि ज्याला आपण संस्कृती म्हणतो, तीही इतकी खरी असते, इतकी चिवट असते की, प्रकृतीला तिच्यामुळे जुळते घ्यावे लागते; आणि हे सगळेच कलेत यावयाचे असते. जर माझ्या ललित-निबंधात 'मी' असेन, तर जेथे मी आहे, तिथे माझे मन, माझी नाती-गोती, माझे सोयरसंबंध आपोआप येणारच. जर माझ्या लालित्याला माझाच अडथळा होणार असेल, तर मग ती कला खरीही नाही, आणि ती मग माझीही नाही.'

इरावतींच्या संशोधक मनाने ललितवाङमयाच्या प्रकृतीचा अभ्यास न करिता अजाणताच एक वाङमयीन सत्य हेरलेले होते. त्या सत्याचे स्वरूप असे आहे की, ललितवाङमयात सगळीच नावे एकाच वेळी खरी आणि खोटी असतात. त्या नावांच्या पाठीमागे उभी असणारी व्यक्तिमत्त्वे जितकी विशिष्ट असतात, तितकीच सार्वत्रिक असतात. किंबहुना, अनुभव जितके व्यक्तिविशिष्ट होतात, तितके ते जास्त सार्वत्रिक होतात. अनुभवांचा जिवंतपणा असला, म्हणजे स्थलकालांनी बांधलेले सत्य स्थलकालाचा अडथळा न होता आपोआप सार्वत्रिक होते. लक्ष्मीबाईंच्या स्मृतिचित्रांच्या-प्रमाणे. आणि जर हा अनुभवांचा जिवंतपणा नसला, तर मग सार्वत्रिक सत्य असो, की वैयक्तिक सत्य असो, भाषा-शैलींचे खांब कलेचा तंबू उभा ठेवू शकत नाहीत. सारेच भुईसपाट होते. कारण ते मुळातच सपाट असते.

वैचारिक आणि ललित यांच्या सीमेवर वावरणाऱ्या इरावतींच्या एकूण जीवनविषयक दृष्टिकोणातच एक सूक्ष्म अशी विसंगती आहे. ही विसंगती

त्यांना जाणवलीच नाही हे खरे, की ही विसंगती जाणवूनसुद्धा त्यांनी ती जतन केली हे खरे, याविषयी नक्की निवाडा कुणाला देता येईल, असे वाटत नाही. एका सुसंस्कृत अशा उदारमतवादी वातावरणात इरावतीबाई वाढल्या. या उदारमतवादी भूमिकेविषयीचा त्यांचा जिव्हाळा कधी आटला नाही. हिंदुस्थानातील नेमस्त, मवाळ पक्ष एक राजकीय पक्ष म्हणून समाप्त झाला, त्या वेळी इरावतीबाई हळहळल्या. पण हे हळहळणे त्या वेळेपुरतेच नव्हते. पुढे रँग्लर परांजप्यांच्याविषयी लिहिताना हा उदारमतवादाविषयीचा जिव्हाळा पुन्हा एकदा उसळून आलेला आहे. उदारमतवादाविषयी जिव्हाळा असणाऱ्या विदुषीला बेंथॅमविषयी मात्र फारशी आपुलकी वाटत असलेली दिसत नाही. सदगुणांच्यासाठी सदगुण ही भूमिका मूर्खपणाची आहे. जे परिणामी चांगले, जे बहुतेकांच्या व बहुसंख्येच्या बहुत हिताचे ते चांगले, असे मानणारा जेरमी बेंथॅम हा मात्र बाईंना कालिदासाने रंगविलेल्या सिंहाचा नवा अवतार वाटला. अर्थशास्त्रात ॲडम स्मिथ आणि रिकार्डो व काही प्रमाणात बेंथॅम, समाजचिंतनात मिल, स्पेन्सर आणि बेंथॅम ही इंग्लंडच्या उदारमतवादाची दैवते होती.

उदारमतवाद हे मुळातच आशिया-आफ्रिकेच्या शोषणावर पुष्ट झालेल्या समृद्ध अशा व्यापारी संस्कृतीचे तत्त्वज्ञान होते. त्या उदारमतवादाचा जिव्हाळा बाई कधी टाळू शकल्या नाहीत; आणि हिंदुस्थानभर पसरलेले अफाट दारिद्र्य आणि दु:ख यांविषयीची कणव त्या कधी टाळू शकल्या नाहीत. उदारमतवाद ज्या निरनिराळ्या योजना आखीत होता, त्या योजनांत बाईंना रस नव्हता. स्त्री शिकली म्हणजे सुसंस्कृत होते, स्त्रियांच्या शिक्षणाने त्यांची दु:खे कमी होतील, घटस्फोटाची सोय व्यक्तिस्वातंत्र्य वाढवून व्यक्तीला अधिक सुखी करील, अशा प्रकारच्या कोणत्याच भोळ्या आशावादावर बाईंचा विश्वास नव्हता. सुधारणावादी कार्यक्रम सुख वाढविणारा आहे, हेही त्यांना पटत नव्हते. अफाट भारतीय दारिद्र्यावर उदारमतवाद हा तोडगा आहे, यावर त्यांचा विश्वास नव्हता. उदारमतवाद प्रत्येक वेगळेपणाची जपणूक करितो; इतस्तत: आंढळणारा वेगळेपणा उदारमतवादाला व्यक्तिस्वातंत्र्याची आवश्यक अट वाटते. या अलगीकरण आणि विभक्तीकरण टिकविणाऱ्या कार्यक्रमावर त्यांचा विश्वास नव्हता.

वेगवेगळी मते टिकावी, व्यक्तिस्वातंत्र्य असावे, असे त्यांना वाटे. पण आदिवासी समूहांच्या भिन्न-भिन्न संस्कृतींची जपणूक करण्याच्या प्रयत्नात

देशातील जो फुटीरपणा जोपासला जात आहे, तो कार्यक्रम मात्र त्यांना मान्य नव्हता. शिक्षणाच्या वाढीमुळे भ्रमनिरास झालेले सुशिक्षित तरुण वाढतात, हे त्यांना दिसत होते. शिक्षण मनाचा सुसंस्कृतपणा वाढविण्याला असमर्थ ठरले आहे, तसेच ते सुखाच्या वाढीलाही उपयोगी ठरत नाही, हेही त्यांना दिसत होते. पण समाजाला काही मूलभूत परिवर्तनाची गरज आहे, असे मात्र त्यांना कधी जाणवत नव्हते. प्राचीन संस्कृतीविषयीची ओढ, भिन्नभिन्न प्रकारच्या समाजांचा अभ्यास यांमुळे बाई उदारमतवादाच्या मर्यादांपर्यंत येऊन पोहोचल्या होत्या. पण त्या मर्यादा ओलांडण्याला त्यांचे मन जणू धजावत नव्हते. उदारमतवादच व्यक्तिस्वातंत्र्य टिकवीत नसतो. एकाच समाजात एकाच वेळी नांदणारी हट्टी, संघर्षमय तत्त्वज्ञाने परस्परांशी संघर्ष करतानाही व्यक्तिस्वातंत्र्यच टिकवीत असतात, असे बाईंना कधी वाटले नाही. त्यांच्याजवळ आईची करुणा होती; पण त्यांचे सश्रद्ध मन मुळातच उलथापालथ करण्याला धजत नव्हते. इतकाच याचा अर्थ.

याचा परिणाम असा झाला आहे की, इरावतीबाई एकीकडे दारिद्र्य, उदध्वस्तता, रोग, विद्रूपपणा आणि दुसरीकडे समृद्धी, विविधता टिपीत चालल्या आहेत; मधूनमधून भय, भीतीच्या जाणिवाही आहेत; मृत्यूचे स्मरण आहे; पण त्याबरोबरच सहस्त्र पिढ्यांचा अनुबंध आहे. म्हणून बाईंना सगळेच हवेसे वाटते. त्या आग्रहाने कशाच्या विरुद्ध उभ्या राहू शकत नाहीत. मनाच्या या घडणीमुळे त्यांच्या लिखाणाची विविधता वाढली आहे. पण हे लिखाण काहूर आणि करुणा यांच्या काठांवर थांबणारे आहे; पलीकडच्या काठावर जाण्याची प्रेरणा देणारे नाही. कारण ते कशाच्याचविषयी चीड निर्माण करू शकत नाही. सामाजिक चिंतनात विरोधकांचे सामर्थ्य आणि महत्त्व जाणणे यालाही महत्त्व आहे. पण स्वत:च्या आग्रहांनाही काही महत्त्व आहेच आहे. उदारमतवाद अशा प्रकारची काठापर्यंत जाणारी चिरफाड करू शकत नसतो. फुटू पाहणारे कुटुंब सावरून धरण्याची धडपड करणाऱ्या म्हाताऱ्याप्रमाणे उदारमत-वादाची अवस्था असते.

ललितवाङ्मयाचे स्वरूप प्रेरक असलेच पाहिजे, असा आग्रह धरण्याचे कारण नाही, हे मलाही समजते. पण ज्या वेळी एखाद्या चिंतनशील मनाच्या सहवासात आपण येतो, त्या वेळी या चिंतनशील मनाने नुसता मनाचा समजूतदारपणा वाढवू नये. भिन्नभिन्न प्रकारे अनुभव घेण्याची सवय

लावून केवळ मनाची समृद्धी वाढवू नये, तर विचारांना एक दिशा द्यावी, अशी अपेक्षा असते. इरावती जर समोर दिसणारे अनुभव नाकारून पुढे गेल्या असत्या, तर आपल्या मर्यादित वर्तुळात एखादी संगती त्यांना शोधताही आली असती. पण समोर दिसणारे दाहक सत्य नाकारणे त्यांच्या स्वभावात नव्हते, आणि हे सत्य जर स्वीकारायचे असेल, तर त्या संदर्भात विचारांचे शेवटचे टोक गाठले पाहिजे, अशी त्यांची तयारी नव्हती. कदाचित याचे कारण हेही असेल की, भारतीय स्त्रीच्या उपजत मनाप्रमाणे त्यांनी दुःखांची अपरिहार्यता स्वीकारलेली होती. प्राकृतिक दुःखे, सांस्कृतिक दुःखे आणि सामाजिक दुःखे हा सर्व यातनांचा भोग माणसाला अपरिहार्य आहे, याची जाणीव अगदी तरुणपणापासून त्यांच्या मनात वावरत असताना दिसते. बिहारमध्ये आपल्या कामानिमित्ताने फिरताना त्यांना आढळून आले की, गंगेच्या सुपीक खोऱ्यात चार भिंतींच्या कोंडवाड्यात बायका केवळ स्वयंपाक करून, यजमानांची वाटच पाहत बसतात. मुलीने विचारिले, ''जन्मभर असे वाट पाहत कुजतच बसायचे काय?'' बाईंनी भारतीय स्त्रीच्या दुःख अपरिहार्य मानणाऱ्या थंड मनाने उत्तर दिले, ''नाही, त्यांना फार वेळ कुजत बसावे लागत नाही. आजार त्यापूर्वीच त्यांनी सुटका करतात.''

दुःख टाळण्याकडे आणि ते टाळल्यानंतर डोळे झाकून घेऊन स्वप्नात रमण्याकडे बाईंची कधी प्रवृत्ती नव्हती. जी दुःखे आहेत, ती आहेत, ती नाहीत म्हणून चालणार नाही, याचीही त्यांना जाणीव होती आणि ही दुःखे कधी संपणारी नाहीत, याचीही त्यांना जाणीव होती. एकेक अनुभव त्यांना थेट दुःखाच्या गाभ्याजवळ घेऊन जात असे. या दुःखाच्या गाभ्याजवळ आपण पशूंच्या कितीतरी जवळ आहोत, अशी त्यांना अचानक आठवण येई. वारकऱ्यांच्या तांड्याबरोबर हरिनामाचा गजर करीत जातानासुद्धा अचानकच कुठेतरी न टळणारे दुःख एखाद्या म्हातारीचे रूप घेऊन त्यांच्यासमोर उभे राही. सहजगत्या एखाद्या वृद्धेला नातवंडांच्याविषयी प्रश्न विचारावा, तर तिचे डोळे मिटत, तोंड भेसूर दिसू लागे. सारे शरीर भीतीने थरथरत असे. कुत्रीच्या पिलाला जेव्हा जनावर चावले, तेव्हा तीही अशीच भीतीने थरथरत होती, याची आठवण हे मानवी दुःख पाहताना बाईंना येते. कुठे उत्खननासाठी जावे, तो एखादा युद्धात मारलेल्या माणसाचा सांगाडा सापडत असे, आणि मग अचानक अशी हुरहूर लागायची की, याच्या

शेजारी एखादी जिवंत तरुणी मारून पुरलेली असावी. स्त्रीजात गरजेनुसार वापरायची. स्त्री म्हणजे केवळ कातडीची थैली. पुरुष हा पुत्ररूपाने पुन्हा जन्मतच असतो. मूल पित्याचे, आई फक्त साधन, असे सांगणारी भारतीय सांस्कृतिक परंपरा कितीही यातनामय असली, तरी ती इरावतींना जवळची होती. कारण ती त्यांची स्वत:ची परंपरा होती.

चौफेर उपस्थित असलेल्या या दु:खाच्या अस्तित्वाने बाई सदैव घेरलेल्या आहेत. मध्येच कुठेतरी मारी-कुट्टीसारखी एखादी कुरूप स्त्री असते. तिच्या केसाच्या मळसूत्राकार गुंडाळीत थकवा येईपर्यंत उवा फिरत असतात. वेड्यांच्या दवाखान्यात ती परिचारिका म्हणून असते. वास्तविक जग विसरून जे मिळविता आले नाही, ते मिळाल्याच्या भ्रांतीत वेडे वावरत असतात; आणि असेच एक खोटे स्वप्नसाम्राज्य निर्माण करून मारी-कुट्टी आपल्या अर्थशून्य जीवनाला अर्थ देण्याचा प्रयत्न करीत असते. कुठे देवळांच्या भोवताली पसरलेले निरनिराळ्या रोगांचे जंगल असते. कुठे ही दु:खे सांस्कृतिक रूप धारण करितात; आणि त्यांचे स्वरूप सांस्कृतिक कारणांमुळे अधिक उत्कट व्हायला लागते. मुले मोठी होतात; आणि मग त्यांना स्वत:च्या जीवनाची गती लागते. म्हाताऱ्या माणसांना एकाएकी आठवण येते की, आता आपली गरज संपलेली आहे. गरज संपल्यानंतरही टिकून राहण्याचा केविलवाणा अट्टाहास कमी यातनांना जन्म देत नाही! तर कुठे मानवी प्रयत्नांची सगळी व्यर्थताच समोर दिसू लागते. किंकाळी फोडणाऱ्या मुलाच्या मदतीला आपण गेलो, हेही व्यर्थच. असे मदतीला आपण गेलो नसतो, तर तेही व्यर्थच! समाजाशी एकरूप होण्याचा प्रयत्न करून आपला एकटेपणा विझविला, तरी तोही प्रयत्न व्यर्थ ठरतो, आणि आपल्या एकाकीपणात रमावयाचे असे म्हटले, तर ते रमणेही व्यर्थ ठरते. अशा प्रकारच्या नानाविध दु:खांनी, मृत्यूच्या व भीतीच्या जाणिवांनी, निसर्गात मूलभूत असणारे क्रौर्य आणि त्या क्रौर्याच्या प्रतिकारार्थ नेहमी-नेहमी लुळी पडणारी संस्कृती, अशा जाणिवांनी इरावतींचे अस्तित्व घेरलेले आहे.

या दु:खांकडे पाहताना इरावतींनी मरणाची अपरिहार्यता स्वीकारलेली आहे. शरीराच्या आणि मनाच्या वाढीबरोबर येणारी माणसांची ताटातूट हीही एक अटळ घटना म्हणून मान्य केली आहे. सांस्कृतिक दु:खाचा अटळपणातर इरावतींना मान्य करणे भागच होते. कारण त्या व्यथेच्या

भोगातूनच माणसाची माणुसकी शिल्लक राहते. ही विविध दुःखांची अपरिहार्यता स्वीकारीत स्वीकारीत इरावतींचे मन सामाजिक दुःखांकडे आणि विकृतींकडेसुद्धा एक अपरिहार्य व्यथा म्हणूनच पहावयाला शिकले आहे. निदान सामाजिक दुःखांतून माणसाची सुटका करिता येईल, असाही विश्वास त्यांना वाटत नाही; मात्र दुःखाच्या या चौरस जाणिवेने त्यांच्या श्रद्धा ढासळलेल्या नाहीत; मन खचलेले नाही; भट्टीत तापविल्यामुळे सोने अधिकच उजळ व्हावे, त्याप्रमाणे वेदनेच्या भट्टीत दर क्षणी जळताना इरावतींचे मन अधिक उदार आणि सुसंस्कृत झाले आहे.

वेदनेचा स्पर्श नसणारे एक अप्रौढ बालमन घेऊन सगळ्याच घटनांकडे कुतूहलाने पाहत, त्यांचे कौतुक करीत इरावतींचा प्रवास सुरू होतो. हा प्रवास शरीराचा आहे, तसा मनाचाही आहे. संशोधनाच्या निमित्ताने चांदागोंदियांच्या जंगलांपासून गुजरात-राजस्थानच्या वाळवंटांपर्यंत, हिमालयाच्या पायथ्याशी असणाऱ्या डोंगरांपासून बिहारच्या मैदानापर्यंत अणि आसामच्या जंगलांपासून कुर्गपर्यंत हा शरीराचा अखंड प्रवास चालू आहे. या प्रवासात संकेतांची बंधने आरंभापासूनच गळून पडलेली होती. युरोपच्या वातावरणात ज्यांची लग्ने झाली त्या मुलींना सासरच्या अनेक अनोळखी व्यक्तींचे मुके घ्यावे लागतात. असे अपरिचितांचे मुके घेणे चांगले, की भारतीय नववधूला अनेक अपरिचितांना नमस्कार करावा लागतो तसे नमस्कार करणे चांगले, येथपासून दर ठिकाणी थांबत त्या विचार करीत जातात. हा विचार करिताना कधी जंगलांच्या, तर कधी वाळवंटांच्या, कधी सतत चालणाऱ्या नादांच्या, तर कधी न भंगणाऱ्या शांततेच्या अशा अनेक आठवणी त्यांच्या मनात जाग्या होत राहतात. त्या निसर्गाला संवेदनक्षम मनाने शब्दबद्ध करीत, भोवतालच्या समाजाचे समाज म्हणून चित्रण करीत, प्रवासात आढळणाऱ्या व्यक्तींची एक जिवंत माणूस म्हणून ओळख करून घेत, सुखाचे आणि दुःखाचे नानाविध प्रकार पाहत हा शरीराचा अखंड प्रवास चालू आहे. या प्रवासात निरनिराळ्या व्यक्ती भेटतात. समाज दिसतात, निसर्गाची विविध चित्रे येतात; पण हा प्रवासाचा एक भाग झाला.

ह्याबरोबर त्यांच्या मनाचा प्रवास चालू आहे. दर ठिकाणी थांबून त्या स्वतःच्याच मनाला 'हे असे का?' हा प्रश्न विचारीत असतात. 'स्त्रियांना आधारासाठी जो बळकट पुरुष लागतो, ती गरज शिक्षणाने मृदू झालेला पुरुष

भागवू शकेल काय?', 'माणूस वास्तविक जीवनातील दु:खे स्वप्नात विसरू शकेल काय?', 'माणुसकीची मूल्ये एका पिढीत धुळीला मिळतात, ती पुन्हा उभी करिता येतील काय?', 'स्त्रीराज्य जरी झाले, तरी ते पुरुषांच्या अखंड चिंतनात रमलेले असते; अशी ही स्त्री खऱ्या अर्थाने स्वतंत्र होऊ शकेल काय?', 'स्वाभिमान आणि सुखे यांत स्वाभिमान संभाळण्यासाठी दु:खांना निमंत्रण देणारी माणसे मठ्ठ म्हणता येतील काय?', 'म्हाताऱ्यांना जगवीत बसणे चांगले, की प्रत्येकाने वेळेवर मरणे चांगले?', 'सुप्त इच्छा दाबता येतील काय?'- हे आणि असे अनेक प्रश्न त्यांचे मन उपस्थित करिते, आणि या प्रश्नांची उत्तरे देण्याचा प्रयत्न करिते. हळूहळू कुतूहलाची जागा गांभीर्य आणि वेदना घेतात; आणि क्रमाने बाईंचे लिखाण जास्तच अंतर्मुख होऊ लागते. आणि मग त्या अधिक मूलभूत प्रश्न उपस्थित करू लागतात. या प्रश्नांची उत्तरे त्यांची त्यांनाही सापडण्याचा संभव नसतो. असा एक मनाचा प्रवासही सतत चालू आहे. आणि या मनाच्या प्रवासात समाजशास्त्र आणि मानसशास्त्र मधूनमधून त्यांना जास्तच घोटाळ्यात टाकण्याचा प्रयत्न करितात.

या अशा अखंड प्रवासात अखंड सहचर म्हणून बाईंच्या जवळ महाभारत आहे. कधी त्या महाभारताच्या व्यक्तींत आपले जीवन पाहण्याचा प्रयत्न करितात; कधी जुन्या मूल्यांच्या आधारे महाभारतातील व्यक्तींच्या वागणुकीचे समर्थन त्या करू लागतात; कधी नव्या मूल्यांच्या आधारे महाभारतातील व्यक्तींवर त्या दोषारोप करू लागतात; त्यांच्यासाठी महाभारत हे अन्यायार्थ लावण्याचे म्हणून केवळ शिल्लक असणारे इतिहासाचे साधनसाहित्य नाही; किंवा महाभारत हे वंदनीय अशा संस्कृतीने निर्माण केलेले एक पुराणकथेचे मूर्त रूपही नव्हे. महाभारतातील व्यक्ती या जणू त्यांच्या भोवताली सतत वावरत आहेत. बाई जशा आपल्या मुलाबाळांना, सासू-सासऱ्यांना, पतीला, आई-वडिलांना विसरू शकत नाहीत, तसे त्यांच्या भोवती महाभारत आहे. गांधारी किंवा कुंती ही त्यांच्यासाठी जणू शेजारिणींसारखी पात्रे आहेत. त्यांची भलावणी केल्याशिवाय किंवा त्यांच्याविषयी तक्रार केल्याशिवाय बाईंना राहवतच नाही. त्या दिल्लीवरून पाठणकोटला जरी जात असल्या, तरी त्याच रस्त्याने सौंदर्यवती गोरीपान दमयंती, हीन-दीन अशी भटकत-भटकत आपल्या मावशीच्या घरी गेली, हे त्यांना चटकन आठवते.

बाईंनी 'युगान्त' हे पुस्तक फार नंतर लिहिले; पण महाभारतावर ठिकठिकाणी भाष्य करण्याची त्यांची प्रथा आरंभापासून आहे. महाभारताच्या जोडीला कधी रामायण तर कधी भागवत असते. पण ते नेहमीचे सहकारी म्हणून नाही; ते ग्रंथ मधूनमधून येतात. मध्येच त्यांना आठवते की, आश्रमात वाढलेल्या अनाथ महत्त्वाकांक्षी शकुंतलेने 'दुष्यन्त कोण?' हे जाणून त्याच्या गळ्यात मिठी मारिली आणि हस्तिनापूरच्या गादीची स्वामिनी होण्याचा धाडसी डाव टाकला. हे सांगत असताना महाभारतातील शाकुंतलावर एक नवीन भाष्य निर्माण होण्याची शक्यता दिसू लागते. अशी विविध भाष्ये बाईंच्या ललित-निबंधांत आलेली आहेत. जे सामान्यत्वे कुणा पुरुषाच्या लक्षात येणार नाही, अशा महाभारतातील जागा इरावतींच्या नारी-मनाला सहज स्पर्श करून जातात आणि मग त्यांना असे वाटते की, अंबिका आणि अंबालिका यांच्याशी व्यासांचा नियोगसंबंध झालाच नाही. भीष्माच्या संमतीने एका कोळ्याच्या पोरीने आपल्या सुनांच्यावर उगविलेला हा सूड आहे. राजवाड्यातील या कन्यकांवर अत्याचार झालेला आहे. कुठे कुंतीचा विचार करिताना कुंतीच्या शहाणपणात त्यांना तत्कालीन समाजाच्या वेडगळ श्रद्धेची बीजे आढळू लागतात.

माद्रीला जेव्हा दोन मुले होतात, तेव्हा कुंतीला असे वाटते, की माद्रीने आपल्याला फसविले. तिने दोघांना आवाहन केले, म्हणून तिला जुळे झाले. जुळे मूल होण्याचा संबंध दोन पुरुषांशी रत होण्याशी आहे, ही तत्कालीन वेडगळ श्रद्धा आणि त्या श्रद्धेला सर्वमान्य सत्य समजून त्यावर आपला सावधपणा उभारणारी कुंती यांचा विचार करितानाच एकदम इरावतीबाई सीतेपर्यंत जाऊन पोहोचतात. सीतेलाही जुळे झाले होते. त्या वेळेच्या समजुतीनुसार यामुळे सीतेचा व्यभिचारीपणा सिद्ध झाला, त्या सीतेला धरित्रीच्या पोटात कायमचे लुप्त होण्याशिवाय दुसरा मार्ग होता तरी कोणता? याच कुंतीविषयी पुन्हा एकदा इरावतींनी विचार केला, आणि खरोखरच कुंतीची संतती नियोगाची समजावी काय, हाही विचार त्यांच्या मनात आला. 'राजधानीच्या बाहेर, वडीलधाऱ्या मंडळींना न विचारिता जे घडले, त्या साऱ्याला नियोगच म्हणावयाचे काय?' असा एक प्रश्न बाईंच्या मनात केव्हातरी तरळून गेला आहे.

पण या भाष्यांच्या बरोबर मधूनमधून जैन वाङ्मयातील माहितीचा

स्वीकार करण्याचीही त्यांची पद्धत आहे. कुणीतरी एक पूईगंधा सतत पुरुष सहवासासाठी तळमळत वारली. मरताना तिच्या डोळ्यांसमोर एका रूपवती वेश्येच्या भोवती घोटाळणारे पाच तरुण होते. 'हे ईश्वरा! तिला पाच जण मिळावेत, आणि मला एकही मिळू नये काय?' हा विचार करिताना पूईगंधेचा प्राण गेला. ती पुढच्या जन्मी द्रौपदी झाली. तिला पाच नवरे प्राप्त झाले. ही जैन वाङमयातील माहिती बाईंनी पूरक म्हणून वापरलेली आहे. अशी जैन माहिती पुन्हा द्वारकेच्या संदर्भातही त्यांनी वापरलेली आहे. ही द्वारका कवींना भगवंतांच्या वैभवाचे प्रतीक वाटली; बाईंना द्वारका कृष्णाच्या कायम पराजयाचे स्मृतिचिन्ह वाटते.

यामध्ये महाभारताचे जे सततचे चिंतन चालू आहे, जी विविध स्पष्टीकरणे चालू आहेत, त्यांपेक्षाही बाई सतत महाभारताच्या सहवासात जगत आहेत, ही गोष्ट मला महत्त्वाची वाटते. न संपणाऱ्या सततच्या सज्जनपणाची प्रतिनिधिभूत पात्रे, न संपणाऱ्या द्वेषाची कहाणी, मनात जळत असणारी दु:खे सतत जपणारे सज्जन, भीष्माच्या रूपाने पापाच्या संरक्षणार्थ उभे असणारे पुण्य आणि पुण्याच्या समर्थनार्थ दर क्षणी कोणतेही पाप करण्यास उद्युक्त होणारा कृष्ण ही गुंतागुंतीची, मनस्वी व्यक्तींची कहाणी ज्यात आहे, तो ग्रंथ बाईंच्या सहवासात निरनिराळे अर्थ दाखवू लागतो. पण महाभारतात शेवटी सारेच व्यर्थ झालेले आहे. जयही पराजयाइतकाच कटू झाला आहे. कर्ते आणि नाकर्ते सर्वांनाच एका विशाल शून्यामध्ये महाभारताने बुडवून टाकिले आहे. सगळे कर्म करीत असताना दर टप्प्यावर 'याचा अर्थ काय?' 'त्याचा अर्थ काय?' असे विचारीत सगळेच निरर्थक ठरविणारा आणि प्रत्येक व्यक्तीचे जीवन मात्र सार्थ करणारा महाभारतासारखा ग्रंथ बाईंचा अखंड सहचर आहे. या आधारामुळेच बाईंचा प्रवास चालू असताना त्या थकत नाहीत; त्यांचे प्रश्न संपत नाहीत; आणि कोणतेही दु:ख त्यांच्या मनाला खच्ची करू शकत नाही.

या पार्श्वभूमीवर बाईंच्या दोन व्यक्तिरेखा पाहिल्या पाहिजेत. त्यातली एक त्यांच्याच सासऱ्यांची, म्हणजे महर्षी कर्व्यांची होती. जीवनातल्या नायकांच्या विषयी आपल्या समजुतीही स्वप्नरंजनातच रमलेल्या अशा आहेत. या व्यक्तिरेखेच्या निमित्ताने एका नायकाच्या नायकत्वाची मीमांसाच जणू इरावती करीत आहेत, असे वाटू लागते. ज्याचे सार्वजनिक जीवन सर्व समाजासाठी आहे, तो माणूस घरालाच पारखा होऊन जातो. माया आणि

जिव्हाळा समाजासाठी राखून ठेवणाऱ्या आपल्या एकमार्गी सासऱ्यांचा रुक्ष संसार आणि रुक्ष व्यवहार बाईंनी मोठ्या जिव्हाळ्याने सांगितलेला आहे.

व्रतांच्या निमित्ताने आपण नेमके काय करीत आहो, याचे या नायकांनाही कधी भान नसते. महात्मा गांधी हे भारतीय जीवनातील असेच एक नायक होते. दारिद्र्याचे आणि साधेपणाचे व्रत त्यांनी घेतलेले होते. ते तिसऱ्या वर्गाने प्रवास करीत; त्यांना त्रास होऊ नये, म्हणून सारा डबा राखीव करणे भाग असे. महात्मा गांधींना साधे जीवन जगता यावे, यासाठी जो खर्च होई, त्याचे प्रमाण वैभवशाली जीवन जगण्यासाठी लागणाऱ्या खर्चाहून अधिक होते म्हणून सरोजिनी नायडूंनी एकदा असे म्हटले की, ''दरिद्री नारायण को दारिद्र्य का भोग चढाया जाता है। उसका खर्चा कहीं अधिक है।'' गांधींच्या या साधेपणाची आणि महर्षी कर्वे यांच्या अपरिग्रहाची तुलना करून पाहण्याजोगी आहे. महर्षी कर्वे वर्गणी गोळा करण्यासाठी ठिकठिकाणी हिंडले, त्यासाठी जर कुणी तिकीट काढून दिले, तर त्याला कर्व्यांची ना नसे. त्या प्रवासात मोटारीतून हिंडविले, तर त्याला त्यांची ना नसे. वृद्धापकाळी स्वतःच्या खर्चासाठी म्हणून ते काही पैसे देत. तितक्यातच त्यांचा खर्च भागतो की नाही हे पाहण्याची त्यांना जरुरी नाही. पण ज्या गोष्टी त्यांच्या लक्षात आल्या, त्यांची मात्र त्यांनी चटकन परतफेड केली. कर्वे यांचे अपरिग्रहाचे व्रत हे असेच तात्पुरते असे. सर्वच महनीय व्यक्तींच्या जीवनाचा एक थर असा असतो. ज्या दऱ्या माणसांना जाणवतात, त्या मुंग्यांना जाणवतच नाहीत, ज्या मुंग्यांना जाणवतात, त्या माणसांना जाणवत नाहीत. हा जो माणूस आणि मुंग्या यांच्या आकलनातला फरक, त्यापेक्षा वेगळा प्रकार माणूस आणि अतिमानव यांच्यात नसतो.

महर्षी कर्वे यांचे बाईंनी जे अलौकिक व्यक्तिचित्र रेखाटलेले आहे, ते नुसते व्यक्तिचित्र नाही. ते त्या जीवनावरचे सहृदय, पण तितकेच सत्यनिष्ठ असे भाष्यही आहे. समाजाच्या कल्याणासाठी सर्वस्व वाहिलेल्या कोणत्याही थोर पुरुषाच्या घरगुती जीवनाची जी धूळधाण असते, ती कर्व्यांच्यासारख्या माणसाच्या खाजगी जीवनाची असते. हा माणूस एकदा सर्वांचा झाला म्हणजे बायका-मुलांचा उरतच नाही. हीरोचे सत्य स्वरूप नेहमीच 'अँटी-हीरो' असे असते. नायकाच्या जीवनाचा एक झाकलेला थर 'अ-नायकी' असतो; पुष्कळदा निर्नायकी असतो.

या व्यक्तिरेखेइतकीच अप्रतिम अशी दुसरी व्यक्तिरेखा मला गांधारीची

वाटते. महर्षी कर्वे विसाव्या शतकात अस्तित्वात होते; आणि गांधारी फक्त महाभारताच्या रचनेत आहे. हा फरक बाईंच्यासाठी अस्तित्वात नव्हता. बाईंच्यासाठी गांधारी वास्तविक व्यक्तींच्याइतकी सत्य होती. तिच्या डोळ्यांवर बांधलेली पट्टी वरवर जरी पतिनिष्ठेच्या मूल्याची प्रतिनिधी असली, तरी खरोखर तो एक प्रकारचा पतीविषयीचा तिरस्कार होता. स्वत:ची जी फसवणूक झाली, तीविषयी गांधारीने उगविलेला तो एक सूड होता, असे बाईंना वाटते. 'गांधारी शंभर पुत्रांच्याऐवजी शंभर दु:खांना प्रसवली आहे.' या वचनाची आठवण त्यांना सासऱ्यांविषयी लिहिताना येते. पण गांधारीविषयी लिहिताना मात्र तिचेही मन पुत्रवात्सल्यामुळे आंधळे व क्रूर झाले होते, असे त्यांना वाटू लागते. जेव्हा सर्व मुले मारिली जातात, तेव्हा गांधारी खरोखरी शांत होते. गांधारीच्या शांततेचा हा उगम तिच्या वृत्तीचा विकासातून होत नाही, तर आशेच्या सर्वनाशातून होतो. बाईंना या आंधळ्या गांधारीला डोळस करणे आवश्यक वाटते. तिच्या डोळ्यांवरची पट्टी शंभर पुत्रांनी घर भरलेले असताना सोडण्याचा आग्रह न धरणारा धृतराष्ट्र त्यांना तेवढाच सूडाने पेटलेला दिसतो. पतीविषयीच्या सूडाने पेटलेली, पण पतिव्रता भासणारी गांधारी आणि तिच्याविषयीच्या तेवढ्याच उत्कट सूडाने पेटलेला धृतराष्ट्र, पण वरवर समजूतदार दिसणारा आंधळा राजा यांची भुतावळ स्वत:च पेटविलेल्या सूडाच्या अग्नीत जर जळून खाक झाली असेल, तर त्यात आश्चर्य वाटण्याजोगे बाईंना काही नाही. ती गांधारी वार्धक्याच्या पक्व अवस्थेत सगळ्या आशा जळून गेल्यानंतर पतीच्या आज्ञेने डोळस होते; आणि म्हातारपणी पत्नी म्हणून निष्ठेने पतीचा हात हातात घेते व अग्नीकडे चालत जाते. आंधळी गांधारी आंधळ्या सूडाने पेटली, तेव्हाही पतिव्रताच दिसली आणि डोळस गांधारी पतीला घेऊन मरणाकडे वाटचाल करीत गेली, तेव्हाही पतिव्रताच भासली. गांधारीच्या जीवनाचा भयानक अर्थ सांगताना बाई कुठेतरी गांधारीत वर्तमान वाचीत आहेत असे वाटू लागते.

तसे पाहिले, तर 'आजोबा' ही व्यक्तिरेखा; 'गांधारी' ही म्हटली तर कथा. वाटचाल आणि यात्रा ही प्रवास वर्णने कुठेतरी. याच प्रवास वर्णनांत निरनिराळी मते आणि स्पष्टीकरणे, असा हा सगळा बाईंच्या ललित-निबंधांचा विस्तार आहे. हा ललित-निबंध कधी एकीकडे झुकला म्हणजे वैचारिक होतो, दुसरीकडे झुकला म्हणजे कथेच्या आणि कवितेच्या जवळ

जातो. पण तो कथेसारखा दिसला, तरी कथा नसतो. ते एक चिंतनशील मनाने कथेच्या आविर्भावात केलेले भाष्यच असते. वेगवेगळ्या पातळ्यांवरून, वेगवेगळ्या दिशेने सतत चिंतन करणारे आणि जीवनाचा अर्थ लावणारे अखंड प्रवासी, भटके मन, युगानुयुगांच्या आठवणी साठवीत सतत प्रवास करीत आहे. या प्रवासात ठिकठिकाणी टिपलेले सौंदर्य हा ह्या प्रवाशाच्या संवेदनक्षम मनाचा एक विभ्रम आहे. एका सुसंस्कृत मनाचा हा सतत जिवंत असलेला अनुभव शब्दबद्ध करणारा सश्रद्ध प्रवास आता कायमचा थांबलेला आहे.

**- नरहर कुरुंदकर**

हा ललित-निबंध कधी एकीकडे झुकला म्हणजे वैचारिक होतो, दुसरीकडे झुकला म्हणजे कथेच्या आणि कवितेच्या जवळ जातो. पण तो कथेसारखा दिसला, तरी कथा नसतो. ते एक चिंतनशील मनाने कथेच्या आविर्भावात केलेले भाष्यच असते. वेगवेगळ्या पातळ्यांवरून, वेगवेगळ्या दिशेने सतत चिंतन करणारे आणि जीवनाचा अर्थ लावणारे अखंड प्रवासी, भटके मन, युगानुयुगांच्या आठवणी साठवीत सतत प्रवास करीत आहे. या प्रवासात ठिकठिकाणी टिपलेले सौंदर्य हा ह्या प्रवाशाच्या संवेदनक्षम मनाचा एक विभ्रम आहे.

- नरहर कुरुंदकर

देशमुख आणि कंपनी (पब्लिशर्स) प्रा. लि.